नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

फेब्रुवारी

१९६९

वर्ष २३ अंक : दहावा

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २३) फेब्रुवारी १९६९ (अंक १०

संपादक
प्र. वा. ऊर्ध्वरेषे

संपादक मंडळ
डॉ. मा. गो. देशमुख
प्राचार्य भाऊ मांडवकर
डॉ. द. भि. कुळकर्णी

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
व्हीनस प्रिंटिंग हौस
घंतोली, नागपूर–१

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

पृष्ठ

२८६ तुकारामांच्या 'विराण्या' : व्युत्पत्ति
सुदाम सावरकर

२९१ बाबा पदमनजी आणि विष्णूबुवा ब्रह्मचारी
सौ. रजनी घुई

२९५ वैदर्भीय काव्यदर्शन
माधव गोपाळ देशमुख

३०९ वर्ध्याचे ४८ वे मराठी साहित्य सम्मेलन
सुधाकर लोखंडे

३१५ केशवसुतांचा व्यक्तिवाद
भवानीशंकर श्रीधर पंडित

३१९ नूरन
कृष्णा चौधरी

३२३ मराठी भावगीतांची वाटचाल
जी. एन. जोशी

१ संघवार्ता

तुकारामाच्या ‘ विराण्या ’ : व्युत्पत्तिविचार

मुदाम सावरकर

ज्ञानदेव–तुकाराम–

प्रसिद्ध साहित्यिक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी एके ठिकाणी म्हटले आहे– “तुकारामादि संतकवींच्या विराण्या हे जुन्या मराठी वाङ्मयातील रूपकात्मक गूढगुंजनाचे हृदयंगम नमुने म्हणून दाखविता येतील.” खरोखरच ‘ विराणी ’ हा भावमधुर काव्यप्रकार ‘रसिकत्वी परतत्व–स्पर्शु जैसा । ’ या कसोटीवर पुरेपूर उतरणारा असा आहे. या प्रकारात शांत रसाचे मंदिरी रसराज शृंगार पाहुणा आलेला दिसतो. ‘ येथे शांतुचि अभिनवैल’ अशी प्रतिज्ञा करणाऱ्या रससिद्ध ज्ञानेश्वरांनी देखील या काव्यप्रकाराचा अवलंब केलेला आढळतो. अमृतानुभवात ‘ प्रियु ’ व ‘ प्राणेश्वरी ’ यांचे जगावेगळे प्रेम वर्णन करणाऱ्या आणि ज्ञानेश्वरीत ‘तो वल्लभा मी कांतु’ असे देवभक्तांचे ‘मधुर’ नाते सुचविणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या अभंगातील ‘विरहिणी’ उत्कृष्ट शृंगारकाव्यात मानाचे स्थान मिळवितील अशा आहेत. भावप्रगटीकरणाची ही तऱ्हा संत तुकारामांनी देखील हाताळली असून त्यासंबंधी श्री. शं. गो. तुळपुळे लिहितात– “तुकारामांच्या विराण्या वाचतांना ‘ तुका झालासे कळस ’ हे वचन मधुराभक्तीच्या बाबतीतही सार्थ असल्याचा प्रत्यय वाचकांना यावा इतक्या त्या उन्मत्त आहेत.”[१]

या ‘विराण्या’ शब्दाची व्युत्पत्ति काय ? हा प्रश्न बहुतांश विद्वानांनी निकालात काढून ‘ विराणी ’ शब्द ‘विरहिणी’ पासून व्युत्पादिला आहे. शं. गो. तुळपुळे[२], ल. वि. परूळेकर[३], द. के. केळकर[४], ल. रा. पांगारकर[५], डॉ. प्र. न. जोशी[६], पं. महादेवशास्त्री जोशी[७] इत्यादि अनेक संतसाहित्याभ्यासी विद्वानांनी हीच व्युत्पत्ति दिलेली दिसून येते. ज्ञानेश्वरांच्या ‘विराण्यां’चे स्वरूप पाहिल्यास ही व्युत्पत्ति मनाला तेव्हाच पटते. कारण–

१ कृष्णे वेधिली विरहिणी बोले ।
चंद्रमा करतो उबारा गे माये ! ॥
न लावा चंदनु अंगी । न घाला विंजण वारा ॥..
२ चंदनाची चोळी माझे सर्व अंग पोळी ।
कान्हो वनमाळी वेगी भेटवा गा ॥..[८]

अशी उत्कट विरहभावना त्यांच्या विरहिणींच्या अभंगामधून तेव्हाच हृदयाला स्पर्शू लागते. परंतु हीच कसोटी तुकारामांच्या ‘विराण्यां’ना लागू पडणे शक्य आहे का ? हा प्रश्न विचारार्ह आहे. कारण तुकारामांच्या ‘विराण्या’ अन्य संतकवींच्या या काव्यप्रकाराहून काही निराळ्या स्वरूपाच्या आहेत.

हे निराळेपण वरील व्युत्पत्ति सुचविणारानाही जाणवल्याखेरीज राहिलेले नाही. उदाहरणार्थ, श्री. तुळपुळे लिहितात– “त्यांच्या विराण्या इतर संतकवींच्या तत्सम काव्याहून तीव्रतर असून त्यात एक प्रकारचा फटकळपणा आहे. इतर संतकवी विरहिणीची भावना तिऱ्हाईतपणाने वर्णितात तर तुकाराम स्वतःच विरहिणी होऊन ती अवस्था भोगतात.”[९] पं. महादेवशास्त्री जोशी म्हणतात– “ज्ञानेश्वरांच्या विरहिणींच्या पदातून करूणरसाचे पाझर स्त्रवत आहेत.... तुकोबांच्या विराण्या प्रमत्ततेकडे झुकणाऱ्या आहेत. त्यांनी लाजभीड सोडली आहे.... कृष्ण जरी त्यांना दुरावलेला असला तरी त्या रडत नाहीत, हळहळत नाहीत. तो सर्वभावे आपलाच आहे अन् आपण त्याच्याच आहोत असे त्या

[१] पांच संतकवि, पृ. ३७६, [२] सदर, [३] तुकाराम चरित्र पृ. ४१८, [४] मराठी साहित्याचे सिंहावलोकन पृ. २८२, [५] तुकाराम चरित्र पृ. ४५९, [६] मराठी साहित्यातील मधुराभक्ति पृ. २९०, [७] गोकुळच्या गौळणी पृ. ६५.

[८] सकलसंतगाथा पृ. १००, [९] पाच संतकवि पृ. ३७६.

समजतात. 'तो लपला असला तर त्याला शोधून काढू अन् दूर गेला असला तर ओढून आणू.' अशा आत्मविश्वासाची त्यांच्यामध्ये झाक दिसते. 'आम्ही कृष्णाच्या पट्टराण्या आहो' हा विश्वास त्यांच्या अंतरात ओतप्रोत दिसतो"[१०]

विराणी म्हणजे विरहिणी नव्हे !

तुकारामांच्या विराण्यांमध्ये तीव्रता, फटकळपणा, निधडेपणा व आत्मविश्वास आहे; त्या निर्लज्ज व प्रमत्त आहेत; ही त्यांची वेगळीक लक्षात घेऊन देखील त्यांना विरहिणी म्हणणे शक्य झाले असते. मात्र त्यासाठी त्यांचे ठायी विरहाची भावना दृग्गोचर होणे आवश्यक होते. परंतु ही विरहभावनाच मुळात त्यांच्या ठिकाणी दिसत नाही. त्यांच्या सर्व वेगळिकीचे मूळ आहे ते याच मुख्य गोष्टीत; आणि तरीही इकडे दुर्लक्ष करून विद्वानांनी त्यांना विरहिणी ठरवावे हे आश्चर्य आहे !

तुकारामांच्या विराण्यांचे एकूण २५ अभंग[११] आहेत. त्यातील एकाही अभंगाला विरहभावनेचा किंचित् देखील स्पर्श झालेला आढळत नाही. उलट 'घररिघी जाले'– 'परपुरुषासी रातले,' अर्थात् 'हरिरता जाले'– 'अनंता रातले', 'मी तो माझ्या भावे अनुसरले', 'आपुल्या आधीन पती केला', 'अवीट निजसुख साधले' याप्रमाणे अपेक्षापूर्तीची 'गती झाली' असल्याचेच या 'विराण्या' स्पष्ट शब्दांनी सांगत आहेत. "विरहिणी म्हणजे पति अथवा वल्लभाचा वियोग झालेली स्त्री" (महाराष्ट्र शब्दकोश), पण तुकारामांच्या विराण्यांचा आपल्या प्रियकराशी मुळीच वियोग उरलेला नाही. हे पुढील वचनातून कसे निःशंकपणे प्रतीत होत आहे, पहा—

१ 'हाचि नेम आता न फिरे माघारी ।
बैसले शेजारी गोविंदाचे' ॥

२ 'सासुरे माहेर मज नाही कोणी ।
एक केले दोन्ही मिळोनिया' ॥

३ 'रात्रंदिवस मज पाहिजे जवळी ।
क्षण त्या निराळी न गमे घडी' ॥

४ 'वळियाचा अंगसंग जाला आता ।
नाही भयचिंता तुका म्हणे' ॥

५ वळियाच्या आम्ही जालो वळिवंता ।
करू सर्व सत्ता सर्वांवरी' ॥

६ 'फावला एकांत एकविध भाव ।
हरी आम्हासवे सर्वभोगी' ॥

७ 'तुका म्हणे आम्ही बैसलो शेजारी ।
करील ते हरी पाहो आता' ॥

८ 'तुका म्हणे येणे जाणे नाही आता ।
राहिलो अनंताचिये पायी' ॥

९ 'एका जीवे आता जिणे जाले दोही ।
वेगळीक काही नव्हे आता' ॥

१० 'नारायणा आम्हा नाही वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली' ॥

या विराण्यांच्या उद्गारांकडे पाहता त्यांची प्रियकराशी 'वेगळीक' अशी कोठेही उरलेली दिसत नाही. आणि वियोगच नाही तर विरह कसला ? "सर्व सुख आम्ही भोगू सर्वकाळ" असे त्या धाल्या मनाने निश्चयपूर्वक सांगत आहेत. त्यांच्या या अभंग उद्गारांमध्ये तळमळ नसून तृप्ती आहे, आर्तता नसून अनुभूति आहे, विरहवेदना नसून चिरसंयोगाची दीप्ति आहे ! त्यांचे हे उद्गार म्हणजे आत्मानंदाचे ढेकर !

सेवासुखें करू विनोदवचन ।
आम्ही नारायण एकाएकी ॥
तुका म्हणे जालो उदास मोकळ्या ।
विचरों गोवळ्या सवे आम्ही ॥

या शब्दांनी गोपाळाशी अविरत क्रीडा करणाऱ्या त्या 'विराण्यां' नी हे स्पष्टपणे घोषित केले आहे की, ही वियोगाची वाणी नसून केवळ 'विनोदवचन' आहे ! कारण त्या नारायणाशी आम्ही एकरूप झालो असल्याने वियोगाचा प्रश्नच उद्भवत नाही !

तुकारामांच्या 'विराण्यां'चा पूर्वग्रहरहित बुद्धीने विचार केल्यास ही गोष्ट मान्य करणे अपरिहार्य ठरते. आणि असे एकदा मानले की, मग 'विराणी म्हणजे विरहिणी दर्शन-समागमसुखाला पारखी झालेली पण प्रियकराच्या त्यासाठी जीव झुरविणारी प्रेमळ प्रिया'[१२] किंवा "विवाहित पतीवर प्रेम न करता प्रेमाच्या सख्यासाठी झुरणारी स्वैरिणी"[१३] असले अर्थ आपोआपच लटपटू लागतात.

---

[१०] गोकुळच्या गौळणी पृ ६७ व ७५,
[११] सरकारी तु. गाथा, पृ. २ ते ५.
[१२] गोकुळच्या गौळणी पृ. ६५
[१३] पाच संतकवी पृ. ३६८

जेथे 'वेगळीक'च नाही तेथे "विरहिणी का जैसी वल्लभाते" (ज्ञाने. १३) तद्वत् 'झुरणे' कुठले? मग विराणी शब्दाची विरहिणी ही व्युत्पत्ती तरी कशी तग धरणार?

तुकारामांच्या वेगळ्या 'विरहिणी'

तुकाराम विरह – भावनेला पारखे होते किंवा त्याच्या गाथेत विरहिणीच्या वर्णनाचाच मुळी अभाव आहे असा मात्र याचा अर्थ नव्हे. तुकारामांची पराकोटीची विरहावस्था अनेक अभंगामधून सरळ सरळ व्यक्त झाली असून त्याखेरीज त्यांची 'विरहिणींची रूपके' देखील प्रत्ययकारी आहेत. हिंदी साहित्याच्या इतिहासातील तत्कालीन विशिष्ट कालखंडाप्रमाणे भारत–वर्षात प्राय: सर्वत्रच या–ना–त्या रूपाने 'रीतिकाल' वा 'रतियुग' सुरू झाले होते. त्याचे प्रतिध्वनी संतकवींच्या वाणीतही उमटलेले आहेत. 'बाळा मुग्धा यौवना प्रौढा सुंदरी' या नायिका–भेदांचा उल्लेख समर्थ रामदासस्वामींनी देखील आपल्या आरतीत [१४] केला आहे; मग तुकारामांनी 'सखी' वा 'दूती' यांचा उपयोग केल्यास नवल काय? त्यांच्या काही विरहिणी[१५] अशा आहेत—

१ 'हरिबिन रहिया न जाये जिहिरा।
कबकी ठाडी देखे रहा,
कोई सखी हरि जावे बुलावन।
वारहि डारूं उसपर तनमन॥

२ 'विरहतापे फुंदे छंद करित जाती।
हागे तोगे सावधान सवेचि दुश्चिती॥
न सांभाळुनी अंग लोटी, पाहे भोवती।
वेगळीच पडो पाहे कुळाहुनिया ती॥'

३ 'नका काही उपचार माझ्या शरीरा।
करू न साहती बहु होतो उबारा॥
मनोजन्य व्यथा वेघ जाला अंतरा।
लवकरी आणा नंदाचिया कुमरा॥'

४ 'घाली कवाड टळली वाड राती।
कामे व्यापिली का पडली दुश्चिती।
कोणे लागलागे सदैवेचे हाती।
आजि शून्य शेजे नाही दिसे पती वो॥
बोले दूतिकेसी राधा हे वचन॥'

[१४] श्री रामदासाचे समग्र ग्रंथ, चित्रशाळा प्रकाशन पृ. ५१२

[१५] सरकारी गाथा, अभंग; क्र. ३८२, ३९२, ३८४, ३८७

तुकारामांच्या ह्या विरहिणींचा तोंडवळा ज्ञानेश्वरादि संतकवींच्या 'विरहिणींशी तंतोतंत मिळताजुळता आहे. परंतु तुकारामांच्याच ठसकेबाज व फटकळ 'विराण्यां'ची जात मात्र याहून अगदीच भिन्न आहे हे तेव्हाच लक्षात येते. अर्थात् 'विरहिणी' व 'विराण्या' हे दोन अगदीच भिन्न अवस्थांचे अथवा भावांचे निदर्शक असे काव्यप्रकार आहेत याची खूणगांठ येथे बांधायला हवी. तद्वतच 'विराणी' व 'विरहिणी' हे दोन शब्द देखील सर्वस्वी वेगळे व स्वतंत्र असून व्युत्पत्तिदृष्टचा त्यांचा परस्परांशी संबंध असण्याचे काही कारण दिसत नाही हे देखील लक्षात घ्यायला हवे. तुकारामांच्या 'विराण्यांना' आधी चुकीने विरहिणी ठरवून नंतर इतर संतांच्या 'विरहिणीं'ना देखील 'विराण्या' म्हणण्याचा जो प्रघात पडला तो भ्रांतिमूलक आहे. 'विराण्या' ही साहित्याला मिळालेली तुकारामांची खास देणगी असल्याने, "विराण्यासारखी त्यांची काव्ये केवळ रूढीला धरून रचलेली आहेत, ती लिहिण्यात त्यांची स्वत:ची प्रेरणा अशी मुळीच नाही... तुकारामादि संतकवींनी परंपरा पाळण्यापलीकडे अधिक काहीही केले नाही",[१६] असली चूक विधाने, मग ती कितीही सद्भावमूलक असली तरी, बदलून घ्यावी लागतील.

'विराणी'च्या विविध व्युत्पत्ती

विराणीचा 'विरहिणी' शब्दाशी व्युत्पत्तिदृष्टचा कसलाही संबंध असण्याचे कारण दिसत नसल्याने, त्या शब्दाची अन्य व्युत्पत्ती शोधणे क्रमप्राप्तच ठरते. 'मराठी व्युत्पत्तिकोश' (सं–कृ. पां. कुळकर्णी) किंवा महाराष्ट्र ज्ञानकोश (सं. श्री. व्यं. केतकर) या सारख्या कित्येक महत्त्वाच्या कोशातून हा शब्दच आढळत नाही. 'महाराष्ट्र शब्दकोशात' (सं. य. रा. दाते आदि) मात्र विराणी शब्दाशी जवळीक दाखविणारे काही शब्द आहेत. 'विराणी' हा शब्द देखील त्यात आहे. परंतु त्याचा अर्थ मात्र येथे अगदीच अप्रस्तुत आहे. "दाढ भाजण्यापूर्वी आग पसरू नये म्हणून जी सभोवतीची जागा भाजतात ती" – हा कोशगत अर्थ प्रस्तुत विषयाला अगदीच गैरलागू आहे. 'विराणी' हा शब्द 'प्रवासी' या अर्थाने देखील कोठेकोठे वापरतात, परंतु तोही अर्थ येथे लागू पडत नाही. 'विराण' हा शब्दही तसाच. 'विराण–वैराण म्हणजे ओसाड, उजाड.' सर्व-

[१६] पाच संतकवि, पृ. ३७८.

संगपरित्यागी 'विराण्या' ह्या 'दोन्ही कुळे' बुडवून उदास मोकळ्या' झाल्या असल्या तरी त्यांचे जीवन, 'विराण' झाले होते असे म्हणवत नाही. कारण 'विराण्यांचा' खरा भर 'मरणाहि आधी राहिलो मरूनी' या शून्यत्वावर नसून 'हरिरता' होण्यावर आहे. 'संवसारा आगी आपुलेनि हाते। लावूनि मागुने पाहू नये' अशी स्वानुभूत सावना त्या सांगत असल्या तरी त्या गतगोष्टी आहेत. सद्यःस्थितीत 'सर्वसुख आम्ही भोगू सर्वकाळ' किंवा 'हासो, रुसो आता वाढवू आवडी' या सुखनिर्भरतेने त्यांचे जीवन फुलून गेले आहे आणि त्या 'सेवासुखे विनोदवचन' करीत 'हरीशेजारी' वसल्या किंबहुना 'नारायण' रूप होऊन 'सर्वावर सर्वसत्ता करू' लागल्या आहेत. तेव्हा येथे 'वैराण' दशेला वाव कुठला?

महाराष्ट्र शब्दकोशात 'विरहण' हाही शब्द दिला आहे. 'विरहण' म्हणजे आळ, आरोप. "ज्याही चोरिले त्यासी सोडीले। विरहण आले मजवरी॥" (हरिविजय ९-१८६) या प्राचीन मराठीतील विरहण शब्दाचा 'विराणी'शी काही संबंध असावा काय? 'वाळो जन मज म्हणोत शिंदळी' या लोकापवादाच्या उल्लेखाने आत्मनिवेदनास प्रारंभ करणाऱ्या 'विराण्या' आरोपांच्या नाकावर टिच्चून आपल्या 'निःसंगपणा'-चे समर्थन करीत आहेत. 'लाज सांडियेली,' 'लौकिक सांडिला,' 'न सरती लोकामाजी जाले' या गोष्टींचा त्या पुनःपुन्हा निधडपणाने उच्चार करून 'सासुरवासिनीं' ना सांगत आहेत की 'लौकिकाची चाड' आहे किंवा 'लौकिकापासून आराणुक' होत नाही तोवर तुम्ही आमच्या मागे येऊ नका. 'न साहवे तुम्हा या जनाची कूट। बोलती वाईट वोखटे ते॥' आम्ही मात्र ते 'वाईट सोसले' आणि 'अवीट सुख' साधले. 'आळ आला होता आम्ही भांडखोरी। तुका म्हणे खरी केली मात' याप्रमाणे आळ अथवा आरोप याचे सूत्र या विराण्यांमध्ये अनुस्यूत असल्याने या आरोपी स्त्रियांना 'विरहणी-विरहण्या-विराण्या' म्हणता येणे अशक्य नाही.

महाराष्ट्र शब्दकोशात (विभाग ६) विराणा हा देखील एक शब्द आहे. 'विराणा-विरंणा (पु.) = लिंगायताचा एक देव, साधु' असा अर्थ त्यात दिलेला आहे. 'मराठी शब्दरत्नाकरा'त सुद्धा (मं. वा. गो. आपटे) 'एक देवता' असाच याचा अर्थ आहे. समर्थांच्या दासबोधांत [17] 'एक म्हणती विरंणा कर्ता' आणि 'रामदासांचे समग्र ग्रंथ' यातील पंचमान प्रकरणात "ईश्वरू गिरजा गंगा वीरंणा स्वामिकार्तिकु" [18] या प्रमाणे विरंणा देवाचा उल्लेख आढळतो. समग्र ग्रंथातील तळटीपेत 'वीरभद्र, वीरण्णा हा कानडी शब्द' असा यासंबंधी खुलासा दिला आहे.

समर्थांनी शिवपरिवारातील देव म्हणूनच 'वीरंणा'चा उल्लेख केला हे संदर्भावरून स्पष्ट होते. कदाचित् कार्तिकस्वामीचे विशेषण म्हणूनही हा शब्द येथे आला असणे शक्य आहे. कार्तिकेयाचे 'स्कंद' नामाभिधानच 'खंडोबा' होऊन शिवाला चिकटले. त्या खंडोबाच्या अथवा मल्हारीच्या त्या 'मुरळयां' प्रमाणेच 'वीरण्णा'च्या 'विराण्या' देखील तुकारामांच्या पूर्वी समाजात वावरत असतील का? हा संशोधनाचा विषय आहे. 'वरिले सावळे', 'जाले देवपिशी,' 'रातले अनंता', 'राहिलो अनंताचिये पायी,' 'नाही पाठीपोटी कोणी दुजे', 'आमुचे नाचणी नाचू नका,' 'वाळो जन मज म्हणोत शिंदळी' आदि विराण्याच्या उद्‌गारांमधून त्या देवदासींच्या जीवनाचे संकेत मिळण्यासारखे आहेत. इतिहासाने अनुकूल कौल दिल्यास 'विराणा' शब्दाचे स्त्रीलिंगी रूप म्हणून 'विराणी' हा शब्द समर्पकपणे व्युत्पादिला जाणे सहज शक्य आहे.

'वीर' शब्दाचे स्त्रीलिंगी रूप म्हणून देखील 'वीराणी' शब्द उपयोजिता येणे अशक्य नाही. इंद्राणी, विदुराणी या सारखे काही त्या धाटणीचे शब्द ग्रंथांत तरी सहज आढळतील. या विराण्यांच्या फटकळपणातून त्यांची वीरश्रीच डोकावते. 'भेऊ नये तेथे भेडसावू कोणा' हे त्यांच्या निर्भयतेचे प्राणतत्व आहे 'आम्ही भांडखोरी' 'आम्ही जिवाच्या उदार', 'नाही भय आस जीवित्वाची', 'मरणाही आधी राहिलो मरोनि' 'उतरोनि करी घ्यावे सीरा' इत्यादि वचनांमधून त्यांचे वीरहृदय उसळत आहे. 'मन कठीण' करून 'मागीलांची आस' सोडण्यात, 'मोहपाश जाळ' तोडण्यात व 'लाजमय चिता' सांडण्यात तसेच 'हाचि नेम आता न फिरे माघारी' या कणखर निर्धाराने 'अनावर' होण्यात देखील तीच तेजस्वी मनोवृत्ती काम करीत आहे. 'पतंग हा नीट दीपासोयी' त्याप्रमाणे 'प्रसंगी या नाही देहाची भावना' हा वीरांचा स्वानुभव या 'विराण्यां'च्या रोमरोमी भिनलेला आहे! या दृष्टीने 'वीर स्त्रिया' म्हणून 'विराण्या' शब्द योजला असावा काय?

[17] दासबोध १३-८-१४

[18] समग्रग्रंथ पृ. ७२

वीर अथवा वीरंणा शब्दापासुन विराणी शब्द निर्माण झाल्याची जाण तुकारामांना असती तर संबंधीत अभंगांमध्ये कोठेतरी वीरत्वसूचक शब्द आला नसता का ? ही शंका मनात आल्याखेरीज राहत नाही. वनमाळी, अनंत, हरि, गोविंद, परब्रह्म वगैरे नामांचाच या अभंगात सर्वत्र वापर केला आहे. 'सर्वविशी ह्या संपन्न' असल्याने 'दुजा ऐसा कोण वळी आहे आता ?' या प्रश्नातून हरीचेच सर्वसमर्थत्व दर्शविले आहे. 'बळियाचा अंगसंग जाला' आणि बळियाच्या आम्ही जालो वळिवंता' इत्यादि उदगारांमधून 'वीरां'चा नव्हे परंतु 'बळिया'चा उल्लेख मात्र पुन:पुन्हा करण्यात आला आहे ही बाब विचारणीय वाटते.

'विराणी' = वि+राणी = विशिष्ट किंवा वेगळी राणी अर्थात् राणीपद घेणारी अन्य स्त्री, या व्युत्पत्तीला देखील विराण्यांच्या अभंगात आधार मिळण्यासारखा आहे. 'बळियाच्या वळिवंता' झालेल्या या विराण्या 'वळे पट्टराणी' बनल्याचा अनुभव स्वत:च सांगत आहेत. 'सर्व करू सत्ता सर्वावरी' व सर्वसुख आम्ही भोगू सर्व काळ' असा आपल्या राजवैभवाचा डांगोरा देखील त्या नि:शंकपणे पिटत आहेत.

'विनारी' शब्दापासून देखील वर्णविपर्ययादि भाषाशास्त्रीय नियमानुसार विराणी शब्द व्यवहृत होणे असंभव नाही. परनारी किंवा स्वनारी यापैकी कोणत्याही एका शब्दाने जिचा सार्थ निर्देश करता येत नाही अशी 'अनुसरलेली अन्यस्त्री' म्हणजेच विनारी ! सावत्रमातेला 'विमाता' शब्द साहित्यात लावलेला आढळतो. त्याप्रमाणें हा शब्द देखील अभिसारिका अथवा व्यभिचारिणी स्त्रीस लावला जाणे शक्य आहे. या विराण्यांचे स्वरूप निश्चित पणे अभिसारिकांचे आहे हे प्रत्येक अभंगातून दिसून येते ! "आधिल्या भ्रतारे काम नव्हे पुरा । म्हणोनि व्यभिचाराटेकलिये " । "याचसाठी सांडियेले भरतार । रातले या परपुरुषासी". 'परपुरुषाचे सुख' भोगण्यासाठी संवसारा आगी' लावली, 'सांडवर' म्हणजे वराचा त्याग करणारी होऊन 'घररिघी जाले ' ! ' व्यभिचार माझा ठाउका' पडल्याने लोक आता मला खुशाल 'शिंदळी' म्हणोत, पण 'मी तो माझ्या भावे अनुसरले!' असे निर्भयपणे ह्या विराण्या ठणकावीत आहेत.

'विरानी' ह्रा शब्द देखील भाषेत रूढ आहे. 'नालंदा विशाल शब्दसागर' (सं. श्री. नवलजी), 'हिंदी शब्दसागर' (सं. रामचंद्र वर्मा) 'भाषा शब्दकोश' (डॉ. रामशंकर शुक्ल 'रसाल') 'हिन्दुस्थानी-मराठी-शब्दकोश' (अ. महाराष्ट्र हिंदी प्र. समिती-पुणे) 'सुलभ हिंदी मराठी कोश' (सं य. रा. दाते) उर्दू-हिंदी कोश' तसेच 'प्रामाणिक हिंदी कोश' (रामचंद्र वर्मा) इत्यादि कोशांनी 'बिराना' शब्द दिला असून बहुधा 'फारसी विशेषण' म्हणून त्याची संभावना केली आहे. डॉ. 'रसाल' यांनी फारसी 'बेगाना' शब्दाचे ते देशीरूप मानले असून श्री. नवलजी यांनी ते हिंदी भाषी विशेषण ठरविले आहे. 'बिराना' म्हणजे परका, पराया, अपरिचित, दुसरा हा अर्थ सर्वांनाच मान्य आहे. वि-नारी किंवा वि-राणी हा शब्द अपभ्रंशाच्या नियमांनी परिवर्तित होऊन 'बिरानी' बनणे माझ्यामते सहज शक्य आहे. आणि मावशी शब्दावरून पुल्लिंगी मावसा शब्द प्रचारात यावा तद्वत् व्युत्क्रमाने 'बिराना' शब्द प्रचलित होणे देखील असंभव वाटत नाही. या उलट, तो फारसी भाषेतून अपभ्रंशाने आलेला वा हिंदीचा देशज शब्द मानला तरीही 'विराणी' शी विरानी शब्दाचे नाते निकटचे आहे हे सिद्ध होऊ शकते.

'विराना' शब्दाविषयी 'नालंदा विशाल शब्द सागराने' 'कवितामें प्रयुक्त होनेवाला शब्द' असा अभिप्राय दिला असला तरी, हा शब्द बोलचालीच्या भाषेत सुद्धा रूढ आहे. हिंदी-भाषी लोकातच नव्हे तर मराठी प्रदेशात देखील लोक त्याचा उपयोग करतात. विदर्भात 'ती विरानी आहे काय ?' अशाप्रकारची वाक्य ग्रामीणांच्या बोलभाषेत सर्वत्र आढळतील- 'करना फकिरी भजना साहब, क्या विरानी बात रे' ! अशा संत कवीरांच्या पदातून हा शब्द सामान्य जनतेत पोचला असणे शक्य आहे. संत तुकाराम तर कवीरांचे विशेष चाहते होते. आपल्या 'खेळिया' मधून ज्या चार संतकवींच्या साहित्याची तुकारामाने शिफारस केली त्यात कवीर देखील एक आहेत. अन्यत्र सुद्धा तुकारामांनी कवीरांचा सादर उल्लेख केला असून त्यांच्या वाणीवर कबीरांचे संस्कार कसे झाले आहेत हे पांगारकरांनी तुकाराम चरित्रात व मराठी वाङमयाच्या इतिहासात सप्रमान दाखविलेच आहे. कवीरांचा मागोवा घेत तुकारामांनी केलेल्या हिंदी पद्यामधूनही या 'विरांनी' शब्दाचे दर्शन होते-

(पान ३०८ वर)

बाबा पदमनजी आणि विष्णुबुवा ब्रह्मचारी

सौ. रजनी घुई

बाबा पदमनजी आणि विष्णुबुवा ब्रम्हचारी दोघेही एकाच कालखंडातील. विष्णुबुवांचा जन्म इ. स. १८२५ मधे तर बाबांचा जन्म इ. स. १८३१ मधे. दोघांच्या वयात फारसे अंतर नाही पण दोघेही दोन टोकाला उभे असलेले. एक ख्रिती धर्माचा पूर्णतया अंगिकार करणारा तर दुसरा हिंदुधर्माचा हिरीरीने पुरस्कार करणारा. दोघांच्याही प्रवृत्ती व स्वभाव अगदीच भिन्न.

बाबांचा जन्म कासार जातीत झाला. ते घरी संस्कृत व कानडी शिकत. पुराणेही वाचत. प्राथमिक शिक्षण बेळगावच्या शाळेतच झाले. पण पुढे मिशनऱ्यांच्या इंग्रजी शाळेत प्रवेश. पण तरीही हिंदू धर्माचा पगडा गच्च होता. मिशनऱ्यांनी हिंदू धर्माची केलेली निंदा ऐकून त्यांना राग येई. मुंबईला एल्फिन्स्टन स्कूलमध्ये असताना रामदास, तुकाराम, मोरोपंत वगैरेचा त्यांनी अभ्यास केला होता. असे असताना ख्रिस्ती धर्माची एवढी मोहिनी त्यांच्यावर का पडली ? कोणत्या गोष्टींचा परिणाम त्यांच्या मनावर झाला ? धर्मांतर करण्याजोगी अशी कोणती परिस्थिती त्या काळात कारणीभूत झाली ? मुंबईच्या धर्मसुधारणेच्या लाटेत ते प्रवाहपतिताप्रमाणे सापडले की जाणूनबुजून त्यांनी ही उडी घेतली ?

महाराष्ट्रात इंग्रजी अंमल सुरू होण्यापूर्वीच ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी मुंबईस आपल्या धर्मप्रसाराच्या चळवळीचा झेंडा रोविला होता. १८१३ मधे 'मुंबई बॅबल सोसायटी' व 'अमेरिकन मराठा मिशन' या दोन संस्थाद्वारे पाश्चात्य संस्कृतीचे लोण मराठ्यांच्या घरोघर नेऊन पोचविण्याचा प्रयत्न होत होता. इंग्रजांचे बस्तान नीट बसले नव्हते. एल्फिन्स्टन प्रभृती इंग्रज लोकांचा पाठिंबा नव्हता. परंतु मिशनऱ्यांनी हिंदू लोकांची सहानुभूती मिळविण्याकरिता प्रथम मराठी भाषेचा परिश्रमपूर्वक अभ्यास केला. उपेक्षिलेल्या खेड्यापाड्यातील अज्ञ जनतेत त्यांनी साक्षरतेचा प्रसार केला. हजारो रुपये खर्च करून या मंडळींनी ठिकठिकाणी छापखाने काढले; पुस्तके विनामूल्य वाटली; खेडोपाडी शाळा काढल्या; मोफत औषधे दिलीत. ज्या लोकांना वरिष्ठवर्णीयाकडून सहानुभूती मिळत नव्हती उलट उच्च वर्णीय लोक चार पावले दूर राहत त्यांची दलितांची–ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी मने आकर्षून घेतली. ख्रिस्ती धर्मप्रसारक हेच आपले खरे हितचिंतक व मार्गदर्शक होत असा त्यांचा पक्का समज करून दिला. अशा रीतीने त्यांनी आपला धर्मप्रचार धीमेपणाने पण अव्याहतपणे सुरू ठेवला होता. अशिक्षितांना सेवावृत्तीने जिंकावे व सुशिक्षितांना युक्तिवादाने कुंठित करावे असा ख्रिस्ती धर्मोपदेशकांचा दुहेरी डाव. हळूहळू सरकारचा विरोधही मावळला; सरकारचे धोरणही त्यांना पोषकच होत चालले होते. इंग्रजांनी युद्धात आपला पराभव केला त्याअर्थी दरएक बाबतीत ते श्रेष्ठ असा न्यूनगंडही लोकात निर्माण झाला होता. पाश्चात्यांचा धर्म व संस्कृती उच्चच असणार अशी ठाम समजूत. या मानसिक दुबळेपणाचा ख्रिस्त्यांनी भरपूर फायदा घेतला.

अशी परिस्थिती असतानाच बाबांच्या वडिलांची एडनला बदली झाली. त्यामुळे बाबांना शाळा बदलावी लागली. पुन्हा मुंबईला आल्यावर मिशनच्या फ्री चर्च विद्यालयात नाव दाखल केले. तेव्हा मुंबईला परमहंस सभेसारखी जातीचे संस्कार मोडणारी सभा काम करीत होती. ज्ञानोदय, प्रभाकर, ज्ञानप्रकाश यातून धर्मसुधारणेचे वाद चालत होते. याचा परिणाम बाबांच्या मनावर झाला. पुढे तर ते एका वर्गास बायबल शिकवू लागले. बायबलचा गाढ अभ्यास केला. डॉ. मिचेल, रे. निस्बिट, ज्ञानोदयाचे संपादक ह्यूम यांशी स्नेह जडल्यावर ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेची प्रमाणे दिसू लागली. ते वृत्तपत्रातून लिहीतही– "ज्ञानोदयाने माझी ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेविषयी व हिंदुधर्म ईश्वरप्रणीत नाही याविषयी खात्री केली. 'प्रभाकरा'ने माझ्या

मनात ब्राम्हणाविषयी जी पूज्य बुद्धि होती ती नष्ट केली. आणि 'ज्ञानप्रकाश' ने नास्तिक मताकडे माझी प्रवृत्ती होऊ दिली नाही" असे बाबांनी आपल्या 'अरुणोदया'त लिहिले आहे.

ख्रिस्ती वाङ्मयनिर्मितीमध्ये बाबा पदमनजी यांचा वाटा फार मोठा आहे. 'अरुणोदय' या आत्मचरित्रात त्यांनी आपली हिंदुधर्मावरील श्रद्धा हळूहळू कशी कमी झाली व डॉ. विल्सन, डॉ. मिचेल इ. च्या सान्निध्यामुळे आपण ख्रिस्ती धर्माकडे कसे आकर्षिले गेलो हे सांगितले आहे. रे. ना. वा. टिळक बाबांच्या विषयी लिहितात 'रे. बाबा पदमनजी म्हणजे मराठी ख्रिस्ती सारस्वताचे जनक होत. त्यांच्या हातून बनलेली मराठी पुस्तके वजा केली तर आज मराठी ख्रिस्ती वाङ्मय असून नसल्यासारखे होईल...... त्यांनी एकटयाने लिहिलेली लहान मोठी पुस्तके शंभरावर आहेत. ('अरुणोदय', पृ. २४७-२४८) 'ऐक्यवर्धक पत्रिका' व सत्यदीपिका' ही नियतकालिके, क्रमिके पुस्तकांपासून कोशवाङमयापर्यंत विविध प्रकारचे लेखन, तसेच 'हिंदुधर्म व ख्रिस्ती धर्म यांची तुलना' व 'कृष्ण व ख्रिस्त यांची तुलना' हे निबंध, 'मतपरीक्षा' इ. ग्रंथ, ब्राम्हणाचे महत्त्व, मूर्तीचा उच्छेद, होळी विषयी उपदेश, तुळशीचे लग्न इ. अनेक टीकात्मक पुस्तके, 'यमुनापर्यटन' — जिने आद्य कादंबरीकार म्हणून त्यांना मान मिळवून दिला ती सामाजिक कादंबरी, इ. विविध वाङ्मयीन कामगिरी त्यांनी केली. पण उद्दिष्ट एकच: ख्रिस्ती धर्माचा प्रसार.

या उलट विष्णु बुवांना स्वधर्माचा अभिमान विलक्षण ,बाबा प्रत्येक ठिकाणी म्हणतात की हिंदुधर्माविषयी मला अभिमान आहे वगैरे —— परंतु त्यांची कृती काय दर्शविते ? ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याच्या अगोदर तसा अभिमान त्यांना होता पण एकदा त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला नि त्यांनी त्या 'स्वधर्मा'चाच अभिमान पाळला! त्यामानाने विष्णु बुवांचा स्वधर्माभिमान व्यापक वाटतो या बाबतीत थोडासा जातीचाही प्रश्न आड आलेला असावा असे वाटते. कितीही झाले तरी बाबा कासार जातीतील, तर बुवा ब्राम्हण जातीतील. हाही फरक घ्यानात घ्यावयाला हवा.

ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराला व हिंदू असून ख्रिस्ती झालेल्या ख्रिस्ती धर्मानुयायांच्या (करमरकर, शेषाद्री मोडक, बाबा पदमनजी वगैरे) प्रयत्नांना पायबंद घालण्याच कार्य विष्णु बुवांनी केले.

वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन व ख्रिस्ती आक्रमणाचे उच्चाटन या दुहेरी कार्याकरिता मोरभट दांडेकर, नारायणराव, भाउ महाजन, गंगाधर शास्त्री फडके, कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी स्वतःला वाहून घेतले. त्यातल्या त्यात पहिला मान विष्णुबुवांनाच दिला पाहिजे. कारण संभाषणे, लेख, वादविवाद, व्याख्याने इ. अनेक मार्गाने ख्रिस्त्यांचा त्यांनी पिच्छा पुरविला व त्यांचाच कोटिक्रम त्यांच्यांवर उलटवून त्यांना वेळोवेळी निरुत्तर केले. बुवांच्या सतत पंधरा वर्षांच्या परिश्रमामुळे ख्रिस्ती धर्म प्रचाराची प्रबळ लाट ओसरली व सामान्य जनांची संशयानुकूल दृष्टी पुन्हा स्वधर्माकडे आत्मीयतेने व अभिमानाने वळण्यास बरीच मदत झाली.

वैदिक धर्मावरील ख्रिस्तानुयांच्या आक्षेपांचे खंडन करुन त्याची श्रेष्ठता लोकांच्या मनावर बिंबवावी म्हणुन विष्णु बुवांनी २० सप्टें. १८५६ पासून दर शनिवारी परमु लोकांच्या विद्यालयात व्याख्याने देण्यास सुरवात केली.. या व्याख्यानांची व्यवस्था सोकर बापूजी त्रिलोकेकर, शामराव मोरोजी त्रिलोकेकर, आणि आत्माराम सदानंद हे विद्यालयातील शिक्षक ठेवीत.

विष्णु बुवांनी स्वकीयांचे वेळोवेळी समर्थन केले, परंतु सवंग लोकप्रियतेच्या नादी लागून त्यांनी लोकांच्या मूर्खपणाला व दांभिकतेला प्रोत्साहन दिले नाही. त्यांची दृष्टी संकुचित नव्हती, फक्त जेथे तेथे परकीयांचा वरचष्मा त्यांना नको होता ; आम्हीही आमच्या महत्वाच्या प्रश्नांचा स्वतंत्रपणे व जबाबदारीने विचार करू शकतो ही गोष्ट त्यांनी सप्रमाणे सिद्ध करावयाची होती.

बाबांचे जितके शिक्षण झाले होते तितकेच काय पण एक शतांशही शिक्षण बुवांचे झाले नव्हते. घरच्या परिस्थितीतही जमीन—अस्मानचे अंतर. बुवांना नवव्या वर्षापासूनच नोकरी करावी लागली. वयाच्या तेविसाव्या वर्षी घरदार सोडून ते आत्मसाक्षात्कारासाठी बाहेर पडले; सप्तश्रृंगीच्या डोंगरावर त्यांना आत्मज्ञान झाले.

एकनाथी भागवत, भावार्थरामायण, दासबोध इ. ग्रंथांचा बाबांनी जसा अभ्यास केला होता तसाच बुवांनीही अभ्यास केला होता. पण बाबांच्या मनाला ते ग्रंथ 'शांती' देऊ शकले नाहीत. त्यांना येशूच्याच चरणी

लीन व्हावे लागले. बुवांना तर बाबांप्रमाणे संस्कृत व इंग्रजी विद्याही अवगत नव्हत्या. मग 'वेदोक्तधर्मप्रकाश' सारखी ग्रंथरचना त्यांनी कशी केली ? तर केवळ अंतःस्फूर्तीच्या बळावर. आपल्या परीने जीवनाचे एक सर्वांगीण आणि अनेक बाबतीत पुरोगामी, असे तत्वज्ञान त्यांनी आपल्या गद्यपद्य ग्रंथातून मांडले. मात्र आपल्या तत्वज्ञानाचे मूळ वेदात आहे असा त्यांचा आग्रह होता. या वेदोक्त धर्माला विरोध करणारा धर्म म्हणून त्यांनी ख्रिस्ती धर्मप्रसाराला भाषणे व वादविवाद यांच्या साह्याने विरोध केला. या प्रयत्नामुळे बरीच धार्मिक जागृती घडून आली असावी. ते 'बोले तैसा चाले' या कोटीतील पुरुष होते. आचार विचारात सुसंगती, स्वयंभूप्रज्ञा, तीव्रस्मरणशक्ती, असाधारण वक्तृत्व, व वादकौशल्या हे त्यांचे विशेष. त्यांच्या अफाट महत्वाकांक्षेमुळेच बहुधा लोक त्यांना विक्षिप्त म्हणत.

मिशनऱ्यांच्या हिंदुधर्म नालास्तीच्या अडचांचे विरोधक म्हणून वादविवाद करण्यात किंवा दोषस्थळे दाखविण्यात बुवा मोठे वस्ताद. त्यांना चूप करण्यात आपली बुद्धिमत्ता व हजर जबाबीपणा खर्च करण्यात त्यांना मोठा आनंद. त्यांच्याशी वाद करता यावा म्हणुन त्यांनी धर्माचा 'अभ्यास' केला होता. त्यामुळे त्यांन कळले की 'हल्ली' धर्म म्हणतात तो वैदिक; धर्माहून भिन्न आहे. म्हणून प्रचलित धर्माचरणांचा त्यांनी त्याग केला व म्हणूनच 'मनःपुतंम' धर्माचरण केले.

'वेदोक्त धर्मप्रकाश' या नावाचा एक जाडा ग्रंथ लिहिला आहे. त्यात वेदोक्त म्हणून वर्णिलेला लोकाचार पाहिल्यास ब्रम्हचाऱ्याचे वेदाध्ययन यथातथाच झालेले दिसते. तरीही त्यांनी 'वेदोक्त धर्मप्रकाश' इतक्या तपशीलवार लिहिलेला पाहून कौतुक वाटते.

विष्णुबुवा विचारप्रवर्तक होते किंवा कोणत्या पंथाची स्थापना त्यांनी केली म्हणून त्यांना महत्व आहे असे नव्हे तर तत्कालीन समाजात बंडखोरीचे विचार उद्भवत हे दर्शविण्यास त्यांचे उदाहरण पुरे आहे. सर्व जातींकडून, मद्यमांस सोडून, अन्न ते घेत म्हणूनच त्यांना सुधारक समजावयाचे का ? विचारपूर्वक एखादी सुधारणा आपणास पटली व ती अंमलात आणण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न केला तरच तो 'सुधारक'. तत्कालीन लोकांच्या दृष्टीने धर्मबाह्य वर्तन ते बिनदिक्कत करीत व उघड प्रौढी मिरवीत. पण यावरून त्यांना सुधारक कसे म्हणावे ?

एकदा पुर्नविवाहोत्तेजक मंडळी पुर्नविवाहाचा पुरस्कार त्यांच्याकडून करवावा म्हणून त्यांचेकडे गेली तेव्हा ते म्हणतात– " हल्ली नवरे–बायकात अनेक कारणावरून किती वैमनस्य असते ते प्रथम दूर करण्याचा आमचा विचार आहे. तेव्हा विधवा–विवाहाची खटपट यापुढे काय ? चापून विधवा विवाह लावीत जा. ....मुकाट्याने हे प्रकरण चालू द्या.... म्हणजे मजा येईल ..तुमचे काम तुम्ही करा, आमचे काम आम्ही करतो." सुधारकांच्या कार्याविषयी ते अधिक गांभीर्याने विचार करण्यास तयार असते तर ही 'मजा' पाहण्याची भाषा का आली असती ? सुधारकांचे उद्योगात त्यांना विशेष 'राम' वाटत नव्हता हेच खरे.

पण समाजसुधारकांपैकी म्हणून त्यांना महत्व नसले तरी केवळ पुढारलेले असे विचार लोकांपुढे मांडण्याची त्यांची घाटणी पाहून आश्चर्य वाटते. शिक्षण बेताचेच संस्कृत पठणही विशेष नाही. तरीही " सर्वांचे उत्पन्न एकच व एकाचेच ताब्यात राहून त्यातून खावयास विपुल यावे ..ज्याला जो कपडा पाहिजे तो त्याने न्यावा....आगगाडी व तारायंत्रे गावोगाव असावी.. एकसारखे अहिंसक खाणे खावे...... ते सर्वांनी एका कोठारातून न्यावे.. सर्वांची लग्ने करण्याच्या खात्याच्या मार्फतीने राजाने करावी व आवड नसली तर पुन्हा ज्याला जी स्त्री नको त्याला दुसरी करून द्यावी व तिला दुसरा पति करून द्यावा म्हणजे स्वयंवर असावे व सर्वांची पाच वर्षाची पोरे झाली म्हणजे मुलगे व मुली राजांच्या ताब्यात द्यावीत." या विचारांचे सुखदायक राज्य प्रकरण त्यांनी त्या काळात लिहिले. विष्णुबुवा समाजशास्त्रज्ञ नव्हते किंवा इतिहासज्ञ नव्हते. इतिहासाचे वारंवार पारायण करून त्यांनी हे प्रकरण खास काढले नव्हते. कम्युनिस्टांच्या आदर्श समाजाचा पाया बनू शकेल असे हे प्रकरण लिहून त्यांच्या इंग्रजी भाषांतराच्या छापील प्रति इंग्लंडमधील राणीकडे, पार्लमेंटकडे व जबाबदार अधिकाऱ्यांकडे विष्णुबुवांनी पाठविल्या; एवढेच नव्हे तर चीन, अमेरिका, व इतर राष्ट्रांतील प्रमुख पुढाऱ्यांकडेही पाठविल्या. असे करण्यात त्यांचा काही विशेष हेतू होता की काय ते कळत नाही. पण त्यांचा प्रयत्न दांडगा व पद्धतशीर याबद्दल शंका नाही.

विधवांच्या विवाहाची चर्चा बाबांनीही 'यमुनापर्यटन' मधे केली आहे. पण या कादंबरीत बाबांचा विधवा विवाहाचा प्रचार करण्याचा हेतू शुद्ध आहे काय ? त्यावरून त्यांना सुधारक म्हणता येईल काय ? बुवांना

जसे सुधारक म्हणून ओळखणे कठीण तसेच बाबांनाही. कारण 'यमुनापर्यटन' ही द्विविध पर्यटनाची गोष्ट आहे. यमुनेने आपल्या पतीसमवेत सुरू केलेला प्रवास भौगोलिक पर्यटन होय तर मिशनऱ्यांच्या शाळेत शिकलेली यमुना अनेक अनुभवातून जाताना इतरांना येशूचा तारणाचा उपदेश करीत करीत स्वत: ख्रिस्त चरणी लीन झाली हे तिचे वैचारिक पर्यटन. बाबांना सांगायची आहे ती मुख्यत: दुसऱ्या पर्यटनाची कथा. विधवांचा प्रश्न आणि धर्मांतराचा प्रश्न या दोहोंची सांघेजोड बाबांनी या पुस्तकात केली आहे. यामुळे या पुस्तकाला ख्रिस्ती प्रचाराचे स्वरूप आले आहे.

प्रचारकी भाग वगळून विचार करताना ' यमुना—पर्यटनाचा एक विशेष डोळ्यात भरतो. तो म्हणजे कथानकाच्या साध्या सरळ स्वरूपात आविष्कृत झालेला वास्तववाद. ही मराठीतील पहिली स्वतंत्र सामाजिक कादंबरी हे बाबांचे वाङ्मयीन दृष्टीने स्थान मोलाचे आहे.

ख्रिस्ती धर्माच्या तुलनेने त्यांनी आपल्या हिंदु समाजातील अनिष्ट चालीरीती व त्या सुधारण्याच्या योजना यावर १८५१ ते १८५४ या काळात पाच निबंधवजा पुस्तके लिहिली. याही पुस्तकाला ख्रिस्ती धर्मप्रचाराचा चांगलाच वास येतो. किंवा या पुस्तकातून त्यांच्या मनावर ख्रिस्ती धर्माच्या चांगुलपणाची केवढी छाप बसली हे स्पष्टच दिसून येते.

बाबा पदमन्जी व विष्णुबुवा ब्रम्हचारी दोघेही दीर्घनिबंधकार. विष्णुबोवां पेक्षा बाबांच्या विचारांवर लोकहितवादींचा विशेष परिणाम दिसतो. पण दोघांच्या प्रवृत्ती व स्वभाव भिन्न होते. लोकहितवादींचा स्वभाव आक्रमक व शैली ओबडधोबड उलट बाबांचा स्वभाव हळुवार व शैली प्रसन्न. तरीही 'कुटुंबाची सुधारणा' या बाबांच्या ग्रंथावर लोकहितवादींची छाप निर्विवाद दिसते. मिसेस फेरारांच्या परंपरेतील बाबा पदमनजी-मधूर शैली व विचारही स्वतंत्र. परंतु राजकर्त्यांचा धर्म स्वीकारल्या मुळे आपल्या समाजाची आर्थिक व राजकीय दुरवस्था त्यांना जाणवली नाही. त्यांच्या पेशामुळे त्यांचे लेखन समतोल असूनही सर्वांगीण झाले नाही. विष्णुबुवांच्या नावातही असेच घडले. स्वतंत्र प्रज्ञा असूनही आंग्ल शिक्षणाच्या अभावी त्यांच्य विचारांना स्वप्नरंजनाचे रूप आले. त्यांचे लेखन जुन्या वळणाचे झाले. त्यांच्या निबंधाला घाट 'रेखीव' आला आहे. तथापि तडफ, वक्तृत्व, युक्तिवादचातुर्य व आग्रहीपणा हे त्यांच्या शैलीतील गुण मात्र लोकहितवादींची आठवण देतात. 'जुन्या परंपरेतील नवा निबंधकार' या शब्दात विष्णु बुवा ब्रम्हचारी यांचे वर्णन करावयास हवे.

मुसलमानी अंमलात शासकीय कागदपत्र फारशी लिपीत लिहिण्याचा प्रघात सुरू झाला होता; त्यानंतरही पुढे तो कित्येक ठिकाणी तसाच चालू राहिला होता.-हा अनिष्ट प्रघात मोडून टाकून हिंदुस्थानातील राजेरजवाड्यांनी सर्वत्र देवनागरी लिपी प्रचारात आणावी असा विष्णुबुवांचा आग्रह होता. ही त्यांची कामगिरीही संस्मरणीय आहे.

विष्णुबुवांचा स्वभाव काहीसा विक्षिप्त व लहरी. त्यामुळे निरनिराळ्या प्रवृत्तीच्या लोकांशी जुळते घेऊन त्यांचा एखाद्या विशिष्ट कार्याकडे उपयोग करून घेण्याइतकी कार्यकुशलता, धीमेपणा व तारतम्य त्यांच्या अंगी असेल असे वाटत नाही. त्यांच्या सारख्या तडफदार व सडेतोड वृत्तीच्या माणसाचे मन विधायक कार्यापेक्षा आक्रमक कार्यातच रमणे जास्त स्वाभाविक होते ! आणि म्हणूनच वाक्यचतुर वक्ते व प्रभावी प्रचारक म्हणून बुवांचे नाव महाराष्ट्रभर गाजले, पण आर्य समाजासारख्या चिरस्थायी संस्थेची स्थापना करण्याचे भाग्य त्यांना लाभले नाही.

ख्रिस्ती धर्मप्रचारक, आद्यकादंबरीकार, आत्मचरित्रकार, निबंधकार म्हणून बाबांची विशेष योग्यता, तर वाक्यचतुर वक्ता, प्रभावी प्रचारक, पुरोगामी विचारांचा नेता, साम्यवादी विचारांचा प्रणेता, उत्तम निबंधकार म्हणून बुवांची ख्याती.

– अव्वल अंग्रजीतील या दोन टोकांचे स्वरूप हे असे आहे.

अनुक्रमणिका

वैदर्भीय काव्यदर्शन

माधव गोपाळ देशमुख

काव्यरसिक मित्रहो,

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या या वर्धापनदिनी विदर्भातील काही निवडक कवींच्या काव्याच्या गायनाचा हा कार्यक्रम आपणांपुढे सादर करीत असताना विशेष आनंद होत आहे. या कार्यक्रमातील कवींची व कवितांची निवड त्यातील गेयतेला अनुलक्षून रसिकाग्रणी यशवंत देव यांनी केली आहे. येथे निवडलेल्या कवींखेरीज कितीतरी नामवंत अशा जुन्या व नव्या कवींच्या कविता या कार्यक्रमात समाविष्ट करावयास पाहिजे होत्या. कालदर्यादेमुळे यावेळी असे करणे शक्य झाले नाही. पण यापुढे दर वर्षी होणाऱ्या कार्यक्रमात त्यांचा अवश्य समावेश होत जाईल.

संस्कृत साहित्यशास्त्रात वैदर्भी नावाची एक रीती वर्णिली असून श्लेष, प्रसाद आणि माधुर्य हे तिचे प्रमुख विशेष वर्णन केले आहेत. श्लेष म्हणजे 'मसृणत्व', शब्दांचे उच्चार केल्यानंतर ते शब्द एकमेकात गुंतलेले असे न वाटता मोकळे अुच्चारता येणे. प्रसाद म्हणजे काव्याची ओळ ऐकल्यानंतर तिचा अर्थ सहज व चटकन् लक्षात येणे आणि माधुर्य म्हणजे काव्यश्रवणामुळे रसिकांचे चित्त द्रवून जाणे.

महाभारतातील श्रेष्ठ काव्यगुणाचे वर्णन करताना ज्ञानेश्वरांनी असे उद्‌गार काढले आहेत –

> माधुर्यी मधुरता । शृंगारी सुरेखता
> रूढपण उचिता । दिसे भले ॥

हे वैदर्भी रीतीचे यथायोग्य वर्णन ठरते.

आज आपणांसमोर विदर्भातील काही आधुनिक कवींची कविता सादर करण्यात येत आहे; याचा अर्थ विदर्भातील कवींची कविता काही वेगळी आहे म्हणून नव्हे आणि वैदर्भी रीती ही काही विदर्भातील आधुनिक कवींच्याच ठिकाणी आढळून येते असेही नव्हे! कोणत्याही श्रेष्ठ कवीच्या काव्यात आढळून येणारी ही रीती होय. परंतु आज सादर केल्या जाणाऱ्या कवितांत हे गुण कसे प्रतीत झाले आहेत याकडे आपण अवधान द्यावे अशी आपणांस विनंती आहे.

कवी आपल्या प्रतिभेने काव्य निर्माण करतो आणि कवीच्या मनातील अर्थ शब्दरूपी माध्यमामधून रसिकांच्या अंतःकरणात संक्रमित होतो हे तर खरेच. परंतु कवीच्या मनातील अभिप्राय प्रत्यक्ष शब्दांची वाट न पाहता रसिकाच्या मनात प्रतीत होतो. ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे –

> अर्थु बोलाची वाट न पाहे
> तेथ अभिप्रावोचि अभिप्रायाते विये ।
> भावांचा फुलौरा होतु जाये
> मतीवरि ॥

कवीच्या मनातील भाव किंवा अभिप्राय व्यक्त करण्यासाठी शब्दांचे माध्यम हे पुष्कळदा अपुरे पडते. कवीने उपयोजिलेले शब्द हे त्याच्या मनातील अर्थ व्यक्त करण्याच्या दृष्टीने 'अन्यून' आणि 'अनतिरिक्त' असावे लागतात. म्हणजे कवीला जो अर्थ व्यक्त करावयाचा आहे तो त्या शब्दांतून नेमका व्यक्त झाला पाहिजे. त्यासाठी त्याने उपयोजिलेले शब्द उणेही पडता कामा नयेत किंवा अधिकही होता कामा नयेत. हे अशेष शब्दब्रह्म कवीच्या काव्याची मूर्ती साकार करीत असते. परंतु शब्द म्हणजे काव्यातील अर्थ व्यक्त करणारी केवळ ध्वनिरचना नव्हे! तर शब्दांत कवीला प्रतीत झालेले आणि रसिकाला ज्याचा प्रतीती येते असे संगीतही असते. शब्दब्रह्म आणि नादब्रह्म यांच्या समसमा संयोगामुळे काव्यातील अर्थप्रतीती सुकरपणाने होते. एखाद्या श्रेष्ठ कवितेला एकच एक अर्थ असतो असे

म्हणता येत नाही. कवितेत शब्द आणि अर्थ यांचे परस्पर स्पर्धा करणारे साहित्य असले तरी कवितेच्या अर्थाला वेगवेगळी वलये असतात. आणि या अर्थवलयांपैकी एक वलय स्वरांच्या माध्यमातून उकलून दाखविता येते.

कार्लाईल या प्रसिद्ध विचारवंताने 'काव्य म्हणजे संगीतगर्भ विचार होय' असे म्हटले आहे. कवीच्या विचारातील किंवा मनोगतातील ही संगीतगर्भता त्या कवितेला संगीताची चाल लावल्याशिवाय बहुधा आकलन होणार नाही.

अर्थ, शब्द आणि नाद हे कवीच्या मनात अव्यक्तरूपाने वसत असतात आणि या सर्वांची रसिकाला जी प्रतीती येते तीही अनिर्वचनीय स्वरूपाची असते. अव्यक्तादीनि भूतानि । व्यक्तमध्यानि भारत ॥ ज्याप्रमाणे आपले जीवन हे वास्तविक पाहता आरंभी व शेवटी अव्यक्त असते. पण त्याचे जे स्वरूप व्यक्त असते त्यालाच केवळ आपण 'जीवन' म्हणतो, त्याचप्रमाणे कवीला जाणवलेली अर्थप्रतीती अव्यक्तच असते. पण विशिष्ट ध्वनिरचनेने आणि नादरचनेने जेव्हा तो व्यक्त करतो त्याला आपण 'काव्य' म्हणतो.

काव्याचा आपण आस्वाद घेतो तो स्वसंवेद्य आणि अनिर्वचनीय असतो. या आस्वादाच्या किंवा भावप्रतीतीच्या सामग्रीत कवीने व्यक्त केलेल्या शब्दाप्रमाणे नादाचाही समावेश होतो. काव्याचा अर्थ कळण्यासाठी ज्याप्रमाणे एखाद्या शब्दाचा कवीला कोणता अर्थ अभिप्रेत असला पाहिजे याचा आपणाला अर्थनिर्धारण-शास्त्रदृष्ट्या शोध घ्यावा लागतो व शब्दकोशाचा आधार घ्यावा लागतो, त्याप्रमाणे शब्दातील नादाचे आकलन करण्यासाठी संगीताचा आश्रय घेणे उपकारक ठरते. शब्दकोशाच्या किंवा संगीताच्या आधारामुळेच काव्यार्थाचे 'सर्वांगीण' आकलन होते किंवा असा आधार घेतल्याशिवाय काव्याचे आकलन होऊच शकत नाही असा काही सिद्धान्त नाही.

परंतु शब्दाशब्दांतील अर्थच्छटा कळाल्यामुळे ज्याप्रमाणे काव्याची गोडी वाढू शकेल त्याप्रमाणे काव्याच्या अर्थाच्या अनेक पैलूंपैकी एक पैलू किंवा अनेक वलयांपैकी एक वलय काव्याच्या अर्थाला अनुकूल चाल लावल्यामुळे अधिक प्रकाशमान होईल; ते अधिक आत्मसात् करता येईल. या गोष्टीचा आजही आपण प्रत्यय घेऊ शकतो. प्रत्यक्षाला प्रमाण नको.

आधुनिक मराठी कवितेला सर्वसामान्य लोकांत प्रिय करण्याचे श्रेय प्रामुख्याने काव्यगायनाला दिले पाहिजे. कविता जोपर्यंत नियतकालिकांतून प्रकाशित होत होती तोपर्यंत तिचा बोलबाला जनसामान्यापर्यंत होऊ शकला नाही. मराठी कविता आपल्या पहाडी आवाजाने व शाहिरी पद्धतीने गाऊन दाखविल्यामुळे नागपूरचे सुप्रसिद्ध कवी आनंदराव टेकाडे यांनी तिचा जिकडेतिकडे बोलबाला केला. अखिल भारतीय जनतेच्या अफाट लोकसमुदायापुढे मराठी कविता गाऊन दाखविण्याचा पहिला मान शाहीर आनंदराव टेकाडे यांना मिळाला.

१९२० सालची गोष्ट. यावर्षी नागपूरला कांग्रेसचे अधिवेशन भरले होते. लो. टिळकांचा मृत्यू होऊन महात्मा गांधी हे भारताच्या क्षितिजावर उदय पावत होते. लो. टिळकांनी देशभक्तीचो आणि स्वातंत्र्यप्रीतीची जी बीजे पेरून ठेवली होती ती आता अंकुरणार व भारताचा भाग्योदय होणार अशा आशाआकांक्षा उराशी बाळगून राष्ट्राच्या कानाकोपऱ्यामधून त्या अधिवेशनासाठी असंख्य जनसमुदाय लोटला होता. पूर आलेल्या गंगेच्या पात्राप्रमाणे पसरत जाणाऱ्या त्या अफाट जनसमुदायाचे स्वागत करताना आपल्या गगनभेदी गर्जनेने विदर्भशाहिराने त्या राष्ट्रगंगेला पहिले नमन केले—

हे राष्ट्ररूपिणी गंगे घेई नमस्कार माझा..

राष्ट्ररूपिणी गंगेला नमस्कार करताना तिच्या विशाल पात्रात स्वैरपणे पोहण्याची कवीला स्फूर्ती होते परंतु स्वतंत्रतेची मूर्ती असलेली गंगा आता परवशतेच्या काच-कपाटात दडून बसलेली पाहून कवीचा जीव खालीवर होत आहे. स्वातंत्र्याचे दान मागून कोणी ते देत नसते. भारत राष्ट्र हे स्वयंप्रकाशी असल्यामुळे स्वातंत्र्य मिळविण्यास सर्वथैव समर्थ आहे.

सत्तावीस वर्षानंतर भारताला मिळालेल्या स्वातंत्र्याची चाहूल शाहीर आनंदराव टेकाडे यांच्या प्रतिभेला आधीच जाणवली होती. १९४७ मध्ये आलेल्या स्वातंत्र्याच्या पाऊल-खुणा 'राष्ट्र गंगेस !' या कवितेत स्वच्छपणे उमटलेल्या दिसतात.

आजच्या कार्यक्रमातील हे आणि अखेरचे अशी दोन्ही गीते सामूहिक पद्धतीने गायिली जात असून या दोन्ही समूह गीतांचे संगीत नियोजन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक, कवी व संगीतदिग्दर्शक श्री. यशवंत देव यांनी केले आहे.

अनुक्रमणिका

या दोन्ही समूहगीतांसाठी पुढील सुप्रसिद्ध कलावतांनी आपला स्वर दिला आहे—

सर्वश्री चंद्रहास जोशी, त्रिंवक काळे, राजाभाऊ कानगो, गोपाळ कौशिक, बाळ पुरोहित आणि सौ. उषा वडोदकर, सौ. विद्यावती केतकर, सौ. कुसुम चाफळे, सौ. सुधा देव, सौ. उषा पारखी, कु. शोभा कोठेकर, कु. प्रमोदिनी गडकरी व कु. मीना सातोकर.

या कार्यक्रमात पुढील वादक कलाकारांनी भाग घेतला— सर्वश्री प्रभाकर पिल्ले, शंकरराव पोपटकर दत्ता देशमुख, चि. व्यं. वायवार, वडसमुद्रकर, प्रभाकर घोटकर, प्रभाकर घारे, अरूण कोलते, पुरुषोत्तम सामक, बाळ पारखी व सतीश प्रधान.

'राष्ट्रगंगेस !' या कवितेतील गंगा ही गंगोत्रीला उगम पावणारी भागीरथी नसून प्रयागला सखोल यमुनेचा तिच्याशी संगम झाल्यानंतर विस्तार पावलेली आणि सहस्रमुखाने सागराला मिळणारी गंगा आहे. अशा राष्ट्रगंगेला आवाहन करणाऱ्या शाहीराचा आवाजही या ठिकाणी शतमुखांनी व्यक्त होत आहे. तो आपण आता ऐकावा.

हे राष्ट्ररूपिणी गंगे घेई नमस्कार माझा.
स्वैरपणे पोहावे वाटे तुझिया प्रेम-जलां,

सकुंचितपण बघुनी तुझे हे जीव होई वर खाली.
स्वतंत्रतेची मूर्तित्रिभुवनि म्हणनि तुंझी कीर्ती,
परवशतेच्या कांच-कपाटी काय असावी वसती ?

स्वातंत्र्याचे दान कुणा कधि मागुनि कुणि दिघले ?
याचक वृत्ती सोड सोड ही—कुणी तुला हे कथिले।
ध्यान आणि सामर्थ्यं आपुलें स्वयंप्रकाशिनि गंगे !
स्वतंत्रता मिळविण्या समर्था तुझी तूच अभंगे.

१. 'राष्ट्रगंगे'स या कवितेत आपण राष्ट्रभक्तीचा शृंगार पाहिला. राष्ट्रप्रेमाचा दुर्दम्य आविष्कार जसा वीर रसाचा उठाव निर्माण करतो त्याप्रमाणे उत्कट कृष्णभक्तीचा शृंगार राधेच्या आणि श्रोत्यांच्या ठिकाणीही अष्ट सात्त्विकभाव उत्पन्न करतो. विदर्भाचे सुप्रसिद्ध लेखक कै. अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी आपल्या 'मराठी काव्याची प्रभात' या प्रबंधात वीर आणि शृंगार हे दोन प्रमुख रस व्यक्त करणारी शाहिरी कविता अर्थात पोवाडे आणि लावण्या हीच अस्सल मराठी कविता होय; असा सिद्धान्त मांडला आहे. आधुनिक मराठी शाहिरांनी लावण्यातील शृंगाराप्रमाणे स्त्रीपुरुषविषयक लौकिक प्रेमाचे वर्णन व दोन्ही अर्थांनी परपुरुषाशी रममाण होणाऱ्या गोपींची मधुरा भक्ती वर्णन केली आहे.

शाहीर आनंदराव टेकाडे यांची 'मनोदर्शन' ही कविता आता ऐका—

कुठे गे कन्हैया माझा कळेनाच काही
जाऊ दे तयावरी माते मनावीण ठेवी

या शब्दांनी 'कृष्णसखी ही आपल्या प्रियकराचा सगळीकडे हिंडून शोध घेत आहे' अशी कल्पना केली आहे. या गीताला संगीतनियोजक मधुकर गुळवणी यांनी ठुमरीची लचकती चाल दिली असून शोभा कोठेकर व सौ. उषा पारखी यांच्या मोहक स्वरातून कृष्णसखीने घेतलेला शोध हा साकार झाला आहे. केवळ कृष्णसखीच नव्हे तर परमात्मप्राप्तीसाठी आसुसलेला जीव तिच्या रूपाने स्थिरचर व्यापून दशांगुळे उरलेल्या ईश्वराचा सर्वत्र शोध घेत आहे असा ध्वन्यर्थ सूचित करणारी ही कविता आहे. ऐका ही लचकत ठुमकत चालणारी ठुमरी—

मनोदर्शन

कुठे गे कन्हैया माझा कळेनाच काही
जाउ दे तया परि माते मनावीण ठेवी
हरिस्नेह कैसा नसे कल्पना
रुचे कल्पना ती सुखाच्या मना
सुखी कल्पना ती सदा संगती
दिसेना, स्मरेना मनाची गती

कुठे गे कन्हैया माझा कळेनाच काही
जाउ दे तया परि माते मनावीण ठेवी

हरिप्रेम – लाभा नसे भाविले
परि कालयोगे जिवा लाधले
कळेना कसे ते मना रंजवी
जगी एक तेची जिवा लोभवी

कुठे गे कन्हैया माझा कळेनाच काही
जाउ दे तया परि माते मनावीण ठेवी

हरिस्नेह गाथा सुधाजीवनी
चिदानंद सारा गमे जोवनी
हरिस्नेह खेळे मनोमंदिरी
तिथे अंतरीची घुमे बांसरी

कुठे गे कन्हैया माझा कळेनाच काही
जाउ दे तया परि माते मनावीण ठेवी

क्षणापूर्वि वेणू– स्वरूपांतरी
विनापाश मुक्ता रमे वैखरी
कळे तोचि जाई हरी सोडुनी
सवे माझिया तो मना घेउनी

कुठे गे कन्हैया माझा कळेनाच काही
जाउ दे तया परी माते मनावीण ठेवी

हरिस्नेह कैचा मनाचे विना
तयावीण कंठू कसे जीवना
विनाजीव कोणी पुसेना कुणा
तरी भेटवी गे मुकुंदा, मना

कुठे गे कन्हैया माझा कळेनाच काही
जाउ दे तया परि माते मनावीण ठेवी

* * * *

२. प्राचीन भारतीय शृंगारशास्त्रात अष्टनायिकांचे वर्णन केलेले आहे. त्यातील अभिसारिका ही शृंगारिक काव्याचा विषय झालेली आहे. पतीला चोरून परपुरुष असलेल्या आपल्या प्रियकराकडे जाणारी स्त्री म्हणजे अभिसारिका. अशीच एक अभिसारिका अंधाऱ्या रात्री आपल्या कृष्ण-प्रियकराकडे जात असलेली आनंदराव टेकाडे यांनी 'जाणीव' या कवितेत वर्णिली आहे.

अशा घोर रात्रीस जाशी कुठे ?–

अगदी काकुळतीला येऊन राधेची सखी तिची समजूत घालीत आहे. तू कृष्णाच्या भेटीला जाऊ नकोस. तू आतापर्यंत वेणू ऐकून त्यावर लुब्ध झालीस खरी. पण त्या कृष्णालाही काही विसावा हवा की नको ? तो गोविंद तुझे जसे सौख्य पाहतो तसे तूही त्याच्याशी वागले पाहिजे.

अभिसारिकेच्या उत्कटतेला आणि सखीच्या काकुळतीला येऊन केलेल्या समजावणीला स्वरूप हे संगीत-नियोजक शरद सुतवणे यांनी दिले असून त्यांच्या स्वतःच्या स्वरांत कृष्णावर आणि परमात्म्यावर लुब्ध झालेल्या जडजीवरूपी अभिसारिकेची ही मनधरणी आता ऐका.

जाणीव

अशा घोर रात्रीस जाशी कुठे
नसे चंद्र, तारा नभी मेघ ते

तुला मार्ग दावावया या क्षणी
तुझी दृष्टि तूझीच ही वैरिणी

तुवा ऐकिली वेणू आतावरी
दिनी ऐक वेडे मनीषा जरी
तया घेउ दे काहि गे विश्रमा
वृथा देशि का त्या अवेळी श्रमा ?

तुला ऐकणे हेचि गे जाउनी
परी कष्ट होती किती गायनी
तुझे सौख्य गोविंद पाही जसे
नको वागणे का तुलाही तसे ?

* * *

३. कविवर्य Bee यांनी आधुनिक मराठी कवितेत आपल्या वैशिष्टयपूर्ण रचनेने गूढवादी आणि तत्त्वचिंतनात्मक कवितेचे एक नवे दालन उघडले आहे. Bee हे जसे तत्त्वजिज्ञासू तसे ते जन्मजात कवीही होते. केवळ जीवनविषयकच नव्हे तर काव्यविषयक तत्त्वज्ञानाचाही आविष्कार त्यांनी आपल्या कवितेमधून केला. काव्याची अविस्मरणीय अशी व्याख्याही त्यांनी करून दाखविली आहे.

काव्य नव्हे शब्दांचा सुंदर नादमधुर मेळ
अर्थचमत्कृतीचाही नोहे डोंबारी खेळ,
निसर्गसृष्टीची सादृश्ये, नीतिपाठ भव्य,
थाटदार घाटाची रचना केवळ नच काव्य.

काव्याची अशी अभावात्मक व्याख्या करून "ऐश्वर्यात्मक सामर्थ्याची निर्माणक्षमता जेव्हा अंतरंग ओथंबून ओसंडून बाहेर पडते तिला सौंदर्य म्हणावे–सौंदर्य हेच काव्य आहे." असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

काव्यदृष्टया संयोग-शृंगारापेक्षा विप्रलंभ-शृंगाराला अर्थात विरहगीताला अधिक उत्कटता येत असते. बी कवीनी आपल्या 'वुलवुल' या कवितेत प्रेमभंगाची एक अद्‌भुत आणि करुणरम्य कथा वर्णन केली आहे. पूर्व जन्मी प्रेमभंग झालेला तरुण 'वुलबुल' पक्ष्याचा जन्म घेऊन स्मशानात जन्म घेतलेल्या जाईच्या वेलीला आपली प्रेयसी कल्पून व्याकूळ कंठाने तिच्या सांनिध्यात शोकगीत आळवीत वसतो–

निविड तिमिर वर नभी संचरे
तळी उष्ण निश्वसती वारे
सरणांचे भोवती निखारे
स्थळी या देख—एकटाच पिंपळ एक

हे 'बुलबुल' कवितेतील पिंपळाच्या झाडाचे वर्णन आणि झाडाजवळ अदय नियतीने आपल्या हाताने लागलेली जातिलता हिचे प्रमोदिनी गडकरी यांनी आपल्या सुरांनी काढलेले चित्र यशवंत देव यांनी दिलेल्या चालीत आता ऐका.

बुलबुल

निबिड तिमिर वर नभी संचरे
तळी उष्ण निश्वसती वारे,
सरणांचे भोवती निखारे
स्थळी या देख – एकटाच पिंपळ एक !
चिरव्यथित तरु जीवज्योति
खिन्न तेज वितरते सभोती
जीर्ण विरळ तत्पर्णावरती
दुःख निर्वाण – उमटवी ठसा निज पूर्ण !
उपेक्षिलेली पहिली प्रीति
रम्योदास तसे एकान्ती
एक स्थळ या रौद्र प्रान्ती
तरीहि आहे — दरवळूनि परिमळ वाहे
पांडुर मृदु लावण्यद्युतिजल
स्थलपरिसर करि ढाळुनि निर्मल
जातिलता कुणि एकच केवळ
अदय नियतीने – लाविली तिथे स्वकराने

* * * *

४. आधुनिक मराठी कवितेत कै. श्रीनिवास रामचंद्र बोवडे यांचे स्थान स्वतंत्र आहे. त्यांच्या प्रतिभेचा पिंड हा प्रामुख्याने संस्कृतपरंपरेतील शृंगारिक पद्धतीचा आहे. आनंदराव टेकाड्यांप्रमाणे ते राष्ट्रीय कवी म्हणून गाजले नाहीत किंवा Bee कवींप्रमाणे तत्त्वचिंतक आणि अनिलांप्रमाणे प्रतीतिधर्मी म्हणूनही त्यांना काही वेगळे स्थान मिळाले नाही. खुद्द कवींच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे "सुख किंवा दु:ख पाहून ज्याच्या मनाला पाझर फुटत नसेल, ज्याचे डोळे आनंदाश्रूंनी किंवा दु:खाश्रूंनी ओले होत नसतील आणि जे--

आलिंगनी युवतीच्या सुख ते घडेना
हा सर्पदंश तरी तद्विषही चढेना
दु:खी सुखी सतत वृत्ति असे समान

अशा कोटीतले असतील त्यांना कवित्वत्रीजाची वार्ताही नसते" काव्य म्हणजे काही योग्यांची द्वंद्वातीत अवस्था नव्हे ! कवी हे हर्षशोकाचे उद्गाते आहेत. बोवडे यांची कोणतीही कविता वाचली तरी हे सहज प्रत्ययाला येते 'सांगड' ही त्यांची कविता शुद्ध लौकिक शृंगाराची असली आणि तिच्यातील प्रतिमासृष्टी ही वरीच कृत्रिम असली तरी मिलनाची उत्कटता वहारीची आहे.

मेटवुनि हृदयासि हृदय । हृदयांची सांगड बांधु गडे
दो प्रेमांचे प्रवाह वळवुनि । प्रेमसंगमी पोहु गडे ॥

या शब्दांतील चंचलता आणि मिलनाची बेहोषी सौ. कुसुम चाफळे यांच्या उत्कट स्वरात ऐका. या गीताचे संगीतनियोजन वसंत मांडे यांनी केले आहे.

सांगड

मेटवुनी हृदयासि हृदय, हृदयांची सांगड बांधु गडे
दो प्रेमांचे प्रवाह वळवुनि प्रेमसंगमी पोहु गडे !
आयुष्याचा वसंत सुंदर बहर शोभला नवा नवा
तनुलतिकांना फुले सुगंधी, सुगंध त्यांचा लुटू गडे !
पूर्ण शशी प्रेमाचा निर्मल उदय पावला मनोनमी
दिव्य सुधेच्या ह्या कुंभातुनि करू सुधारसपान गडे !
दो नयनांचे मीलन झाले उसळे विद्युत्प्रवाह हा
उज्ज्वलशा त्या प्रभाप्रकाशी पाट प्रीतिचे वाहु गडे !
आनंदाचा सागर निर्मल भरला काठोकाठ सख्या !
परोपरीचे विहार करुनी तरंग झोकु नभी गडे !
कुंजविहारी तूं गिरिधारी तुझ्या प्रीतिची मी राधा
प्रेमाच्या वृंदावनि आता रास रचूनी नाचु गडे !

* * * *

५. कै. जयकृष्ण केशव उपाध्ये हे मराठीत असे कवी होऊन गेले की ज्यांना अनेकार्थांनी 'शब्दसृष्टीचे ईश्वर' म्हणता येईल. 'पोपटपंची' या त्यांच्या काव्यसंग्रहात विनोदी आणि निखळ प्रेमविषयक अशा दोन्ही प्रकारांतील उत्कृष्ट कवितांचे अनेक मासले आढळतील. 'आवडते फूल' या नावाची 'हास हासरे फुला । तुझ्यात जीव गुंतला', ही त्यांची कविता संयोग शृंगारात्मक असून त्यात वर्णिलेली मिलनाची तळमळ चटकदार आहे. 'गेयता' हे उपाध्ये यांच्या कवितेचे लक्षणीय वैशिष्टय असून 'हास हास रे फुला' या शब्दांतील काव्यसंगीत वसंत मांडे यांनी दिलेल्या चालीवर मधु ताम्हनकर आणि त्यांनी स्वत: व्यक्त केले आहे.

आवडते फूल

हास हास रे फुला ! । तुझ्यात जीव गुंतला
वैराण रान रे फुला ! । फिरूनि जीव मागला
प्रमोद सर्व लोपला । उदास-भाव वाटला
पाहताच परि तुला । प्रेमभाव दाटला ॥

दोन्हि नयन लोभले । मन मनास विसरले
दोन्हि बाहू पसरले । तुजसि जवळ घेतले
भिन्न भाव लोपला । एक जीव जाहला ॥

कर करांत मुख मुखी । जीव जाहले सुखी
प्रेमभाव व्यापला । तू मला रे ! तू मला ॥

चुबचुंब चुंबिले । वदन वदनि बिंबले
द्वैतभान भंगले । प्रेमरंगि रंगले
हर्षपूर वाढला । त्यात जीव लोटला ॥

* * * *

६. बुवासाहेब उपाध्ये यांची 'प्रेमबाग' ही कविता त्यातील प्रेमभावनेच्या आत्मप्रत्ययासाठी सुप्रसिद्ध आहे. प्रथमदर्शनी प्रेमाने इंद्रियांचे विषयमान कसे नष्ट होते आणि प्रेमिकाची अवस्था विषदिग्ध 'प्रेमबाणा'च्या जखमेमुळे कशी मृतप्राय होते याचे वर्णन 'एकदाच पाहिले। पाहिले तयाक्षणीच आपुली न राहिले ॥' या शब्दांनी प्रभावितपणे केले आहे. मधुसूदन भावे यांनी या काव्याचे संगीतनियोजन केले असून त्याला भैरवीच्या अंगाने बांधलेली चाल दिली आहे. जवळ-जवळ बाराही सुरांचे एकवटलेले मिश्रण आणि कालंगडा दादरा तालाची साथ यामुळे या कवितेतील प्रत्येक शब्दाची जादू आणि आत्मगत अशी बेमान अवस्था ही रसिक श्रोत्यांच्या अंतःकरणाला जाऊन भिडविण्याचे सामर्थ्य मधुसूदन भावे यांच्या स्वरात आढळून येईल.

प्रेमबाण

एकदाच पाहिले
पाहिले तयाक्षणीच आपुली न राहिले । धृ.
काय जाहले कळे न
चित्त ठायी राहिले न
वेध लागला जिवास, अतरंग मोहिले
जी कधीच अनुभवी न
सृष्टि ती दिसे नवीन
सांगता मुखी न येति भाव ते मनातले
दृष्टि घे तिथेच उडी
वृत्ति ती न सोडि घडी
ज्या घडीस नयन—नयन एकमेक भेटले
ठाउके न नाव-गाव
कळवु केवि हृदयभाव
हे असे अधांतरी जिणे न जाय साहिले
इंद्रिया न विषयभान
एक लोचना तहान
हाच जरी प्रेमबाण, माखिला हलाहले !

* * * *

७. वैदर्भीय कविमंडळात श्री. गु. ह. देशपांडे यांचे स्थान त्यांच्या काव्यातून व्यक्त होणाऱ्या गूढवादी अर्थप्रतीतीमुळे अनन्यसाधारण आहे. 'निवेदन' या त्यांच्या काव्यसंग्रहात संत कवींच्या सखोल व्यासंगाचा ठसा उमटला असून 'श्याम' या कवितेत राधिकेच्या मनातील कृष्णविषयक प्रेम हे भक्तीच्या आवरणात दिलखुलासपणे प्रगट झाले आहे. संगीतनियोजक विजय जोशी यांनी राधेच्या अंतरंगातील प्रेमीलास वर्णन करण्यासाठी बागेश्री रागाची योजना केली असून कल्पनेचे प्राधान्य असलेल्या या कवितेतील कवीचा प्रत्येक शब्द सौ. सुधा देव यांच्या स्वरांनी राधेच्या प्रेमाची उल्लसित वृत्ती व्यक्त करतो. 'आराम जो मनाचा तो श्याम राधिकेचा' हा चेतनाचे चैतन्य आणि मनाचे मांगल्य कसे आहे हे सांगता सांगता कवीने 'तो कविराज कल्पनेचा लीलाविलास आहे आणि वाग्वधूचा रसरंग आहे' असे जे वर्णन केले आहे त्याचीही अनुभूती 'श्याम' हे गीत ऐकताना येईल.

श्याम

आराम जो मनाचा
तो श्याम राधिकेचा
चैतन्य चेतनाचे
मांगल्य मंगलाचे
आनंद योगियांचा
तो श्याम राधिकेचा
सौजन्य सज्जनांचे
नावीन्य नूतनाचे

गुण जो गुणीजनांचा
तो श्याम राधिकेचा
सौंदर्य चारुतेचे
माधुर्य माधुरीचे
शृंगार साजिऱ्याचा
तो श्याम राधिकेचा
सौभाग्य की सुखाचे
जो गोप-गोपिकांचे
गोपाल गोधनाचा
तो श्याम राधिकेचा
वसुदेव–देवकीचा
सुत लाडका गुणाचा
श्रीरंग–रुक्मिणीचा
तो श्याम राधिकेचा
व्रजसुंदरी जनांते
लावी अनन्य नाते
अनुराग अंतरीचा
तो श्याम राधिकेचा
विध्वंस कंसरिपुचा
की काल कालियाचा
तो राम रावणाचा
तो श्याम राधिकेचा
भक्तांसि देव दिसतो
दुष्टां कृतांत गमतो
जो भाव भावनेचा
तो श्याम राधिकेचा
कविराज–कल्पनेचा
लीलाविलास साचा :
रसरंग वाग्वधूचा
तो श्याम राधिकेचा

* * * *

८. श्री. गुणवंत हणमंत देशपांडे यांची 'फाग' ही कविता सगळ्या विश्वात व्यापून राहिलेला होलिकोत्सव वर्णन करीत आहे. 'चला ग चला ग प्रीतीने फाग खेळूग' या शब्दांमधून रंगाची जी उधळण वर्णन केली आहे तीत तिमिरांचा काळा काळा व रमणींचा गोरा गोरा त्याचप्रमाणे फुलत्या पुष्पांचा पुष्पवर्ण आणि अरुणाची लाली हे विविध रंग आहेत. वसंतावर फेकून खेळावयाचा रंग, विश्वावर उधळावयाचा रंग आणि त्यातील ती बहार ही 'फाग' या कवितेच्या शब्दा-शब्दांतून प्रगट झाली आहे. संगीतनियोजक प्रभाकर गडकरी यांनी या कवितेला दिलेली लोकगीताची चाल काव्याच्या वृत्ताला अनुसरून नाही. तरी पण कु. प्रमोदिनी गडकरी यांच्या सुरांमधून कवीला अभिप्रेत असलेला अर्थ आणि खेळकरपणा व रंग खेळण्यामधील उत्तान शृंगार यांची जाणीव यथायोग्यपणे आविष्कृत केली आहे. या गीताच्या चालीमधील अंगभूत लय आणि मिश्रमांड या रागातील स्वर यांच्यात समखंडता नाही• या गीताला चाल देताना जातीमधील लघुगुरुत्व हे बदलले आहे. ही संगीतयोजना कवितेच्या खेळकर• पणाला आणि तिच्यातील उत्कट आणि विशद भावनेला कसा उठाव आणते याचा प्रत्यक्ष अनुभव घ्या•

फाग

चला ग ! चला ग !
प्रीतिने फाग खेळू ग !
तिमिराचा काळा काळा
जमवूनी रंग सगळा
पिचकारी रविवरी मारू ग
प्रीतिने फाग खेळू ग
रमणींचा गोरा गोरा
घेऊनी वर्ण सारा
चंद्रास त्यात न्हाणू ग
प्रीतिने फाग खेळू ग
आकाशामधुनी
अष्टदिशांच्या वदनी
स्वर्गंगा–जल झोकू ग
प्रीतिने फाग खेळू ग
फुलत्या पुष्पांचा
पुष्पवर्ण फुलता फुलता
तो वसंतावरी फेकू ग
प्रीतिने फाग खेळू ग
अरुणाची लाली
मिसळुनि तेजाच्या सलिली
विश्वात रंग उधळू ग
प्रीतिने फाग खेळू ग

* * * *

९. वीरश्रीने परिपूर्ण असलेले 'शशिमोहन' हे खडकाव्य लिहून प्रा. यादव मुकुंद पाठक यांनी आधुनिक मराठी कवितेत आपले अढळ स्थान मिळविले आहे. 'शशिमोहन' खेरीज त्यांनी विविध विषयावरील जी भावगीत-रचना केली आहे तीही त्यातील हळुवार भावनाविष्कारासाठी आणि आध्यात्मिक विचार सौंदर्यासाठी सुप्रसिद्ध आहे. 'गेले ते दिन' ही कविता मानवी जिवाच्या आयुष्यातील तीन अवस्था वर्णन करते. 'हिमालयाच्या गळा घातल्या अनेक गंगांच्या माळा' या कडव्यात सप्तसुरांचे कोमल गायन ऐकले त्याचे स्वने आजही ऐकू येतात असे पूर्वजन्मातील मधुर स्मृतीचे वर्णन केले आहे.

'अष्टदिशा स्तंभावर होते, मंदिर माझे उभारलेले' याकडव्यात त्या मंदिराचे दर्शन साकार केले असून 'नवे उमाळे नवे जिवाळे, भवती प्रेमळ माया पाखर' या कडव्यात जीवसखीच्या सहवासाचे स्वप्न वर्णन केले आहे. 'गेले ते दिन' यामधील 'गेले' या शब्दात जो ध्वन्यर्थ आहे तो जणू काही माळेतील ओघळलेल्या मोत्यांची प्रतिमा व्यक्त करू शकेल अशा बेताने अवरोही सुरांच्या योजनेत बसविला आहे. माळ थांबत नाही त्याप्रमाणे काळही थांबत नाही. अशी ही शब्दांची योजना वसंत सहस्रबुद्धे यांनी केलेली असून त्यांच्या स्वराला सौ. कुसुम चाफळे यानी साथ दिली आहे. 'गेले ते दिन' या शब्दातील ध्वनिसौंदर्य, अर्थसौंदर्य आणि स्वरसौंदर्य या सौंदर्यत्रयींचा मिलाफ आता प्रत्यक्ष अनुभवा.

गेले ते दिन !

हिमालयाच्या गळा घातल्या
अनेक गंगांच्या माळा
अवकाशाच्या नभ-निटिलावर
आणि लावला गंध टिळा
ब्रह्मांडाभवती नि घुमविले
सप्त सुरांचे कोमल गायन
अजुनी कानी येती ते स्वन
गेले ते दिन ! १

अष्टदिशा-स्तंभावर होते
मंदिर माझे उभारलेले
दिक्कालाच्या अंगणात मी
मनमाने तो नाचे खेळे !
विरल स्वप्नसृष्टीत पाहिले
जे त्याचे साकारित दर्शन
घेउन आले भरून लोचन
गेले ते दिन ! २

नवे उमाळे जिव्हाळे
भवती प्रेमळ मायापाखर
जीवसखीच्या सहवासाचे
स्वप्न तरळले दीर्घ मनोहर
एखादा उच्छ्वासहि घेई
दिव्य कृतीचे रूप चिरंतन
आज स्मृतिस्थळ बघतो पावन
गेले ते दिन ! ३

* * * *

१०. श्री. वामन नारायण देशपांडे हे मराठीतील सव्यसाची साहित्यकार आहेत. प्रतिभा आणि पांडित्य हे दोन्ही गुण त्यांच्या व्यक्तिमत्वात एकवटलेले दिसतात. विशदत्व आणि भव्यत्व हे महाकाव्याचे विशेष असून, सावरकर हे मराठीतील महाकाव्य न लिहिलेले महाकवी आहेत, असे त्यांनी काढलेले उद्गार खुद्द त्यांनाही लागू पडतात. ' अंगाई ' ही त्यांची सुप्रसिद्ध कविता अनेक दृष्टींनी संस्मरणीय आहे. ही अंगाई गीत गाणारी माता सर्वसामान्य मातेसारखी काऊचिऊच्या गोष्टी सांगून आपल्या बाळाला झोपी झोपवीत नाही तर

कासया घोंगावून
स्फुंदशि रे पवना
चहाळ लागताच । दचके माझा कान्हा ॥

अशा रीतीने साक्षात पवनाला वाहू नकोस, अशी सूचन करीत आहे. 'चाहूल' या रूढ शब्दाऐवजी 'चहाळ' हा वऱ्हाडी भाषेतील शब्द काव्यातील भाव यथायोग्य रीतीने व्यक्त करीत आहे.

नशिबी थोरपणी । अश्रूंचा पावसाळा
वालींच विलसू दे । हास्याची चंद्रकळा

या ओळीत आसू आणि हासू यांचे केलेले वर्णन मनाला चटका लावते. 'अंगाई' ची संगीतयोजना वसंत अंधारे यांनी केली असून माऊलीचा वात्सल्यभाव व्यक्त करणारी स्त्रीगीताची चाल प्रस्तुत कवितेला दिली आहे या कवितेतील आन्तरिक भाव हा विशिष्ट प्रकारच्या लघु व गुरु स्वरांनी सौ. विद्यावती केतकर यांनी उकलला असून त्यांचे स्वर जणू काही केवळ दोन

डग्गांच्या घुमाऱ्यावर आंदोलन पावत आहेत अशी योजना आहे. तबला आणि डग्गा यांचा ताल दिलेला नसूनही ही योजना किती प्रभावी झाली आहे ती आता ऐका. ऐकत असताना गायिकेच्या स्वरातील 'दचके' हा शब्द ऐकून त्या माऊलीच्या बाळाप्रमाणे आपणही दचकून मात्र जाऊ नका !

अंगाई

कासया घोंघावून
  स्फुंदशी रे पवना !
चहाळ लागताच
  दचके माझा तान्हा ! १
वाई गे बरसाती !
  रडूनी धाई धाई
बाळाची माझ्या झोप
  करिशी कडू काई ? २
जो जो रे लडिवाळा !
  झोपेत सुखे हास
माणिकमोतियांची
  झडू दे घरी रास ! ३
नशिबी थोरपणी
  अश्रूंचा पावसाळा,
बाल्याच विलसू दे
  हास्याची चंद्रकला ! ४
हसशी जागेपणी
  तसेच झोपेतही
हसवो रे तुचला
  जिवती–माऊली ही ! ५
न रडे बरसाती !
  स्फुंदी न रे पवना !
चहाळ लागताच
दचके माझा तान्हा ! ६

* * * *

११. केशवसुत आणि तांबे यांच्या कवितेतील उत्कृष्ट गुणांचा वारसा घेऊन प्रा. भवानीशंकर पंडित यांची कविता अवतीर्ण झाली आहे. रेखीव, सुबोध आणि शुद्ध रचनेसाठी यांची कविता सुप्रसिद्ध आहे. 'आधुनिक मराठी कविता' हा त्यांचा टीकाग्रंथ आणि त्यांचे विविध काव्यसंग्रह यामुळे आधुनिक मराठी कवीचे मर्मज्ञ समीक्षक आणि सौंदर्यवादी कवी असे दुहेरी श्रेष्ठ दर्जाचे यश त्यांनी मिळविले आहे. एक 'शिशुगीतकार' म्हणूनही यांचा लौकिक प्रसिद्ध आहे. 'दूर कुठे तरी' या त्यांच्या कवितेत आपण दोघे दूर अन्तरावरून कुठेतरी अज्ञानात, अव्यक्त जागी जात आहोत व आपला प्रवास आपणाला एकमेकापासून विलग न होता समरसतेने करावयाचा आहे हा आशय व्यक्त केला आहे. आपण कोण ? कोठले ? व कुठे जाणार ? याची कल्पना नसताही उभयताना लाभलेले जीवन समृद्धतेने जगावे असा या कवितेत साध्या विषयातून मोठा आशय काढला आहे. वसंत अंवारे यांनी या गीताला मांड रागाची चाल दिली असून या गीताचे गायक गोपाळ कौशिक आहेत.

'दूर' या शब्दाचा ध्वनीतून, दूर अंतराची प्रतीती कशी व्यक्त केली आहे ती आता ऐका—

दूर कुठे तरि –

दूर कुठे तरि जाणे ग ऽ
  कुठे परंतु
  ते मी वा तू
उभयी कोणि न जाणे ग ऽ — ॥
  कोण कोठले
  आपण ? न कळे
मिळलो अंतःकरणे ग ऽ – ॥
  जितके रुसलो
  तितके हसलो
वसलो जोवरि वसणे ग ऽ — ॥
  प्रवाह दोघे
  समरसलो गे
कसे विलग ते होणे ग ऽ — ॥

* * * *

१२. 'वामनास आवाहन !' ही प्रा. भवानीशंकर पंडितांची कविता कविवर्य तांबे यांच्या 'रुद्रास आवाहन, या विख्यात कवितेची आठवण करून देणारी आहे. "ये पुन्हा ये पुन्हा ये पुन्हा वामना
बळी बळीचा बळी घ्यावया ये पुनः ॥ असे हे तालगीत असून त्यातील अंतऱ्यासाठी योजलेला हा ताल रौद्र रसाला अनुकूल आहे. संगीतनियोजक प्रभाकर गडकरी यांनी या कवितेला मिश्र स्वरांची चाल दिली असून आवाहनाला ती पोषक आहे. पुन्हा या शब्दांची पुनरुक्ती आणि

अमित मत्तामदे दैत्य हा माजला
अपर लक्ष्मीपति म्हणूनि हा गाजला ॥

ही शब्दालंकारयुक्त रचना कवितेतील आशय प्रभावी करणारी आहे.

वामनास आवाहन

ये पुन्हा ये पुन्हा ये पुन्हा वामना!
बळी बळीचा बळी घ्यावया ये पुन्हा ॥
अमित मत्तामदे दैत्य हा माजला
अपर लक्ष्मीपती म्हणुन हा गाजला
हाच दात्यांत की अग्रणी आजला
नादवून नाणि हा नाचवी त्रिभुवना १

अमर सत्ता परी यापुढे चळचळे
अढळ आसन तिचे सारखे डळमळे
आजवरचे तिचे धैर्य अवघे गळे
साह्य व्हाया करी ती तुझी याचना २

मूर्ति वामन तुझी किंतु कीर्ती महा,
सधन हा, अधन तू शक्ति पण दुर्वहा,
पाउली दडप, कर भूमिगत दैत्य हा
नष्ट कर याचिया राक्षसी शासना ३

* * * *

१३. श्री. आत्माराम रावजी देशपांडे उर्फ कवि अनिल हे आजच्या मराठी कवितेच्या प्रयोगशीलतेचे अग्रदूत आहेत. मुक्तच्छंदाला आज जी प्रतिष्ठा मिळाली आहे तिचे श्रेय अनिलांनाच दिले पाहिजे. 'फुलवात' 'भग्न-मूर्ती, 'निर्वासित चिनी मुलास !' आणि 'सांगाती' हे त्यांचे काव्यसंग्रह म्हणजे आधुनिक मराठी काव्याच्या इतिहासातील चार टप्पे असून काव्याची केवळ निर्मितीच नव्हे तर काव्याची प्रक्रिया आणि त्याच्या मुळाशी असलेले प्रमेय यांची उकलही अनिलांच्या समर्थ लेखणीने करून दाखविली आहे. काव्यातील संगीताचे स्थान, लयबद्धता आणि आंदोलन, प्रतीतिधर्म आणि प्रक्षोभ-रस या संबंधी अनिलांनी केलेले विवेचन काव्यचर्चेला चालना देणारे असून त्यांची कविता ही तिच्यातील स्वाभाविक भाववृत्तीमुळे पृथगात्म उमटली आहे.

'निरोप' ही अनिलांची कविता कव्वाली सारख्या गीत पद्धतीची असून तिच्यात 'तू सुखी रहा फुला, तुझ्या जिवात जीव गुंतला रे फुला जीव गुंतला' असा ताटातूट झाल्यानंतर प्रेयसीला दिलेला निरोप आहे. मुळातील बंदिश न तोडता आणि आवर्तन हे तालात न देता केवळ लयीत ठेऊन या कवितेचे संगीतनियोजन वसंत सहस्रबुद्धे यांनी केले असून सौ. कुसुम चाफळे यांच्या सुरांतून ही कविता गायिली जात आहे.

चार दिवस चांदणे; चार दिवस साहणे
अंधार खेळ आपला ॥

असे ताटातुटीच्या वेळी येणारे दुःखाचे उमाळे आणि तिने सुखी राहावे म्हणून व्यक्तविलेला आशावाद मनाला चटका लावणारा आहे.

निरोप

तू सुखी रहा फुला, तुझ्या जिवात जीव गुंतला
रे फुला, जीव गुंतला
हास फुला हासवी, नाच फुला, नाचवी मला
जिवात जीव गुंतला

आनंद भरूनि ठेविला प्याला, पिऊ खूप मधु आतला
आसू भरूनि आणिला, तरी सुखेच घेउ घोट त्यातला
चार दिवस चांदणे, चार दिवस साहणे अंधार
खेळ आपला !

हास्य तुझे, लास्य तुझे वाढवील प्रीति-रंग त्यातला
हृदय मिळे, जीव जुळे, सर्व कळे भाव आतला
तू सुखी रहा फुला, निरोप हा तुला
जिवात जीव गुंतला

* * * *

१४. 'सारंग' या अनिलांच्या कवितेची सुरवात-

'वेळ झाली भर माध्यान्ह, माध्यावर तळपे ऊन
नको जाऊ कोमेजून माझ्या प्रीतिच्या फुला रे ॥

या शब्दांनी झाली आहे. भाद्रपदातल्या विश्वामित्राच्या उन्हाळचात एका टळटळीत दुपारी प्रीतीच्या फुलाला तू कोमेजून जाऊ नकोस अशी विनवणी केली आहे. माध्यान्हाचे ऊन सोसल्याशिवाय निसर्गाची किंवा प्रेमाचीही परिणती होत नाही.
या कवितेच्या शेवटी

'मृगजळाच्या तरंगात, नभाच्या निळचा रंगात
चल रंगू सारंगात, माझ्या प्रीतीच्या फुला रे'

अशी आशा व्यक्त केली आहे. माध्यान्हासारखा तटस्थ क्षण नाही आणि या क्षणी प्रियजनाची आठवण कोमेजलेल्या फुलात पाहणाऱ्या कवीच्या भावनांचा उल्लास

यशवंत देव यांनी उषा वडोदकर यांच्या स्वरांत संगीत-बद्ध केला आहे. या ठिकाणी कवी, संगीतनियोजक आणि गायिका यांच्या कौशल्याचा अपूर्व संयोग साधलेला आहे तो आता ऐका.

सारंग

वेळ झाली भर माध्यान्ह
माथ्यावर तळपे ऊन
नको जाऊ कोमेजून
माझ्या प्रीतिच्या फुला रे १

तप्त दिशा झाल्या चारी
भासतसे सृष्टी सारी
कसा तरी जीव धरी
माझ्या प्रीतिच्या फुला रे २

वाहतात वारे जळते
पोळतात फुलत्या तनुते
चित्त इथे मम हळहळते
माझ्या प्रीतिच्या फुला रे ३

माझी छाया माझ्याखाली
तुजसाठी आसावली
कशी करू तुज सावली
माझ्या प्रीतिच्या फुला रे ४

प्रीतिवरी विश्वासून
घडीभरी सोसू ऊन
नको टाकु खाली मान
माझ्या प्रीतिच्या फुला रे ५

मृगजळाच्या तरंगांत
नभाच्या निळ्या रंगात
चल रंगू सारंगात
माझ्या प्रीतिच्या फुला रे ६

* * * *

१५. आधुनिक मराठी कवितेत साम्यवादी विचार प्रणाणीने प्रेरित झालेले कवी म्हणजे प्रा. शरच्चन्द्र मुक्तिबोध हे होत. मुक्तिबोधांच्या प्रतिमा योजनेत आणि शब्द योजनेत नवकवितेचा रंग आणि ढंग यांचे विपुल दर्शन होते. 'वर्षागम' ही त्यांची कविता यौवनाची बहार सुचविणारी असून

'सये पहा ढगावरी ढग आले ओथंबुन
बाहेर ये निळे निळे आले गडे अंधारून'

या प्रारंभीच्या पक्तींना समांतर अशा अखेरच्या ओळीतून

'तुझ्या विशालशा नेत्री डवरले नील धन
कोणत्याग आर्द्र स्मृति पुसटती डोकावून'

व्यक्त झालेली भावना आणि 'फार खुपे द्वैत प्रिये' हे शब्द कवीचे मनोगत उत्कटपणे प्रगट करतात. विजय जोशी यांनी या कवितेची पर्शियन सुरामध्ये बंदिशी केली असून त्यांनीच दादरा तालामध्ये ही कविता गाऊन दाखविली आहे.

वर्षागम

सये पहा ढगावरी ढग आले ओथंबून
बाहेर ये, निळे-निळे आले गडे अंधारून,
सुटलासे उन्मादक उद्दामसा शीत वारा
झरणाऱ्या कुसुमांनी वापी गेली झाकळून १

यौवनाचा बहार हा सुगंधित धरणीचा
वेळूवनी छाया, मर्मी तीक्ष्ण टाहो मयूराचा
उतरून चुंबी जळे करी मेघ मंद्र घोष
लाल लाख तरंगांनी मत्त प्राण सरितेचा २

तुझ्या विशाळशा नेत्री डवरले नील धन
कोणत्या ग, आर्द स्मृती पुसटती डोकावून
फार खुपे द्वैत प्रिये, हेलावतो पंचप्राण
असीम या सौदर्यास केवी घेऊ आलिंगून ? ३

* * * *

१६. विदर्भातील अगदी नव्या दमाचे कवी म्हणजे प्रा. मधुकर केचे. त्यांची कविता आपले लक्ष वेधून घेते ते आपल्या साधेपणाने. पण हा साधेपणा सर्वसामान्यांचा नाही असामान्यांचा आहे. अध्यात्मनिष्ठा आणि निसर्ग-प्रतीती यांचे त्यांच्या कवितेत अद्वैत आढळते. केचे यांची शब्दकळा ही टोकदार असून त्यांची कविता वाचता क्षणीच आपल्या मनाचा वेध घेते.

फिरफिरुनी ये तुझी आठवण
रोखून धरते मलाच मी पण

या साध्या पण आकर्षक शब्दांत कारुण्य आणि वैफल्य यांचा जितका हृद्य मिलाफ आहे तितकाच

खुलेल कैसे भाग्य कळीचे ?
फुलण्याआधी दिधले फेकून !

या पंक्तीतील विरोध मनाला वेध लावणारा आहे.

कवितेच्या आशयाला योग्य अशा धिम्या आणि संथ लयीत मीना सातोकर ही कविता यांनी आसावरी

रागांत गायिली असून मधुसूदन भावे यांनी तिचे संगीत नियोजन केले आहे.

फिरफिरुनी ये

फिरफिरुनी ये तुझी आठवण
रोखुन धरते मलाच मी पण
कठोर मी ओसाड नभापरि
मेघ रिता नयनांतून विहरी
व्याकुळलेली स्मरणे सारी
मिटल्या अधरी केकाक्रंदन — १
मी शिशिराचे वचन पाळते
हासत पान न् पान ढाळते
चैत्रातहि निर्माल्य माळते
तुझीच आज्ञा करते पालन — २
सर्व ऋतू मज पानगळीचे
तूच दिले हे दान धुळीचे
खुलेल कैसे भान कळीचे
फुलण्या आधी दिधले फेकुन — ३

* * * *

१७. जीवनामधील सार्वत्रिक सत्य हे मुलायम शब्दांनी आणि गेयतेच्या आवरणात रसिकांपुढे ठेवावे श्री. राजा बढे यांनीच ! राजा बढे यांची कवितागीताचे अंग घेऊनच बाहेर पडते व तिच्यातील भावनेबरोवर श्रोत्यांनाही घेऊन जाते.

चुकेन हे कुणासही, असेच व्हावयाचे
येणारे आज उद्या परत जावयाचे ॥

या त्यांच्या कवितेला त्यातील बेपर्वा आणि उपेक्षा व्यक्त करणारी चाल खुद्द कवीच्या शब्दांनी आणि ती गातांना गायिकेने लावलेली असून शब्द आणि स्वर यांच्या प्रमाणे या कवितेतील मिलन आणि विरह या दोन भावनाही हातात हात घालून जाताना दिसतात.

गेले ते यौवन नच परत यावयाचे

या पंक्तीतील अर्थ यौवनमनिर्वति यातं तु किंवा यह जवानी है जो जाके आती नही । या हिंदुस्थानी शब्दांत तितक्याच सार्थतेने व्यक्त करता येतो. या कवितेतील भाव सर्वांना पटणारा आहे. वसंत माडे यांनी या गीताचे संगीतनियोजन केले असून शोभा कोठेकर यांनी ती आपल्या सुडौल स्वरात गायिली आहे.

चुके न हे कुणासही

चुके न हे कुणासही, असेच व्हावयाचे
येणारे आज उद्या परत जावयाचे !
अडवितील कोण कुणा येताना जाताना
येशील ये जाशील जा नाही पुसायाचे
आगमनाचे स्वागत गमनाचे शोकगीत
दोघांच्या दोन परी अश्रु वहायाचे ॥
आली ती नच जाई ही जरा, जरा न हाले
गेले ते यौवन नच परत यावयाचे
वाढ ही अनोळखी येऊ कसे जाऊ कुठे
तीच तुडविणे जिवा नाही चुकायाचे ॥

* * * *

१८. श्री गोविंदराव जोशी यांनी 'रानारानात गेली बाई शीळ' गाऊन दाखविल्याबरोबर तिचे कवी श्री. ना. घ. देशपांडे यांचा सगळीकडे बोलवाला झाला. मनाची पकड घेणाऱ्या शब्दकळेतून भावस्पर्शी आशय ना. घ. देशपांडे यांची कविता मनोज्ञ रीतीने व्यक्त करते. वास्तविक पाहता त्यांची 'कुणकुण' ही कविता कल्पना-प्रचुर आहे. पण

वाळली सगळी फुले उरला तरी पण वास हा ।
लोपली वनदेवता पण राहिला वनवास हा ॥

अशा आकर्षक शब्दांनी प्रेमभंग झाला तरी प्रेमाच्या उप-भोगाची स्मृती कशी शिल्लक उरते याची तिने यथार्थ प्रचिती आणून दिली आहे. पालवी झडली पण जुने पान उरले, वादळ संपले पण हुरहूर राहिली, घाव बुजला पण खूण राहिली, त्याचप्रमाणे आपल्यामधील प्रेमाचे रहस्य लोपले पण कुणकुण मात्र तशीच उरली आहे अशा वेचक शब्दांनी मनाला भिडणारा भाव व्यक्त केला आहे. ही कविता संगीतनियोजक शरद सुतवणे आणि सौ. विद्यावती केतकर यांनी कलावती रागात गायिली असून सात मात्रेच्या रूपक तालामध्ये तिची योजना करण्यात आली आहे.

कुणकुण

वाळली सगळी फुले, उरला तरी पण वास हा,
लोपली वनदेवता, पण राहिला वनवास हा.
पालवी झडली, तरी उरले जुने पण पान हे
गाव तें उठले, तरी उरले अजून वसाण हे.

अग्नि तो विझला जरी, निघतो तरी पण धूर हा
वेदना सरली जरी, सुकतो तरी पण नूर हा.
घोर वादळ संपले, पण राहिली हुरहूर ही,
चंद्रिका विझली, तरी उरलीच रात्र निसूर ही
वाद ते मिटले, तरी पण राहिलेत विषाद हे
साद ओसरले, तरी पण राहिले पडसाद हे
घाव तो बुजला जरी, उरली तरी पण खूण ही
ते रहस्यच लोपले, पण राहिली कुणकूण ही.

* * * *

१९. श्री ना. घ. देशपांडे यांची 'कोयल गाते मंजुळ गाणी' ही कविता मधुकर गुळवणी यांनी तिच्यातील अर्थाला अनुकूल अशा चालीत गायिली आहे.

'मुकाच बघ हा तुझ्यापरी,
झुलतो चाफा तुझ्यावरी'

अशा सूचक शब्दांनी प्रेमाचा कोमल भाव सुचविला असून तू मुखस्तंभ चाफ्याप्रमाणे उभी आहेस, पण तुझ्या मनात चाललेले तुला आणि मला आपोआप कळले असे कवितेच्या शेवटी सूचित केले आहे. 'प्रणयाची सतार' ही कविता कवीने अतिशय हळुवार हाताने छेडलेली येथे ऐका.

कोयल गाते मंजुळ गाणी

कोयल गाते मंजूळ गाणी किती कोवळा तिचा गळा
सखी चांदणी राजसवाणी हासत बघते तुला मला

मुकाच बघ हा तुझ्यापरी
झुलतो चाफा तुझ्यावरी
हळु हळु हासला कुमारी
कुणास हा हासतो खुळा १

एकसारखे बघु असे
परस्परांना हवे तसे
सांग वाटते कसे कसे
मग हसेल ते ऐकून मळा २

उभी जशी तू मुकी कुणी
काय चालले तुझ्या मनी
कळेल आपोआप साजणी
तुला मला ग तुला मला ३

* * * *

२०. श्री. सुरेशभट हे आधुनिक विदर्भाचे विनीवरील कवी आहेत. त्यांच्याइतका संवेदनक्षम कवी विराळा. अशा कवीने ऐलतिरावरचे उध्वस्त निवारे अनुभवास आल्यावर पैलतिरावर मला थारा मिळेल हा आशावाद व्यक्त नकेला तरच नवल. विरोध प्रतिमांच्याद्वारे आपली जीवनव्यथा आणि एक दुर्दम्य आशावाद सुरेश भटांनी आपल्या किनारा या कवितेत व्यक्त केला आहे. या कवितेचे मधु ताम्हनकर यांनी संगीतनियोजन केले असून तिला आपला मर्मस्पर्शी स्वर दिला आहे सौ. सुधा देव यांनी.

किनारा

त्या पैलतिरावर मिळेल मजला थारा
सुहृदांची प्रेमळ सोवत आणि उवारा
इकडच्या तटावर झाले ध्वस्त निवारे
जळतात पावलाखाली क्रुद्ध निखारे
मी तळमळताही निर्विकार जन सारे
पण तिथे वाहतो प्रसन्न शीतल वारा !
ऐकली न न येथे आपुलकीची बोली
बहरली न आशा मनात अंकुरलेली
सारखी विफलता व्यथा माझिया भाली
पलिकडे हासतो जीवन-श्रेय-फुलोरा !
पलिकडे मनोमय स्वप्नांचा संसार !
पलिकडे सुगंधित गीतांचा झंकार !
संतप्त उरावर वत्सल अमृतधारा !
बहरला मळयांनी वैभवपूर्ण किनारा !

* * * *

विदर्भाचे पहिले शाहीर श्री. आनंदराव टेकाडे यांच्या 'राष्ट्रगंगेस !' या कवितेपासून या काव्यदर्शनाच्या कार्यक्रमाला प्रारंभ झाला व आता आजचे वैदर्भीय कवी श्री. सुरेश भट यांच्या–

'उषःकाल होता होता काळ रात्र झाली !'

या कवितेने या कार्यक्रमाची सांगता होणार आहे. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या आंदोलनासाठी मुहूर्तमेढ रोवताना एक विलक्षण स्वरूपाचा उत्साह आणि आवेश विदर्भ-सरस्वतीच्या रोमारोमात संचरला होता. पुढे पाव शतकानंतर देशाला स्वातंत्र्य मिळाले. त्या स्वातंत्र्याची फळे वीस वर्षे चाखल्यानंतर विदर्भसरस्वतीची जी काळवंडलेली अवस्था झाली तिचे चित्रण आपल्याला सरतेशेवटी कवी सुरेश भट यांच्या शब्दांत ऐकावयाचे आहे.

मानवी मनाची आर्तता समर्पक प्रतिमांनी आणि नाद मधुर शब्दांनी बंदिस्त करावी सुरेश भट यांनीच! स्वातंत्र्योत्तर काळातील भारतात स्वातंत्र्य मिळाल्या-नंतरही सर्वसामान्य विचारवंतात जी एक असंतोषाची लाट उसळली तिला शब्दरूप देण्याचे कार्य सुरेश भट यांच्या प्रतिभेने समर्थपणे केले आहे. स्वातंत्र्याचा उष:-काल होता होतानाच देश स्वत:च स्वत:वर लादून घेत-लेल्या बंधनांनी कसा शृंखलाबद्ध झाला याचे चित्र या समूहगीतात साकार झाले आहे.

उष:काल होता होता काळरात्र झाली।
अरे पुन्हा आयुष्यांच्या पेटवा मशाली ॥
आम्ही चार किरणांचा ही आस का धरावी।
जे कधीच नव्हते त्याती वाट का पहावी।
कसा सूर्य काळोखाच्या वाहतो पखाली ॥
तेच घाव करिती फिरुनी हचा नव्या कटायारी।
तेच दंश करिती आम्हां साप हे विषारी।
आम्ही फक्त ऐकत असता आमुची खुशाली ॥
उभा देश झाला आता एक बंदिशाळा।
जिथे देवकीचा पान्हा दुधाने जळाला।
कसे पुण्य दुर्दैवी अन् पाप भाग्यशाली ॥
धुमसतात अजुनी विझल्या चितांचे निखारे
अजुनी रक्त मागत उठती वधस्तंभ सारे
आसवेच स्वातंत्र्याची ही आम्हा मिळाली ॥

* * * *

विदर्भ साहित्य संघाच्या वर्धापन दिनानिमित्त झालेला हा अभिनव कार्यक्रम अत्यंत संस्मरणीय ठरवा. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विख्यात कला-वंत व काव्य गायक श्री. गोविंदराव जोशी हे मुद्दाम आले. हा उपक्रम पहिलाच असल्यामुळे त्यात काही उणिवा असणे स्वाभाविक आहे. त्या लक्षात घेऊनही हा कार्यक्रम, आणि उपस्थित कवींनी व रसिकांनी त्याची केलेली प्रशंसा दीर्घकाळपर्यंत सर्वांच्या स्मरणात राहिल. असा दृश्य, श्राव्य, हृद्य आणि ज्याचा रसास्वाद पुन: पुन: घ्यावा अशी ओढ लावणारा हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी ज्या दिग्दर्शक, गायक व वादक कलावंतांनी सहकार्य दिले त्यांचे आभार मानावे तितके कमी आहेत. ज्या दिवंगत व विद्यमान कवींच्या कविता निवडल्या त्यांच्याबद्दल आदरपूर्वक कृतज्ञता व्यक्त करणे अवश्य आहे. सर्वश्री राजा पाठक, आनंद जोग, जयंत देवघर व वा. के. अत्रे यांच्या योजकतेमुळेच हा कार्यक्रम आकाराला आला. विदर्भ साहित्य संघाच्या सर्वच कार्यकर्त्यांनी हातभार लावल्यामुळे हे भरीव यश मिळू शकले. हे यश पुनरावृत्तीने वाढत जावो ही शुभेच्छा.

धन्यवाद.

तुकारामांच्या विराण्या .. .. (पान २९० वरून)

"कहाँसे लाऊँ मधुरा बानी।
रीझे ऐसी लोक विरानी ॥" [१९]

'विरानी' हे विशेषण येथे लोकांना किंवा विशेषत: वाणीला लावलेले असावे असे वाटते. पंडितांनी पाठ-भेद देताना देहू व तळेगावच्या प्रतीतील 'विराणी' शब्द येथे उद्धृत केला आहे, तो चिंत्य आहे. मराठी शब्दातील 'व' हिंदीत प्राय: 'ब' बनतो तेव्हा उलट गतीने हिंदीतील 'बिरानी' चे चे मराठीकरण 'विराणी' अगदी स्वाभाविक आहे. बिरानी म्हणजे परकी–पर-कीया–परस्त्री–अभिसारिका, अशा अर्थांतराने या शद्वाने तुकारामाच्या 'विराण्यांचे' रूप घेतले असावे, असे माना-यला भरपूर जागा आहे.

'विराणी' शब्दाच्या उपरोल्लिखित विविध व्युत्पत्ती विद्वज्जनांच्या विचारार्थ प्रस्तु तकेलेल्या आहेत. 'विर-हिणी' शब्दापासून 'विराणी' शब्द बनला नसून त्याचे मूळ काही निराळे आहे, एवढे जरी या लेखात चोखंदळ वाचकांच्या निदर्शनास आले तरी याचे सार्थक होईल.

[१९] सरकारी गाथा पृ. २०६

वर्ध्याचे ४८ वे मराठी साहित्य सम्मेलन

सुधाकर गोखंडे

१९६८ च्या मे महिन्यात भर उन्हाळयात भरणारे वर्धा येथील ४८ वे मराठी साहित्य संमेलन अखेर १९६९ च्या जानेवारी ४,५ आणि ६ तारखांना कडक थंडीत पार पडले. प्रस्तुत संमेलन वर्धा येथे भरेल की नाही याबाबत सर्वसामान्य रसिकांना जेवढा संदेह होता, त्यापेक्षा किती तरी अधिक परीने संमेलनाध्यक्ष कविवर्य प्रा. पुरुषोत्तम शिवराम रेगे यांना हा संदेह अधिक होता.

हे संमेलन आयोजित होण्याच्यात एक आठवड्यापूर्वी पुण्याच्या एका सत्कार समारंभात नियोजित अध्यक्ष प्रा. पु. शि. रेगे यांनी साहित्य संमेलनाच्या संदर्भात जी व्यथा व्यक्त केली त्यामुळे तर सर्व साधारण रसिकांचाही हे संमेलन भरते की नाही या बाबत संशय बळावत गेला. परंतु अखेर कविवर्य प्रा. रेगे आणि इतर रसिकांचा हा संशय अनाठायी ठरला. आणि हे संमेलन वर्धा मुक्कामी झालेच ! वैदर्भीय शब्दालाही किंमत असते हे या प्रसंगी वर्धानिवासियांनी दाखवून दिले. अशा मोठ्या संमेलनाची आवश्यकता काय ? असा जो प्रश्न पुण्याच्या सत्कार समारंभात प्रा. रेगे यांनी उपस्थित केला होता त्याला त्यांनी स्वतःच संमेलनाच्या समारोपाचे वेळी, छोटया छोटया संमेलनाप्रमाणेच अशा मोठया संमेलनाचीही आवश्यकता प्रतिप्रादन करून आपले पूर्वीचे विधान चुकीचे होते याची जाहिर कबूली दिली.

श्री. रेगे–चौधरी यांचे स्वागत

संमेलनाध्यक्ष प्रा. पु. शि. रेगे आणि उद्‌घाटक महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री श्री. मधुकरराव चौधरी जेव्हा संमेलनाला उपस्थित राहण्यासाठी स्टेशनवर उतरले त्यावेळी त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. मानवंदना वगैरे दिल्यानंतर संमेलनाध्यक्षांची वर्धा नगरीतून मिरवणूक काढण्यात आली. संमेलनाच्या मंडपस्थानी ही मिरवणूक समाप्त झाली. वर्धा नगर परिषदेचे अध्यक्ष श्री. रमेश शेंडे यांनी सर्वप्रथम पुष्पहार घालून पाहुण्यांचे स्वागत केले. स्वागताध्यक्ष श्री. रामेश्वर बजाज यांनीही संमेलनाध्यक्ष प्रा. रेगे आणि उद्‌घाटक श्री. चौधरी यांचे स्वागत केले. या प्रसंगी संमेलनासाठी परगावाहून आलेले ३०० प्रतिनिधी आणि इतर सुविद्य नागरिकांचा बराच मोठा समुह उपस्थित होता.

संमेलनाला आरंभ

येथील स्वावलंबी विद्यालयाच्या विशाल प्रांगणात उभारलेल्या भव्य शामियान्यात सरस्वती स्तवन, महाराष्ट्र गीत आदी कार्यक्रमांनी अधिवेशनास प्रारंभ झाला. आरंभी ४८ सुवासिनींनी संमेलनाध्यक्ष प्रा. पु. शि. रेगे यांना ओवाळले.

यानंतर मराठी महामंडळाचे अध्यक्ष महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात, 'मराठी आज जरी राजभाषा झाली असली तरी ती अजून सिंहासनारुढ व्हावयाची आहे आणि त्यासाठी योग्य ते प्रयत्न होणे आवश्यक आहे' असे प्रतिपादन केले.

उद्‌घाटनाचे भाषण

अधिवेशनाचे उद्‌घाटन करताना शिक्षणमंत्री मा. मधुकरराव चौधरी म्हणाले, समाजमनाच्या सर्वस्पर्शी अनुभूतीतून साहित्य निर्माण होत आहे काय याचा लेखकांनी विचार करायला हवा. साहित्य जीवनदायी व्हायचे असल्यास ते समाजाचे मन समजून घेणारे असले पाहिजे. जनमनाच्या आकांक्षा समजून घेण्याचा मंत्र

नसला तर तंत्र हे वाचकाला आकर्षित करण्यास असमर्थ ठरेल असाही इषारा शिक्षणमंत्र्यानी या प्रसंगी दिला.

उद्‌घाटनाच्या भाषणानंतर स्वागतमंत्री श्री. कुसुमाकर बोरीकर यांनी संमेलनाला सदिच्छा व्यक्त करणारे थोरामोठ्यांचे संदेश वाचून दाखविले.

स्वागताध्यक्षांचे भाषण

स्वागताध्यक्ष श्री. रामेश्वर बजाज यांनी संमेलनाला आलेल्या प्रतिनिधींचे स्वागत केले. आणि स्वागताध्यक्षपदाची जबाबदारी आपणाकडे आलेली असली तरी ह्या जबाबदारीचे आकलन आपणास अद्याप झालेले नाही असे सांगितले. ते पुढे म्हणाले, संमेलनाला काही अंशी परंपरेचे जे रूप आले आहे त्यात परिवर्तन व्हायला हवे.

अध्यक्ष–पद सूचना

यानंतर वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांनी अध्यक्षपदाची सूचना मांडली, तिला उपाध्यक्ष प्राचार्य मा. गो. देशमुख यांनी अनुमोदन दिल्यावर पूर्वाध्यक्ष कुलगुरू डॉ. वि. भि कोलते यांनी नव्या अध्यक्षांना म्हणजे कविवर्य रेगे यांना अधिकार प्रदान केलेत. याप्रसंगी डॉ, कोलते यांनी अल्पसे परंतु मोठे मार्मिक भाषण केले. ते म्हणाले, मला नसलेले अधिकार आज मी कविवर्य रेगे यांच्या स्वाधीन करीत आहे. या नसलेल्या अधिकाराचा भार मला वाजवीपेक्षा जास्त काळ सहन करावा लागला, तसेच कविवर्य रेगे यांनाही या नसलेल्या अधिकारासाठी फार वेळ ताटकळत ठेवावे लागले. परंतु रेगे यांना माझी अशी विनंती आहे की त्यांनी माझे या संदर्भात अनुकरण न करता महामंडळाकडून आपल्या अधिकार काळपर्यंन्त काही ना काही अधिकार मागून घ्यावेत.

अध्यक्षांचे स्वागत आणि भाषण

सुशोभित केलेल्या व्यासपीठावर वर्धा नगरीतील विविध संस्थातर्फे कवी श्री. पु. शि. रेगे यांचे पुष्पमाला अर्पण करून स्वागत करण्यात आले. त्यानंतर अध्यक्षांनी आपले २० पानी छापील भाषण वाचून दाखविले. कविवर्य रेगे यांचे हे भाषण त्यांच्या इतर साहित्याप्रमाणेच त्रोटक असले तरी अर्थगर्भ होते, विचारांना चालना देणारे होते. साहित्याविषयीचा एक वेगळा दृष्टीकोन पुढे ठेवणारे होते. म्हणूनच ते आजपर्यन्तच्या अध्यक्षीय भाषणांच्या चाकोरीबाहेरील आहे. त्यांनी केलेली विधाने, विश्लेषणे आणि मांडलेली प्रमेयें ह्यात-भरच्या चिंतनातून उद्‌भूत झालेली आहेत याचा ठायी ठायी प्रत्यय आलो.

भारतातील विभिन्न भागात विखुरलेल्या मराठी समाजात साहित्याबद्दल आस्था दिसून येत असली, तरी ही आस्था, ही जाणीव सफल करण्याची साधने उपलब्ध न झाल्यामुळे त्यांच्यात एक प्रकारची विफलतेची भावना निर्माण झालेली आहे, आपल्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करण्यात येत आहे असे या समाजातील लेखकांना वाटू लागले आहे, या गोष्टीकडे अध्यक्ष श्री. रेगे यांनी भाषणाच्या प्रारंभीच लक्ष वेधले.

आजच्या मराठी साहित्यात दिसून येणाऱ्या विफलतेच्या संदर्भात ते म्हणाले, या विफलतेतूनच ‘ दाखवेगिरी’ची किंवा धक्का देणारी प्रवृत्ती निर्माण होते. असे साहित्य जीवनाच्या मूळ धारणेशी भिडत नाही. जाणीवा नुसत्या चाळवल्या, चिवडल्या जातात. केवळ एक अविष्कारपद्धती एवढ्यापुरतेच ते साहित्य जगते व मरते. हा केवळ नव्या जुन्यांचा संघर्ष आहे, एवढ्यावरच त्याचे मूल्यमापन करून भागणार नाही. संकुचित व वैयक्तिक विफलतेतून आणि विकलतेतून हे साहित्य जन्म घेते आणि अल्पजीवी ठरते, सर्वस्पर्शी संवेदनातून, निर्ममत्वातून, विश्वात्मक दयार्द्रतेतून आणि सहानुभूतीतून त्याचा उदभव झालेला नसतो. परंतु तरीही यापैकी पुष्कळ साहित्य कसदार, जोमदार आणि ईर्ष्यायुक्त असते व त्याचे परिशीलन सहृदयपणे आणि रसिकपणे व्हायला हवे. या साहित्याला संस्थांनी प्रकाशनाचे दालन उघडून दिल्यास हा आक्रस्ताळेपणा, निषेध व दाखवेगिरी कमी होऊन खरे खरे जिवंत साहित्य निर्माण होईल अशीही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सरकारी परितोषिके आणि साहित्य निर्मिती, संस्कृतचे महात्म्य आणि मराठी साहित्यातील श्रेयस्थाने या संबंधीही प्रा. पु. शि. रेगे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विचार मांडले. अध्यक्ष रेगे यांनी मांडलेल्या या प्रश्नांचा नक्कीच गंभीरपणे विचार करायला हवा.

रंगलेले तीन परिसंवाद

संमेलनाच्या निमित्ताने ‘मराठीचे अध्यापन,’ ‘माझ्या मते उत्कृष्ट कवितेचे गमक’ आणि ‘ऐतिहासिक कादंबरीचे निकष’ या विषयांवर अनुक्रमे डॉ. ना. गो. कालेलकर, कवी अनिल व महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद झाले.

‘मराठीचे अध्यापन’ या विषयावरील परिसंवाद अति सामान्य झाला. परिसंवादातील चर्चा महाविद्यालयीन अध्यापनापुरतीच मर्यादित राहिली. परिसंवाद

सुरू असताना हे साहित्य संमेलन आहे की, 'प्राध्यापक संमेलन' असा काहीसा संभ्रम श्रोतृवर्गात निर्माण झाला होता. कारण बोलणारे सर्वच वक्ते प्राध्यापक होते. 'अभ्यासक्रमात मराठीचे महत्व', 'ललित वाङ्मयाचे अध्यापन,' अभ्यासक्रमाचा अध्यापनावर होणारा परिणाम,' संशोधनाच्या दृष्टीने मराठीचे अध्ययन, टीका वाङ्मय व काव्याचे अध्ययन हे या परिसंवादाच्या विषयाचे पोट भाग होते. आणि डॉ. अ. ना. देशपांडे, प्राचार्य म. वि फाटक, प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख प्रा. ग. ना. जोगळेकर, डॉ. स. ग. मालसे आणि प्रा. डॉ. सुनील सुभेदार यांनी चर्चेत भाग घेतला.

परिसंवादाचा समारोप करताना डॉ. ना. गो. कालेलकर यांनी मराठीच्या अध्यापनाला बदलत्या सामाजिक परिस्थितीच्या अभ्यासाची जोड देण्यात यावी अशी सूचना केली. या परिसंवादाने उपस्थितांचे केवळ मनोरंजन केले, कुठलाही नवा विचार दिला नाही.

'उत्कृष्ट कवितेचे गमक'

'माझ्या मते उत्कृष्ट कवितेचे गमक काय?' या विषयावरील परिसंवाद अक्षरशः गाजला. कविसंमेलनाचे आयोजन साहित्य संमेलनात करण्यात न आल्यामुळे अनेक वक्त्यांनी या परिसंवादाच्या निमित्ताने काव्यवाचनच केले.

डॉ. अ. ना. देशपांडे, प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. या. मु. पाठक, प्रा. सुनील सुभेदार, श्री. ग. ल. ठोकळ इत्यादि नियोजित वक्त्यांनी चर्चेत भाग घेऊन कवितेची गमके मांडली. पण चर्चेत हवा तसा रंग न भरल्यामुळे कवी अनिलांनी या विषयावर काही अधिकारी व्यक्तींना बोलण्याचचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनानुसार डॉ. वाळिंबे बोलायला उठले खरे परतु त्यांनी आपल्या भाषणाने एक वादळ उठविले व चर्चेला कलाटणी मिळाली.

डॉ. वाळिंबे यांचा थयथयाट

डॉ वाळिंबे यांनी आपल्या भाषणात नवकवींच्या समर्थकांवर कडक टीका केली. ते म्हणाले, की, नवकवींचा उद्दामपणा व उद्धटपणा आता चालू दिला जाणार नाही. नवकाव्य आत्मानंदासाठी असते. लोकांसाठी लिहिलेले नसते असे सांगण्यात येते. पण असे काव्य पेटीत गंधफुले वाहून ठेवले जात नाही तर ते छापल्या जाते. याचाच अर्थ असा की ते लोकांसाठी असते. अशी परिस्थिती स्पष्ट असल्याने आता त्यांची गय केली जाणार नाही.

दहाव्या शतकात निश्चित झालेली काव्याची गमके व प्रमाणे अजूनही अबाधित असून ८ दिवसांचे चर्चा सत्र घेतल्यास मी हे सिद्ध करून देण्यास तयार आहे, असेही आव्हान त्यांनी दिले.

परिसंवादात ठरलेल्या वक्त्यांपेक्षा अधिक वक्त्यांना बोलण्याची संधि दिल्याने या विषयावरील चर्चा दुसऱ्या दिवशीही घ्यावी लागली. यात संमेलनाध्यक्ष श्री. रेगे, डॉ. ग. त्र्यं. देशपांडे कविभूषण अण्णासाहेब खापर्डे, सौ. फाटक व डॉ. मा गो. देशमुख या जाणकारांनीही भाग घेतला.

प्रा पु. शि. रेगे यांचे विचार

संमेलनाध्यक्ष प्रा. पु. शि. रेगे यांनी परिसंवादात बोलताना सांगितले की, नव्यकाव्यावर दुर्बोधतेचा आरोप करण्यात येऊ नये. "भावार्थदिपिका सर्वांनाच समजत नाही. शेक्सपिअर सुद्धा सर्वांना कुठे समजलाय् ? नवकविता समजण्यासाठी स्वतःची जाणीव वाढवली पाहिजे."

उत्कृष्ट काव्याचे गमक आपण स्वतःच असतो असे सांगून उत्कृष्ट काव्य कोणत्याही भाषेत भाषांतर करता आले पाहिजे, असे प्रा. रेगे यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादन केले. मराठीतील काव्य हे इतर भाषातही उत्कृष्टतेने जाणवले तर ते उत्कृष्ट काव्य होय."

कवि अनिलांचा समारोप

प्रस्तुत परिसंवादाचा समारोप करतांना कवी अनिल म्हणाले, "टूम म्हणजे नवता नव्हे, टूम ही क्षणजिवी असते." पुढे ते म्हणाले, जुन्याला धरून जी प्रकट होते ती नवता होय. काव्याचे अनेक निकष आहेत. ज्या प्रमाणे ब्रह्म हे अवर्णनीय असते हे लक्षात आल्यानंतर त्या संबंधीच्या दृष्टीकोनांना दर्शन म्हणण्यात आले. येथे दर्शन याचा अर्थ ब्रह्मासंबंधीचा अर्थ असा आहे. त्याप्रणे काव्यासंबंधाने जो एक निकष केला, जाणवला, त्याबाबत आग्रह धरण्यात आला म्हणूनच कोणाला काव्य अलंकारात दिसले तर कोणाला औचित्य विचारात दिसले कोणाला रसात दिसले म्हणणेच निकषांना अनेकता हे काव्याच्या बाबतीत लक्षात आले म्हणूनच अलीकडील लोक अमकेच काव्य असा जो आग्रह धरतात तो एक उद्धटपणा असून ती एक निव्वळ टूम असते व ती फार काळ टिकत नाही." परिसंवादाला श्रोत्यांची चिकार गर्दी होती.

ऐतिहासिक कादंबरीचे निष्कर्ष

'ऐतिहासिक कादंबरीचे निकष कोणते ?' या विषयावर संमेलनात तिसरा परिसंवाद झाला. साहित्य संमेलनातील हाच काय तो एकुलता एक चांगला कार्यक्रम. परिसंवादातील सर्वच वक्त्यांची भाषणे अभ्यासपूर्ण होती. या परिसंवादात ४ कुळकर्णी आणि १ पेशकर यांनी भाग घेतला. परिसंवादातील आपल्या समारोपाच्या भाषणात म. म. दत्तो वामन पोतदार यांनी आपल्या विनोदप्रचुर भाषणाने श्रोतृवर्गाला खदखदून हसविले, भाषणाच्या ओघात यांनी घेतलेले रेशमी चिमटे काहींना बोंचलेही असतील.

ते या प्रसंगी म्हणाले, इतिहास आणि कादंबरी या दोन्ही निराळया गोष्टी असून दोन्हीचे कार्यक्षेत्र पूर्णपणे स्वतंत्र असल्याने ऐतिहासिक कादंबरीही कधीच निर्भेळ इतिहासाच्या पायरीवर जाऊ शकणार नाही. काही इतिहासकार कादंबरी इतके सरळ चित्र आपल्या पुढे लेखनाने उभे करतात. तथापि ऐतिहासिक कादंबरी हा एक निराळा बाणा आहे. इतिहास हा समग्र मानवी जीवनाची एक बाजू आहे. ऐतिहासिक कादंबरी ही गडद असली पाहिजे असे काहींना वाटते. इतिहासकाराला न दिसलेले आपणाला गवसले असा दावा कादंबरीकारांनी करू नये. प्रतिभाशक्ति ही काही कादंबरीकारांची मिरासदारी नसून ज्येष्ठ इतिहासकाराजवळ प्रतिभाशक्ति असते या गोष्टीची यथार्थ जाणीव कादंबरीकारांनी जरूर ठेवावी.

पुणे येतील स. प. कॉलेजमधील प्रा. भीमराव कुळकर्णी आपल्या भाषणात म्हणाले, 'ऐतिहासिक कादंबरीच्या कसोट्या निव्वळ कादंबरीच्या असू शकत नाहीत. 'ऐतिहासिक या विशेषणाने गुणसंपन्न असलेली कृति इतिहासाच्या कसोटीशीही चांगल्या रीतीने उतरली पाहिजे. मात्र त्यासाठी भारतीयांचा व पाश्चात्यांचा इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टीकोन लक्षात घेतल्याखेरीज आपल्याकडील ऐतिहासिक कादंबरीचे गमक चांगल्या रीतीने स्पष्ट करता येणार नाही. पाश्चात्यामध्ये इतिहासाकडे सत्यनिष्ठेच्या भूमिकेतून पाहिले जाते, तर आपल्याकडे इतिहास आणि पुरावे यांच्यामध्ये फारसा फरक करण्यात येत नाही. त्यामुळे आमच्या साऱ्या बखरी ' पौराणिक ' थाटाच्या आहेत. आणि म्हणूनच अलिकडची ऐतिहासिक कादंबरी ही व्यक्तिचित्रप्रधान व विभूतीपूजक आढळते.

पार्ले कॉलजचे प्रा. व. दि. कुळकर्णी यांचे मते अलीकडील ऐतिहासिक कादंबरीतील प्रेमाची चित्रणे कलाविसंगत असल्याने ती रसहानि करतात.' त्या दृष्टीने हरभिऊ आपटे हे श्रेष्ठ ऐतिहासिक कादंबरीकार ठरतात.

अमरावतीच्या प्रा. कृ. व्य. पेशकरांनी ऐतिहासिक कादंबरीकार त्या त्या कालखंडाशी किती प्रमाणात समरस होतो त्यावरच तो निकष अवलंबून असल्याचे सांगितले तर ऐतिहासिक पात्रासंबंधी वाचकांची सांस्कृतिक नेणीव दुखावणार नाही, एवढा नकारात्मक निकष लावण्यात यावा असे नागपूरचे डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी सूचविले. प्रा. श्री. मा. कुळकर्णी यांनी ऐतिहासिक सत्य आणि सत्याभास यांचे योग्य मिश्रण ऐतिहासिक कादंबरीत असावे असे प्रतिपादन केले.

गुंजीकर–आपटे यांच्या कालखंडानंतर मध्यंतराच्या काळात ऐतिहासिक कादंबरीची मागणी मंदावली होती, पण अलीकडे या मागणीने पुन्हा जोर धरला असून ऐतिहासिक कादंबऱ्या विशेष लोकप्रिय होत असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत ही चर्चा विशेष महत्वाची वाटली. वक्त्यांनीही चर्चेत चांगला रंग भरला.

लेखिकांचा मेळावा

संमेलनात लेखिकांचा एक स्वतंत्र मेळावाही आयोजित करण्यात आला होता. श्रीमती शांताबाई किर्लोस्कर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मराठी लेखिकांच्या मेळाव्यात डॉ. अनुराधा पोतदार, सौ. आशा भाजेकर, प्रा. प्रभा गणोरकर, डॉ. सरोजिनी शेंडे, सौ. माणिक तामस्कर, उषा देशमुख, आशा मोरवणे, आशा खोत, इंदिराबाई कुळकर्णी, सुगंधा शेंडे आदी लेखिकांनी भाग घेतला. कथा, कवितांचे वाचन आणि आत्मकथन एवढेच मर्यादित स्वरूप या मेळाव्याला राहिले नाही. नाही म्हणायला कवयित्री डॉ. अनुराधा पोतदार यांच्या विचारप्रगल्भ निवेदनाने आणि प्रा. प्रभा गणोरकरांच्या भावोत्कट सुंदर कवितांनी या मेळाव्यात एक आगळीच शोभा प्राप्त करून दिली.

या मेळाव्याच्या संदर्भात श्रीमती शांताबाई किर्लोस्कर यांनी लेखिकांच्या अशा वेगळ्या फळीची आवश्यकताच काय असा प्रश्न विचारून कार्यक्रमाच्या आयोजनातली सर्व हवाच काढून टाकली. असा सवतासुभा निर्माण केल्याने महिला वर्गाला अन्य चर्चेत भाग

घेण्यापासून वंचित करण्यात येते अशी वेदनाही त्यांनी बोलून दाखविली. साहित्य संमेलनातील साहित्य चर्चेला सर्वच स्त्री-पुरूष लेखकांना दारे मोकळी असली तर ती चर्चा अधिक रंगू शकते हा शांताबाईंचा विचार अनाठायी आहे असे बहुधा कुणी म्हणणार नाही.

खाजगी कविसंमेलन

यंदा प्रथितयश कवीची अनुपस्थिती संमेलनात प्रकर्षाने गोचर झाली. संमेलनाचे अध्यक्ष कविवर्य पु. शि. रेगे असूनही कविसंमेलनाचा कार्यक्रम अधिकृतपणे आयोजित करण्यात आला नव्हता. याची रूखरूख अनेक उपस्थित कवींना जाणवली. कविसंमेलनाचा जाहीर कार्यक्रम झाला नाही तरी प्रतिनिधी निवासात रविवारी रात्री सभामंडपात नाटकाचा प्रयोग चालू असता इकडे कवींच्या काव्यगायनाचा एक बहारदार कार्यक्रम झाला. कवी सम्मेलनात विदर्भातील कवी जास्त होते. प्राचार्य या. मु. पाठक, डॉ. स. गं. मालसे, प्रा. वसंत आबाजी डहाके, प्रा. प्रभा गणोरकर, प्रा. कृष्णा चौधरी, प्रा. मधुकर केचे, प्रा. जयंत परांजपे, श्री. प्रभाकर सिरास, कुसुमानंद, जवाहर मुथा, प्र. श्री. नेरूरकर, वसंत कोगजे आणि श्री. अनंत अहमदाबादकर आदींनी या कविसंमेलनात भाग घेतला. प्रा. या. मु. पाठक या विदर्भाच्या वयस्कर कवीने तरूणांच्या कवीसंमेलनात भाग घेऊन आपल्या कवितांचे वाचन करून रंगत आणली. हा कविसंमेलनाचा कार्यक्रम सुमारे ३ तास चालला होता या कविसंमेलनाला जरी कुणी अध्यक्ष वगैरे नव्हता तरी त्यांचे संयोजन सत्यकथेचे कार्यकारी संपादक श्री. राम पटवर्धन यांनी मोठ्या खुबीने केले.

सांस्कृतिक कार्यक्रम

संमेलनातील सांस्कृतिक कार्यक्रम मात्र पुरेपूर मनोरंजनात्मक झाले. पहिल्या दिवशी पुण्याच्या सुप्रसिद्ध नर्तकी मंदाकिनी मालवीय हिने आपल्या नुपूर नैपुण्याने प्रेक्षकांना चांगलेच रिझविले. तर अलका बेंद्रे या वैदर्भीय बालिकेनेही आपल्या नृत्याची अप्रतिम चुणूक दाखविली. दुसऱ्या दिवशी स्थानिक कलाकारांनी सादर केलेला वैदर्भीय नाटककार श्री. मो. दा. देशमुख लिखित 'नयनात आंसवे हंसली' हा नाटचप्रयोगही बहारदार झाला. हा दर्जेदार नाटचप्रयोग पाहून पुण्या-मुंबईची मंडळी बेहद्द खूष झाली. तिसऱ्या दिवशी निर्मला गोगटे यांचे गायनही असेच रंगले.

संमेलनातील ठराव

या संमेलनात आलेले सर्व ठराव उपसूचना वा विरोध याखेरीज एकमताने पारित झाले. ठरावावर, ठराव मांडणाऱ्यांनी व त्यांना अनुमोदन देणाऱ्याखेरीज कोणाचीही भाषणे झाली नाहीत. असा प्रकार आतापर्यंत तरी कधी घडला नाही. सीमाविषयक प्रश्न सोडविण्यासंबंधीचा ठराव प्रा. रेगे यांनीच मांडला. परंतु त्याची भाषा मात्र आजपर्यंतच्या या विषयावरील ठरावाच्या मानाने फारच बुळबळीत होती.

शुद्धलेखनविषयक विविध सूचनांचा विचार करून त्यासंबंधी एक अहवाल तयार करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. शुद्धलेखनासंबंधीचा घोळ एकदा कायमचा मिटवावा असे सर्वांना वाटत असल्याने या समितीच्या अहवालाने समाधान होते की नाही ते आता पहावयाचे आहे. विदर्भात हे संमेलन आयोजित करण्यात आले असल्यामुळे 'तरुण भारता'चे अभिनंदन करणारा ठराव येथे अपरिहार्यच होते. मराठी वाचक आणि मराठी जनता यांच्या दृष्टीने कितीतरी महत्वाचे प्रश्न ठराव रूपाने या संमेलनासमोर यायला हवे होते. पण तसे ते आले नाहीत. विषय नियामक समिती व महामंडळ यांच्या चाकोऱ्या आता ठरीव स्वरूपाच्या झाल्या आहेत.

वऱ्हाडी आदरातिथ्य

संमेलनातील तीन दिवसांची व्यवस्था वर्धा निवासियांनी इतकी उत्कृष्ट ठेवली की, त्याविषयी लिहावे तेवढे थोडे ! सुग्रास जेवण हे तर या संमेलनातील सर्वात मोठे वैशिष्ठच मानावे लागेल. संमेलनाला उपस्थित असलेल्या प्रतिनिधींची निवासाची सोयही उत्तम प्रकारे करण्यात आली होती. स्वागताध्यक्ष श्री. रामेश्वर बजाज, प्रा वामनराव चोरघडे, प्रा. कुसुमाकर वोरीकर आदी मंडळींनी या संमेलनासाठी अपार श्रम घेतले. स्वयंसेवकांनी व इतर कार्यकर्त्यांनी पाहुण्यांचे आदरातिथ्य उत्तम प्रकारे करण्यास मदत केली.

प्रतिनिधीसाठी एक केशकर्तनालय व लाँड्रीही सुरू करण्यात आली होती. आणि आश्चर्य असे की केशकर्तनालयाचे मालक स्वतः, दाढी वाढविलेले, म्हणे नियतकालिकाचे संपादक होते. या संपादकाची कार्डीनो त्याला न सांगताच मुलाखत घेतली असे सांगण्यात आले. या वर्षा शहरात ५० हून अधिक पत्रकार आहेत, आणि त्यातील अनेकजण कोणत्या तरी नियतकालिकाचा संपादक आहे.

या संमेलनाला थंडीच्या भीतीने अनेक लोक आले नसतील त्यांना नक्कीच वाईट वाटले असेल. कारण संमेलनाच्या काळात थंडी मुळीच नव्हती. वर्ध्याच्या परिसरात महात्मा गांधी, विनोबाजी भावे यांचे वास्तव्य झाल्याने त्यांचाच परिणाम म्हणून हे संमेलन कोणत्याही प्रकारची खडाजंगी, निषेध, गरमागरमी वगैरे खेरीज पार पडलें की काय ते कळत नाही ! एवढे नक्की की शांततेने पार पडलेले हे समेलन फार काळ लक्षात राहिल यात शंका नाही.

प्रतिवर्षी साहित्य संमेलने होत आहेत. या संमेलनाला काही ठराविक मंडळी येतात, प्रतिवर्षी येतात आणि तीन दिवसानंतर हे संमेलन 'यशस्वी'पणे पार पडते. वर्षाचा सोहळा संपन्न होतो. ज्या गावात ते भरते, ते गाव धन्य होते ! मग त्याला कुणी मराठीची पंढरी म्हणतात, तर कुणी मराठीची मक्तेदारी ! ! वर्ध्याच्या संमेलनाला आता कुठले नामाभिधान प्राप्त होते ते बघू या. परंतु एक रंगलेले आणि गाजलेले संमेलन असा वर्धा संमेलनाचा उल्लेख केल्यास ते अनाठायी ठरू नये एवढे मात्र नक्की !

(नागपूर नभोवाणीच्या सौजन्याने)

केशव सुतांचा व्यक्तिवाद

—भवानीशंकर श्रीधर पंडित

केशवसुतांवरील संस्कार–

केशवसुतांच्या विद्यार्थीदशेत शिक्षणाच्या क्षेत्रांत पॉलग्रेव्हच्या गोल्डन ट्रेझरीचा प्रसार होता. तिच्यांतील रोमॅंटिक रिव्हाइवलमधील कवींच्या कवितांवर त्यांचा भर होता. वर्डस्वर्थ आणि त्याचे समकालीन कोलरीज, बायरन्, शेली आणि कीटम् हे कवी त्यांना प्रिय होते. त्यांच्या कवितांची त्यांनी पुन्हा पुन्हा उजळणी केली होती. त्यामुळे त्यांतील सत्त्व व स्वरूप त्यांच्या वृत्ती वृत्तीत मुरलें व जिरलें होतें. त्यांची कविता म्हणजे त्यांच्या स्वातंत्र्यप्रिय व्यक्तित्वाचा स्वच्छंद आविष्कार आहे. केशवसुतांवर इंग्रजी साहित्यांतील स्वच्छंदवादी कवितेचा संस्कार आहे असे म्हटल्याने त्यांच्या स्वयंभू प्रतिभेस उणेपणा येतो ही समजूत चुकीची आहे. नंदादीप निरंजनावर उजळला म्हणजे त्याचा प्रकाश कांही उसना ठरत नाहीं !

केशवसुतांवर संस्कृत आणि मराठी कवितेपेक्षां इंग्रजी कवितेचा प्रभाव अधिक होता. याला कारण तें युग इंग्रजी भाषा आणि इंग्रजी वाङ्मयांच्या वर्चस्वाचें होतें. त्याकाळी राष्ट्राला इंग्रजी वाङ्मय नवें निराळें होते. त्या निराळेपणाची व नावीन्याची मोहनी स्वाभाविक होती. विष्णु कृष्ण चिपळुणकरांनी इग्रजी भाषेला वाघिणीच्या दुधाची उपमा दिली आहे. ती बहुधा तिच्या ओजस्वी स्वभावास आणि तेजस्वी विचारांस अनुलक्षून असावी. केशवसुतांनीं कांहीं कविता इंग्रजीत लिहिल्या आहेत. त्यांचा पत्रव्यवहार इंग्रजींत आहे आणि सॉनेटसारखे कांहीं काव्यप्रकार आणि रचनाप्रकार मराठींत आणण्याचा त्यांनीं हेतुपुरस्सर प्रयत्न केला आहे.

केशवसुतांचे कनिष्ठ बंधु सीताराम केशव दामले यांची 'केशवसुत निधन' ही विलापिका फेब्रुवारी १९०६ च्या काव्यरत्नावलींत प्रसिद्ध झाली होती. केशवसुत दिवंगत होऊन त्यावेळीं पुरते तीन महिनेही उलटले नव्हते. तिच्यांत ते सांगतात—

> जैसें आंग्लीं कविवर शले, बर्न्स, कीट्सादि नांवें
> ज्याची वाणी सहृदयजना डोलवी स्वप्रभावे
> तैसा मोठा कवि निघजला या महाराष्ट्रभागीं
> ईशक्रोधें परि हरपला सत्य आम्ही अभागी.

केशवसुतांच्या पूर्वींच्या पिढीतील कवी.

केशवसुतांच्या अगोदरच्या पिढींतील कुंटे, महाजनि, कानिटकर, प्रधान, कीर्तीकर, चितामणी पेटकर इत्यादि कवींचा इंग्रजी साहित्याशीं जांगला परिचय होता. केशवसुतांचें नसेल, इतकें यापैकीं कांहींजणांचे इंग्रजी भाषा व साहित्य यांवर प्रभुत्त्व होतें. परंतु आधुनिक मराठी कवितेचा विधाता म्हणून फक्त केशवसुतांचाच लौकिक झाला. कारण केशवसुतांच्या प्रकृतीचा गुणधर्म हाच मुळी स्वतंत्र व्यक्तिवादी कवीचा होता. व्यक्तिवादी कवीच्या काव्याचें तंत्र स्वतंत्र असते, छंद स्वच्छंद असतो आणि स्वभाव बंधमुक्त असतो. तो कोणत्याही रूढीला आदर्श मानण्यास तयार नसतो. केशवसुत रूढीला 'राक्षसी' म्हणतात; घोर, जुलमी आणि दुष्ट म्हणून शिव्या शाप देतात;

> जुने जाउ द्या मरणालागुनि ।
> गाडुनि किंवा पुरुनि टाका ॥
> सडत न त्या ठायीं 'टाका' —

अशा जळजळीत शब्दांत संताप व्यक्त करतात आणि 'परिसुनि त्याचे शब्द, रूढींचे दास म्हणों ते खवळूं द्या' अशी निर्भय बेपर्वाई दाखवतात. कारण त्यांना देवाधर्माबाबत, आचारा विचारा विषयी किंवा जीर्ण सामाजिक संकेता संबंधी सारे नियम अमान्य आहेत.

केशवसुतांचा कटाक्ष रूढीवर आहे. परंपरेवर त्यांचा राग नाहीं. रूढी व परंपरा या दोन अगदीं वेगवेगळच्या वस्तू आहेत. इंग्रजींत रूढीला 'सुपरस्टिशन्' (Superstition) म्हणतात. काळाच्या ओघांत तिला भलतेच महत्व चढते. त्यामुळे ती शास्त्रावर कुरघोडी करूं लागते. आंधळा समाज तिलाच शास्त्र मानूं लागतो इंग्रजींत परंपरेला 'ट्रडिशन' (Tradition) हा शब्द आहे. तीं पूर्वावर असली, तरी पवित्र व पूजनिय असते. केशवसुत आपल्या घराकडील गोष्टी सांगतांना शेवटीं तुळशीला वंदन करतात. अंगणांत दारापुढे रांगोळी काढलेली पाहून त्यांच्या अन्तर्दृष्टि समोरून तीर्थ, देव, सती, नरपती आणि पावन देवी सरकतात. आणि मूर्तिभंजन करतांना मूर्ति फोडूनि देऊं जोडोनिया परी विकूनिया, टाकूं न त्या अशी विवेकाची वाणी ते बोलतात. त्या वरून ते परंपरे विरूद्ध नव्हते हें स्पष्ट आहे. केशवसुत बंडखोर नव्हते. ते विचारी सुधारक होते. जुन्यातून जी नविनिष्पत्ति । काय नव्हे ती श्रेयस्कारक ?– या त्यांच्या प्रश्नांत विवेक आहे. 'देवांच्या मदतीस चल तर' या त्यांच्या उद्गारांत आत्मविश्वास आहे. आणि जो परमेश्वरास निर्मळ मनाने भजतो, त्यावर सौख्य सिंधुलहरी लोटतात अशी त्यांची श्रद्धा आहे.

काव्यरचनेचा विशेष वेगळामार्ग

व्यक्तिवादी कवि रूळलेल्या वाटेने चालण्यास तयार नसतो. काव्यरचनेचे ठराविक नियम तो जुमानीत नाही. अशी असावी कविता फिरून। तशी नसावी कविता म्हणून । सांगावया कोण तुम्ही कवीला। आहांत मोठे ?–असा रोखठोक प्रश्न तो जुन्या चाकोरीतील रसिकांस विचारतो. तो यमकें सहज साधल्यास साधतो. पण त्यांच्यासाठी अडून बसत नाही. नवयुगांतील विचारांना जुनीं वृत्तें अनुपयुक्त वाटली, तर तो वृत्तवैचित्र्य, जलधरमाला, गुलाबाची कळी किंवा टिप् फुलें टिप् यांसारखी नवीन वृत्तें निर्माण करतो. तो जेव्हां एखाद्या जिव्हाळ्याचा अनुभव निवेदन करतो, तेव्हा त्याच्या कल्पनेला स्फुरण चढते. आणि भावनेच्याभरांत तो जे शब्द वापरतो किंवा अलंकार योजतो, ते भावनेला अनुकूल आणि अनुरूप असेच असतात. भावना प्रेमाची असेल तर ते शब्द ते या हृदयांच्या संगमसमयीं कसल्या लौकिक रीती । घेउनि बससी ! सोड लाडके मर्यादेची स्फीती' असे कोमल आणि मधुर असतात, ती क्रोधाची असेल,तर शब्द'ऐकुन ते मज जो त्वेष चढे । त्यासरशी गवाक्षाकडे। मूठ वळुनि मी हात हिसकला । पुटपुटलोंही अपशब्दांला। म्हटलें–'आटप आटप मूर्खा ! । सतारफोड्या टाकसी न कां पिरपिर कसली खुशालचंदा । करिसी दिडदा-दिडदा–दिडदा'' असे जळजळीत तापलेले असतात आणि ती आनंदाची असेल, तर 'सुर्य, चंद्र आणिक तारे । नाचत सारे । हे प्रेमभरे । खुडित खपुष्पें फिरतो जिथे । आहे जर जाणे तेथे, । धरा जरा निःसंगपणा । मारा फिरके । मारा गिरके । नाचत गुंगत म्हणा म्हणा । झपूर्झा ! गडे झपूर्झा' असा त्या शब्दांत आनंदी आनंद असतो. व्यक्तिवादी कवीचे शब्द आणि छंद मनोभावनेला वश असतात. तिच्या चालीवर ते चालतात, तालावर नाचतात आणि सुरावर गातात.

व्यक्तिवादी कवीच्या दृष्टीत सर्व माणसें सारखीच आदरणीय असतात. हा उच्च हा नीच; हा सुशिक्षित, हा अशिक्षित; किंवा हा धनाढ्य आणि हा दरिद्री हा भेद भाव व्यक्तिवादी कवीच्या मनांत कधीच उपजत नाहीं. त्याला सुंदर आणि असुंदर असें कांहीं नसतें. मन ज्यांत रमेल तो विषय त्याच्या आकर्षणाचा व कौतुकाचा होतो, केशवसुतांचें मन फुलपाखरावरोबर रमते. त्याला पाहून तें न कळत उद्गारतात.– जें रम्य तें बघुनिया मज वेड लागे । गाणें सवेंचि मग होय मनांत जागे

त्याचे काव्यविषय–

व्यक्तिवादी कवीच्या काव्याचे विषय असे दिव्य व भव्य असतात, तसेच ते अमान्य व सामान्य असतात. केशवसुत 'परितव गानांतून, अले ! । थबथला हा भाव गळे; । गुङ् गुङ् गुड गुड भान नसे । सृष्टि अहा ! गुङ् मधुर असे' ही जशी भृंगाची

स्तुती करतात तशीच रूईच्या अगर कापसाच्या बोंडातील 'म्हातारी'ची प्रशंसा करतात. 'तव जनि, मृति न दिसे। अजामर रूप तुझे भासे' या शब्दांत तें तिची थोरवी गातात. त्यांना समुद्र काठावरील नैऋत्येकडला वारा जसा आनंददायक वाटतो तसेच रात्रीच्या भीषण एकांतांत भेसूर घुत्कार काढणारे घुवड काव्यविषयाला अनुरूप वाटते. कोणत्याही काव्य विषयाचे त्याला वावडे नसते. विश्वांतील वस्तुमात्राकडे तो कुतुहलदृष्टीने पाहात असतो त्याला 'दिवाळी' सारखा आनंदोत्सव व जितका रमवतो तितकाच 'सोसाट्याचें वादळ येनें। तरि तें तेंव्हा मज मानवतें। भुतें भोवतीं जरि आरडती। तरि तीं खचितचि मज आवडती' हा भीतिप्रद स्वानुभवही तितकाच रिझवतो. त्याचें अंत:करण अत्यंत हळुवार आणि विलक्षण संस्कारक्षम असते. झुळझुळणाऱ्या झुळुकीचा त्याला ओझरता जरी स्पर्श झाला तरी तिचे मनोगत त्याच्या लक्षात येते आणि धुई थुई नाच नाचणाऱ्या ओढाळ ओढ्याचे स्वैर वर्तन त्याला आनंद देते.

प्रत्येक प्राणी स्वतंत्र आहे. एक दुसऱ्याच्या स्वातंत्र्याला कुंपण घालूं शकत नाहीं, प्राणिमात्र समान आहेत, कोणी ही कुणाचे गुलाम नाही, जो तो आपआपल्याठिकाणीं मुखत्यार आहे या प्रकारच्या विचारसरणीमुळें व्यक्तिवादी कवीच्या आविष्कारांत एक तऱ्हेचा उद्दाम दर्प जाणवतो. वस्तुत: त्याच्या मुक्त मनोवृत्तीचा तो उद्दंड आविष्कार असतो. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातील फ्रान्समधील राज्य क्रांतीच्या मंथनातून स्वतंत्रता, समता व बंधुता ही तीन अत्यंत तेजस्वी रत्नें बाहेर पडली. त्यांचेच तेज जगात सर्वत्र विस्फारून पसरलेलें दिसते. केशवसुतांच्या कवितेत जन्मभूमीच्या पारतंत्र्या विषयी, मराठ्यांच्या पराक्रमा संबंधी आणि राष्ट्राच्या पूर्वइतिहासाबाबत अधून मधून जे सूर कानी पडतात ते त्यांच्या काळांतील राष्ट्रीय व सामाजिक जागृतीचे द्योतक आहेत. वाणी वीर्यशालिनी व प्रभावोत्पादक असण्यासाठी काळ अनुकूल असावा लागतो. इंग्रजी वाङमयात फादर पर्सीने जुन्यापुराण्या ऐतिहासिक लोक गीतांचा 'रेलिक्स' हा संग्रह प्रसिद्ध केला होता. महाराष्ट्रांत केशवसुतांच्या काळीं ऐतिहासिक संशोधनाचा प्रारंभ झाला होता आणि मराठे शाहीतील लावण्या व पोवाडे यांच्यावर मुद्रणाचा संस्कार होत होता. त्यांच्या कांही कवितांवर त्यांचा प्रभाव दिसतो. ते निसर्ग सिद्ध प्रतिभेचे, स्वतंत्र बुद्धिचे आणि नवीन विचारांचे कर्त्री असल्यामुळें त्यांच्या उद्गारांत कुठेही पर प्रत्यानेय बुद्धि अथवा प्रतिभेचा कोंडमारा आढळत नाही. त्यांची वृत्ति सर्वत्र स्वाभिमानाची दिसते.

सुंदरतेची उपासना --

व्यक्तिवादी कवि सुंदरतेचा उपासक असतो. नि:सीम स्वातंत्र्य चिरंतन प्रेम आणि शाश्वत सौंदर्य ही तीन त्याची उपास्य दैवतें असतात. विश्वांतील अनाहत नाद ऐकण्यास त्याचे कान आतुर असतात. तो अमूर्त अशा ईश्वरी तत्वाच्या साक्षात्कारा साठी आसावलेला असतो केशवसूतांना मधून मधून असे साक्षात्कार होत. ते एका ठिकाणी आपला साक्षात्कार सांगतात— "तो मज गमले विभूति माझी।

स्फुरत पसरली विश्वामाजी।
दिक्कालासहि अतीत झालों।
उगमी विलयी अनंत ठेलों।
विसरून गेलों अखिला भेदा' दुसऱ्या एका

ठिकाणीं ते आपला अनुभव निवेदन करतात—

कांही नांव नवीन देउनि तिला जेंव्हा तये वाहिलें,
तो तीने वळनी प्रसन्न वदनें त्याच्याकडे पाहिलें;
त्या रूपद्युतिनें दिपून नयनें निर्वाण तो पावला,
तो अन्तर्हित, दृष्टिचा विषय तो, एकाक्षणीं जाहला

व्यक्तिवादी कवीच्या भावना सदैव उत्कट असतात. एखाद्या उंच कड्यावरून धबधबा खोल खाली दरीत कोसळावा आणि ठिकऱ्या ठिकऱ्या होऊन त्याचे तुषार सर्वत्र उडावे त्याप्रमाणे, किंवा एखाद्या जळजळत्या जागृत ज्वालामुखी प्रमाणे, त्याच्या भावना आवेगाने उफाळून शब्दांचें रूप धारण करतात आणि पाण्याच्या लोटाप्रमाणें किंवा ज्वालामुखीच्या लाव्हचा प्रमाणे सर्व दूर पसरतात.

व्यक्तिवादी कवि आपल्या भावनेचे, कल्पनेचें अथवा अनुभवाचें वर्णन करतांना वर्ण्य विषयाशी इतका कांही तद्रूप होतो कीं त्याला कांही काळ आत्मविस्मृति पडते. केतकरांनीं त्या अवस्थेला 'सविकल्प समाधि' हे नांव दिले आहेत. व्यक्तिवादी

कवीचे व्यक्तित्व त्याच्या काव्यांत विलीन झालेले असते. पाकळीपासून सुगंध जसा वेगळा काढतां येत नाही. तसे त्या कवीचें व्यक्तित्व त्यांच्या काव्या पासून निराळे करतां येत नाहीं. कपडे काढतां येतात पण त्वचा शरीरापासून सोलून अलग काढता येत नाही. कवीचे व्यक्तित्व हे त्वचेप्रमाणें आहे. स्वतःच्या अंगोवर गोल गोल फेरे घेणारा भोंवरा जसा कांहीं काळ निश्चल स्थिरावल्या सारखा वाटतो, तसा व्यक्तिवादी कवि क्षणमात्र अंतर्मूख होऊन देहभान विसरलेला दिसतो. 'सृष्टीचा हा जसा भोंवरा। फिरतो आहे पहा भरारा। गरगर गरगर धरणी पासून चढत असे तो गगनात। मीहि कशाला येथ रहावे ? । काय असे ज्या मी चिकटावे ? । वाटे गिरक्या घेत मिळावे। या पवनाच्या चक्री, होउन लीन सच्चिदानंदांत;' हे उद्‌गार काढतांना केशवसुतावरोवर फेरे घेता घेता क्षणमात्र देहभान विसरलेले दिसतात.

त्याची कल्पना शक्ति —

व्यक्तिवादी कवीच्या काव्यांत साऱ्या विश्वात अनिर्बंध संचार करणाऱ्या त्याच्या कल्पनाशक्तीला अत्यंत महत्त्व आहे. त्याने निर्माण केलेल्या काव्यांत सर्वत्र त्या विशाल शक्तीचा प्रभाव दृष्टीला पडतो. शेक्सपीअर ने मिड् समर्स नाईट ड्रीममध्ये तिचे वर्णन केले आहे; —

As imagination bodies forth
The forms of things unknown, the poet's pen
Turns them to shake and gives to airy thing
A local habitation and a name

केशवसुतांनीं तिचा स्तव करताना म्हटलें आहे,

होते शोधक नेम, कर्णहि तिचे ते तीक्ष्ण भारी तसे,
होतें भाल विशाल देवगुरुनें पूजा करावी असे,
सूर्याची शशिची सुरम्य किरणें घेऊनि देवी सुश्री
होती गोवित, इंद्रचापहि तसे, त्या दिव्य वस्त्रामधीं
किंवा,
तीअत्यद्भुतगूढ शक्ति सहसा संचारता अंतरी,
मुक्तात्मा गगनी उडे, विधरतो इंद्राश्व तें पाहुनी

अथवा, दिव्यशक्तीनें स्फुरेगंधपुष्पी।
रंग खुलती ही तिने इंद्र चावीं ।।
सृष्टिमाजी जे रम्य असे कांही ।
तीच कारण त्या शक्ति असे पाही ।।

ही कल्पना शक्ति म्हणजे कवीची दिव्य दृष्टि असते. या दिव्य दृष्टिच्या बळावर त्याला चराचरांतील चैतन्याची ओळख पटते, तो निर्जीव वस्तूंना बोलावयास लावतो. जंतूंना विचार करावयास शिकवतो, धोंड्यामधून आरपार पाहतो आणि पोकळीत संचार करून अंतराळांतील तारकांत आत्म्यांना धुंडाळतो. जो सृष्टींतील नानाविध पदार्थावरील पडदा दूर सारतो आणि त्याच्यातील अव्यक्त शोभा व्यक्त करुन दाखवितो. कवीनें दिव्य दृष्टीनें निर्माण केलेली सृष्टि लौकिक सृष्टीसारखीच असते. परंतु कांही बाबतीत ती अलौकिक असते. त्या कल्पना सृष्टींतील फुलें कधी कोमजत नाहींत, फळे कधीं नीरस होत नाहीत, आणि तेज कधी मावळत नाही. रात्रीच्या वेळीं आपल्याला पहाटेच्या उषेचें दर्शन होत नाही. परंतु;—

तारा निष्प्रभ जाहल्या निजपथीं, प्राचीं दिशा रंगली,
गायाला खग लागले, मधुर निश्वासूं फुलें लागलीं ;
प्रावारून उशा तुषार पटला सूर्यप्रतिक्षा करी ;—
होतो पाहत डोंगरीवर उभा मोहून मी अंतरी.

या केशवसुतांच्या ओळी गुणगुणल्या म्हणजे तो देखावा आपल्या मनःश्चक्षू समोर मूर्त होतो. कवी त्या नवनिर्मित सृष्टीत दिक्कालांना उल्लंघून चिदानंदाच्या एका अनोख्या सृष्टींत प्रवेश करतो. तेथें वरवर भिन्न दिसणाऱ्या जगाची एकात्मता त्याच्या प्रत्ययाला येते आणि त्याच्या मनाला एक प्रकारचा अनिर्वचनीय आनंद होतो. कविकुल गुरु कालीदासाने त्या प्रकाशमयी अनोख्या सृष्टीचे वर्णन 'न प्रभा तरलं ज्योतिरुदेति व सुधातलात्' असें केलें आहे. त्याच सृष्टीला अनुलक्षुन वर्डस्वर्थने The light that never was on sea or land असे उद्‌गार काढले आहेत,

डेंस्मांडमॅकर्थीने (Individualism in the soul of Romantioncism. असे व्यक्तिवादी कवीचें मुख्य लक्षण सांगितलें आहे. ते केशवसुतांच्या कवितेला ततोतंत लागू पडते.

* * *

नूरन

—प्रा. कृष्णा चौधरी

कथासूत्र गळून पडलेले एक अभिनव (!) खंडकाव्य

विदर्भातील एक नवोदित कवी श्री अविनाश वरोकर ह्यांचे 'नूरन' हे अलिकडेच प्रसिद्ध झालेले खंडकाव्य. अलिकडे खंडकाव्याची निर्मिती थोडी मंदावतच चाललेली दिसून येते. महाकाव्यरचनेचे मराठीमध्ये दुर्भिक्ष जाणवल्यामुळे अलिकडे महाकाव्ये का निर्माण होत नाहीत असा एक प्रश्न मागच्या पिढीतील टीकाकारांना सतत पडत होता. आजच्या काळातही खंडकाव्याच्या निर्मितीचे दुर्भिक्ष जाणवत असल्यामुळे खंडकाव्याची निर्मिती पूर्वीसारखी का होत नाही असा एक प्रश्न आजच्या टीकाकारांना पडण्याजोगा आहे.

वरोकरांचे हे पहिलेच खंडकाव्य. आपले हे काव्य काव्यसमीक्षकांना पसंत पडेल की नाही याची शंका कवीच्या मनात आलेली असावी म्हणूनच त्यानी आपल्या या खंडकाव्याला विदर्भातील प्रसिद्ध कवी व टीकाकार यादव मुकुंद पाठक ह्यांचे आशिर्वाद जोडलेले आहेत. वरोकराचे खंडकाव्य कलेच्या दृष्टीने श्रेष्ठ खंडकाव्य असो की नसो, पण 'शशिमोहन' कर्ते पाठक यांची या खंडकाव्याला असलेली प्रस्तावना मात्र त्यांच्या चाळीस वर्षाच्या मराठी काव्यविषयक प्रदीर्घ चिंतनाचे फळ आहे याबद्दल शंका नाही खंडकाव्याची मूलप्रकृती काय आहे ? मराठीतील खंडकाव्याचे वर्गीकरण आपणाला कसे करता येईल ? खंडकाव्यरचनेचा मूलभूत गुणधर्म कोणता ? खंडकाव्यनिर्मितीच्या प्रक्रियेत कवीच्या व्यक्तित्वाचे स्थान कोणते ? इ. अनेक महत्वपूर्ण प्रश्नांचा उहापोह करण्याचा पाठकांनी प्रस्तावनेत प्रयत्न केलेला आहे खंडकाव्याच्या निर्मितीप्रक्रियेचे विवेचन करतांना अनुषंगाने त्यांनी आजच्या नवकाव्याविषयीही काही सांगितले आहे. वास्तविक मराठी रसिकांना पाठकांनी या प्रस्तावनेत जे सांगितले ते नवीन नाही. तळोधीच्या संमेलनात त्यांनी नवकाव्याविषयी आपली जी भूमिका व्यक्त केली होती तीच भूमिका त्यांची अजूनही कायम असलेली दिसते. खरोखरच आजचे साचेबंद व कृत्रिम काव्य पाहून तरी नवकाव्य हे अकाव्याच्या पातळीवर गेलेले दिसते. पाठकांच्या मते आज लिहिल्या जात असलेले नवकाव्य हे कलेच्या बाह्यसौंदर्याची वूज राखणारे व अभिव्यक्तीच्या लकवा गिरविणारे काव्य आहे. आजचे नवकाव्य हे एका विशिष्ट वर्गाचे, कंपूचे काव्य आहे अशी तक्रार त्यांनी केली आहे. विशिष्ट वर्गाच्या संपादक समीक्षकांच्या लहरीवर काव्यकवींची प्रतिष्ठा अवलंबून राहिली. त्यांनी शिक्का–मोर्तब केले ते काव्य म्हणजे विशुद्ध काव्य, खरे काव्य, इतर ते अकाव्य अशी समजूत दृढ झाली" हे त्यांचे उद्‌गार आजच्या काव्यक्षेत्रातील परिस्थिती पाहता खरे नाही असे कोण म्हणेल ?

वरोकरांचे 'नूरन' हे खंडकाव्य सत्तेचाळीसमधील विभाजनाची पार्श्वभूमी घेऊन अवतरलेले आहे. सत्तेचाळीस मध्ये हिंदुस्थानमध्यें भारत व पाकीस्तान अशी दोन शकलें झाली. आपण लिहिलेले हे खंडकाव्य आपल्याला कुशवन्तसिंगच्या Train to Pakistan या कादंबरीवरून सुचले असल्याची प्रांजळ कबुली कवीने प्रथमतःच दिलेली आहे. कुशवन्तसिंगाच्या Train to Pakistan या कादंबरीच्या सारांशाचा कवीच्या मनावर खोल परिणाम झाला. ते कमालीचे अस्वस्थ झाले. जवळजवळ दहा वर्षे त्या हृदयभेदक आणि प्रक्षोभक घटनांनी रात्रंदिवस त्यांचा एकसारखा पाठलाग केल्यामुळे त्यांचा अंतःक्षोभ वाढतच गेला. ते झपाटल्या गेले व त्या अवघड मनोवस्थेतूनच त्यांचं 'नूरन', हे खंड काव्य साकारलं अशी आपल्या काव्याची कुळकथा खुद्द कवीनेच सांगितलेली आहे.

स्वतः कवीनेच आपल्या काव्याची ही अशी जन्मकथा सांगितलेली असल्यामुळे आपण त्याच्या प्रकटीकरणारावर विश्वास ठेवला पाहिजे. पण आजचा काळ हा कवीच्या स्पष्टीकरणावर विश्वास ठेवणारा नाही. काव्यविषयक अनेक नविन निष्ठा आज उदयाला आल्या आहेत. आपल्या स्वतःच्या कृतीचे स्पष्टीकरण तर आज कलेच्या क्षेत्रातील अडगळ समजण्यात येते. कवीने स्वतःच सांगितलेल्या निर्मिती प्रक्रियेवरून जर आपण त्यांच्या काव्याची पारख करायला गेलो तर खरोखर काय हाती येते? 'नूरन' ही या खंडकाव्याची नायिका आहे. सतलज नदीच्या किनारी वसलेल्या मनोमाजरा गावात हे कथानक घडते. नूरन व जागिया यांच्या प्रणय जिवनाची शोकात्मक भावकथा कवीला सांगावयाची आहे. खंडकाव्याच्या सुरूवातीलाच कवीने मनोमाजरा गांवाचे वर्णन केल्यानंतर नायिका नूरनचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

कवीने काव्याच्या आरंभी केलेले या खंड-काव्यातील नायिका नूरनचे वर्णन जिवंत वाटत नाही. ते साचेबंद वाटते. नूरनचे वर्णन वाचून नूरनची विशिष्ट प्रतिमाच आपल्या डोळयांपुढे येत नाही, काव्यातील ओळीतून कळते. ते 'तिचे उरोज उन्नत आहेत व नयन शरावी आहेत' हे तर कोणत्याही स्त्रीच्या बाबतीत संभवनीय आहे. यात नूरनची आगळी व्यक्ति विशिष्टता कोणती चितारली गेली ? खरी गोष्ट म्हणजे हे वर्णन वाचून नायिकेची जिवंत व्यक्तिरेखाच आपल्यापुढे उभी राहत नाही, पुढे कवीने तिचे वर्णन करतांना

कुंतल भाळीं, मांग गुलाली
उरोज सन्मुख मधुर आवली
पायी पैंजण वाजत झुणझुण
नव उन्मोषित कमल पाकळी . . .

असे म्हटलेले आहे. आता इथे प्रश्न असा पडतो की हे वर्णन नूरनचेच आहे काय ? 'नूरन' ही मुसलमान कोष्टयाची कन्या. मुसलमान स्त्रियांमध्ये भांगांत गुलाल उधळण्याची चाल नाही. बंगालमध्ये ही चाल दिसून येते म्हणून कवीची 'नूरन' पाहून वाटते की आपण पंजाबमधील मुसलमान नायिकेचे वर्णन वाचत नसून बंगालमधील युवतीचे तर वर्णन वाचत नाही ना ? पुनः कवीने 'नूरन' च्या डोईवर पदर दिलेला आहे. तो वेगळाच मुसलमान स्त्रियां सलवार ओढतात. पदर घेणे, ही लकब तर खास मराठी वाटते. नूरनच्या व्यक्तित्वाला 'पदर डोईवर मूक पापणी' असले चित्रण शोभत नाही.

नूरनच्या व्यक्तिरेखेचे जिवंत चित्रण कवीला करता आले नसले तरी रेखासौंदर्य मात्र त्याच्या शैलीतून व्यक्त झाले आहे. नादाने भारलेल्या, शब्दमाधुर्याने ओथंबलेल्या काव्यातील अनेक ओळींचे दर्शन या काव्यात होते.

स्मित वलयाचे लेउन लेणें
चंद्रकोर ही खुले प्राचिवर
निलोत्पलि अन् मुग्ध कपोली
अनुरागाचे अंकण नवथर,

पुढे नायक–नायिकेच्या प्रणयसंगमातील भावानुभूतीचे कवीने रेखाटलेले चित्र नितांत सुंदर उतरले आहे.

शपथ तुझ्या उत्फुल्ल तनूची
नकोस विसरू रात सुहानी
अधर फुलातिल पराग अपुल्या
श्वासांनी ही लिहिल कहाणी

नूरन व जागिया यांच्या प्रणयमीलनाच्या सवि-स्तर चित्रणानंतर कवीने विभाजनाने उडालेल्या भडक्याचे चित्रण केलेले आहे. कवीने रेखाटलेल्या विभाजन कांडातील सैतानी प्रक्षोभाचे चित्रण मोठें विदारक उतरलेले आहे.

मातीचा सुत विराट मानव
उरांत खंजिर म्हणे विभाजन
कणकण कापुनि उर आईचे
दोन तराजूत तोलू आपण . . .

तसेंच 'नग्न करुनिया लुटल्या युवती'
स्तनाग्रावरी ठेउन भाले ।
'योनि उसवल्या शरपात्यांनी,
लिंग, कापुनि देत करावर'

ई. उद्‌गार कवीच्या मनावर सैतानी घटनांचा किती खोल व स्पष्ट ठसा उमटला याच्या निदर्शक आहेत.

शेंवटी 'नूरन' आगगाडीतून पाकिस्तानात निघून जाते. पण जगियाचा देह मात्र त्याच आगगाडीने तुडविल्या जातो. नूरनच्या हृदयाची व्यथा कवीने तुडविल्या जातो. नूरनच्या हृदयाची व्यथा कवीने बोलकी करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अेका पार्थिव देहा अविचल
अग्निरथ झणि गेला तुडवित
पंखाविण कुणी विकल पक्षिणी
अनंत जखमा असेल उकलित

अश्या नूरनच्या मनोव्यथेचे चित्रण करून कवीने खंडकाव्याचा शेवट—

रक्त निथळते अवती भवती
भग्न प्रीतिच्या अवशेषावर
कण कण येथिल आजहि कण्हतो
इथेच फुटले अखेर विल्वर. . .

अशा परिणामकारक शब्दात केलेला आहे.

वरोकरांच्या 'नूरन' या खंडकाव्याचे ओझरते दर्शन हे असे आहे. वरोकरांच्या या खंडकाव्याचे परिशीलन केले असतांना प्रश्न पडतो तो असा की खरोखरच प्रस्तुत खंडकाव्य काव्य गुण दृष्टीने अव्वल दर्जाचे खंडकाव्य आहे काय? ज्या Train to Pakistan या कुशवन्त सिंगाच्या कादंबरीवरून हे खंडकाव्य लिहिण्यास कवीला प्रेरणा झाली ती कादंबरी मात्र खरोखरच एक महाकाव्य आहे. अनेक खंडकाव्याच्या निर्मितीला प्रेरणा देण्याचे सामर्थ्य तिच्यात निश्चित आहे. पण एखाद्या ललितकृतीपासून प्रेरणा घेऊन तितकीच सुंदर दुसरी एखादी ललितकृति निर्माण करणे हे अवघड कार्य आहे याची जाणीव प्रस्तुत खंडकाव्याने तरी व्हावी.

कुशवन्तसिंगाच्या Train to Pakistan या कादंबरीत नूरन व जगिया यांच्या प्रणयचित्रणाची कथा प्रामुख्याने आलेली असली तरी या कादंबरीतील कथा केवळ या दोहोंपुरती मर्यादित राहत नाही. शिख व मूसलमान यांचे मनोमाजरातील विभाजनापूर्वीचे जिव्हाळ्याचे व सलोख्याचे संबंध व विभाजनानंतर मनोमाजरा गावाला आलेले युद्धाच्या मैदानाचे स्वरूप व त्यांच्या नैतिक संघर्षातील द्वंद्व कादंबरीकाराने कलात्मकरीतीने रेखाटलेले आहे. सोबतच कादंबरीकाराने पंजाबमधील लोक जीवनाचे दर्शन घडविण्याचाही प्रयत्न केलेला आहे. पंजाबमधील निसर्ग हा तर मनोमाजरा गावाचा एक अविभाज्य घटक आहे. सतलजशी तर नूरन व जगियाचेच नव्हे तर संपूर्ण गावाचेच अतूट धागे गुंतलेले आहेत. नूरन व जगिया यांच्या प्रीतीचे चित्रण कादंबरीकाराने यथार्थपणे रेखाटलेले आहे. कादंबरीमध्ये चित्रीत केलेल्या विभाजनकांडाचा मनावर खोल परिणाम होतो. अनुभवाच्या जिवंत व प्रामाणिकपणे केलेल्या चित्रणामुळे साध्या नित्याच्या घटनांनाही कादंबरीत कसा अर्थ प्राप्त होतो याचे ही कादंबरी मूर्तिमंत उदाहरण आहे. या कादंबरीचे सर्व सौंदर्य तिच्या हृदयद्रावक शोकान्त घटनेत सामावलेले आहे. ज्या ट्रेनने नूरन जाणार असते त्याच ट्रेनला अपघात होणार असतो पण जगिया मात्र अपघातासाठी मुद्दाम बांधलेला दोर कापून नूरनला अपघातापासून सोडवतो व तो मात्र ह्या कृत्यासाठी गोळीचा शिकार होतो. खरोखरच या नाट्यमय कारुण्यप्रधान घटनेमुळे या कादंबरीला नवीनच सामर्थ्याचे तेज प्राप्त झालेले आहे.

Train to Pakistan वाचून 'नूरन' खंडकाव्याकडे वळल्यास मात्र आपल्या अपेक्षा पूर्ण होत नाही. मूळ कादंबरीमध्ये अनेक रसोचित प्रसंग आहेत त्याचा कवीला उपयोग करून घेता आला असता पण कवीला त्याची जाणच नाही. उदा.— जगिया तुरुंगात जातो तेव्हां त्याच्या आईच्या मनःस्थितीचे चित्रण कादंबरीकाराने किती सजीवपणे रेखाटले आहे त्याचे या काव्यात ओझरतेही दर्शन होत नाही. ज्या मनिलेंडरच्या खुनामुळे मनोमाजरा गावाच्या घटनांची चक्रे झपाट्याने फिरायला लागतात व जगियाला त्याच्या खुनाच्या संशयावरून अटक होते याचेही दर्शन या खंडकाव्यात होत नाही. ज्या नुरनच्या जीवनाचे चित्रण करण्यावर कवीने आपले लक्ष केन्द्रित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या नायिकेचे चित्रणही त्याला नीट रीतीने करता आलेले नाही. ती मुसलमान कोष्ट्याची कन्या आहे. तिच्या अंगावर जरतारी किनारी वस्त्र आहे, एवढच आपल्याला तिच्याविषयी कळते. नंतर दुसरे महत्वाचे पात्र म्हणजे जगियाचे. जगियाच्या व्यक्तिरेखेचे जे दर्शन कादंबरीत होते त्याचे ओझरतेही दर्शन या काव्यात होत नाही. या काव्यात जगिया नूरनशी प्रणयसंभाषण करतांना स्वतःचा उल्लेख 'डाकूपुत्र' म्हणून करतो हे जगियाच्या भूमिकेवरून अस्वाभाविक वाटते. तसेच— कुप्रसिद्ध डाकूचा मी सुत असे जगिया स्वतःविषयीच म्हणणे शक्य तर आहे काय ? नूरनच्या अतीव प्रेमाचा कल्पना असूनही तो नूरनला 'तू माझ्यासाठी प्राणार्पण करशील काय ?' अशी नेभळट शंका विचारतो.

'कुप्रसिद्ध डाकूचा मी सुत
कुलीन कन्या तू तर नूरन
प्राणार्पण करशील काय तू
जगियाला अर्पून तनमन ?

या शंकेमुळे तर मूळ जगिया व नूरन यांच्या अपार्थिव प्रीतीवरच कवीने बोळा फिरवलेला आहे.

या काव्यातील महत्वाचा भाग म्हणजे विभाजनाच्या भडक्यामुळे उठलेल्या हिंसात्मक कृत्यांचा. त्याचेही चित्र या काव्यात यथार्थपणे Perspective उतरलेले नाही. कवीच्या मनावर विभाजनाच्या भडक्याचे जे परिणाम झालेले चित्रित केलेले आहे ते वरेच 'पुस्तकी' वाटतात. खरे म्हणजे विभाजनाच्या घटनांचे जिवंत चित्रण हा त्याच्या अनुभवाचा विषयच झालेला नाही व तो त्याच्या भावजीवनाचाही अनुभव नाही. वास्तविक या ठिकाणी या काव्याची कलात्मक ऊंची व सखोलता वाढलो असती पण पाठकांच्या म्हणण्यानुसार काव्य हा वरोकरांच्या जीवनाचा गंभीर धर्मच झालेला नाही. येथे तटस्थाची भूमिका घेऊन कवीने विभाजनातील घटनानुभवांचे प्रामाणिकपणे चित्रण केलेले असते तर त्याचे काव्य श्रेष्ठ दर्जाचे झाले असते. पण तसे नूरनच्या बाबतीत झालेले दिसत नाही. म्हणूनच 'लिंग कापुनी देत करावर' – 'योनि उसवल्या शरपात्यांनी' या ओळी बेचव व परिणामशून्य वाटतात.

या काव्याच्या बाबतीत जाणवणारी मुख्य उणीव म्हणजे ज्या लोकजीवनाचे चित्रण (Local habitation) कवीला करावयाचे त्याचेच ज्ञानही कवीला नाही. लोकधर्मी हा वास्तविक नाट्यधर्मीचा आधार आहे. म्हणूनच कवी इथे अनुभवाचा अनुभव व्यक्त करण्यात, 'अनुव्यवसायात' असमर्थ ठरला आहे. नूरनविषयक वर्णनात 'कुंतल कुरळे भांग गुलाली' असे वर्णन करून तिच्या डोईवर मराठी स्त्रीप्रमाणे पदरहीं देऊन ठेवणे हे नाट्यधर्मी व्यक्त करतांना लोकधर्मीशी असणारे त्यांचे संवादी स्वरूप माहीत नसल्याचे द्योतक आहे.

खंडकाव्यात कथाबंध असतो. पण खंडकाव्यात कथाबंधाला केवळ कथाबंध म्हणून स्थान नसते, तर त्या कथाबंधाचे कथनही, निवेदनही महत्वाचे असते. खंडकाव्य हा एक निवेदनप्रधान काव्यप्रकार आहे. या काव्यप्रकारात कधी कधी स्वतःकडे निवेदनाची भूमिका घेऊन निवेदन करीत असतो वा एखादे पात्र निवेदन करीत असते कथात्मकता ही महाकाव्याप्रमाणें खंडकाव्याची ही मूलप्रकृत्ती आहे. प्रस्तुत काव्यात कथेचे कथन नसल्यामुळे या काव्याला आपण खंडकाव्यही म्हणू शकत नाही तसेंच वैचारिकता व भावनाकल्लोळही यात नसल्यामुळे चिंतनात्मक खंडकाव्यही यालां म्हणता येणार नाही. आता प्रश्न उरला तो हा की हे काव्य नाट्यकाव्य आहे की भावकाव्य ? पण कवीच्या भूमिकेत आत्मनिष्ठ व वस्तुनिष्ठ या भूमिकांचे एकीकरण झालेले नसल्यामुळे याला नाट्यकाव्य जसे म्हणता येणार नाही तसेच भावकाव्याचा प्राणभूत गुणधर्म 'कवीचा आत्मविष्कार' तोही इथे दृगोचर होत नसल्यामुळे या काव्याला आपणाला भावकाव्यही म्हणता येणार नाही. सारांश प्रस्तुत काव्य खंडकाव्य, नाट्यकाव्य व भावकाव्य या कोणत्याही सदरात बसू शकत नसल्यामुळेच या काव्याची असमर्थता पाठकांच्या लक्षात आली असणार. म्हणूनच त्यांनी एका अमूर्त (Abstract) कलेचा विलास "आणि या कथा सूत्राधिष्ठित खंडकाव्यातून अखेरीस जेव्हा कथाच गळून पडते तेंव्हा एका अभिनव खंडकाव्याची निर्मिती येथे सहजतेने होऊन गेली हे जाणवते" असले उद्गार काढलेले आहेत. खरोखर पाठकांचे हे उद्गार दिसायला वरवर अभिनव वाटत असले तरी कवीची तो पाण्याशिवाय केलेली हजामतच आहे याची चाणाक्ष रसिकांना जाणीव होते.

शेवटी या काव्यात दिसतो काय तर केवळ गुळगुळीत शब्दांचा बेचव प्रत्यय. येथील शब्दांची नाणी घासून घासून गुळगुळीत झालेली आहेत मर्ढेकरांच्या शब्दांत सांगायचे झाले तर येथील शब्द म्हणजे नर्मदेच्या पाण्यातील गुळगुळीत गोटे आहेत. अर्थशून्य शब्दांच्या अनेक उतरंडा येथे दिमाखाने मिरवीत आहेत. उदा–रात काजळी, कणकण, काहिली, अधर, झरझर, नवथर, कूस, माय, रक्त, थरारला, कातर, ऊर, उसासे, निखारी, कळी, क्रुद्ध, स्फुदन, इ. शब्द वाळुचे रण इथे पुनः पुनः खुदकन हसते, मनातले मन पुष्कळदा किंचित कण्हते व वांगडी तर काव्यात कुठेही व कितीतरीदा पिचते. एकंदरीत नूरन म्हणजे गुळगुळीत शब्दांची अर्थशून्य चमत्कृती. आजच्या काळांत मग तिचे स्थान काय ? आजच्या काळात खंडकाव्य लिहिण्याचे प्रयत्न होत नाहीत. 'नूरन हा दीर्घ कथाकाव्य लिहिण्याचा एक प्रयत्न हेच तिचे वाङ्मयीन यश व हीच तिची मर्यादा.

(नूरन, पृष्ठे ४१ किंमत ३ रूपये. प्रकाशक दि. मा. धुमाळ, नागपूर प्रकाशन, सीतावर्डी, नागपूर,)

अनुक्रमणिका

मराठी भावगीतांची वाटचाल

जी. एन. जोशी
रागेश्री
दिलीप गुप्ते पथ माहीम-१६

गेल्या ३० वर्षातील महाराष्ट्र. संगीताचा आढावा घेतल्यास असे दिसून येईल कीं, भावगीत या संगीत-प्रकाराने बहुजन समाजावर जबरदस्त मोहिनी घातली आहे. तेव्हा भावगीतांचा विचार करतांना ती प्रचारांत येण्यापूर्वीची परिस्थिती, त्यांचा उगम, प्रसार व सद्य-स्थिति या गोष्टीचे आकलन होणे जरूर आहे.

या शतकाच्या आरंभी महाराष्ट्रात वैचारिक क्रांति फार मोठ्या प्रमाणावर घडून येत होती व त्याला कारण टिळक, आगरकर, रानडे, गोखले, परांजपे, कर्वे यांच्यासारख्या महान व्यक्ति होत्या पण याच वेळी संगीत कला मात्र अगदी निकृष्टावस्थेला पोचली होती. बहुतेक गायक वादक कलाकार राजेरजवाड्यांच्या दरबारी ऐष व आराम यांत दंग होते. त्यांतले बहुतेक मुसलमान. मोगल आमदानींत यांच्या आश्रयदात्यांना लागलेल्या चैनी व विलासाच्या संवयी यांनीहि उचलल्या होत्या. त्यामुळे संगीत म्हणजे काही तरी भयंकर वाईट, जवळ न येऊ देण्याजोगे असा ग्रह करून घेऊन सुसंस्कृत समाज संगीत कलाकारांना आपल्यापासून चार हात दूरच ठेवण्याची खबरदारी घेऊ लागला. केवळ आपल्या आश्रयदात्यांनाच खूष करण्याच्या सवयीमुळे बहुजनसमाज संगीत कलेपासून पराङ्मुख झाला होता. ऐषआराम, चैन, व्यसन लोलुपता यामुळे कलावत अत्यंत लहरी बनले होते. त्यामुळे त्यांच्या जवळपास साधारण प्रतिष्ठित व्यक्तीचे जाणे म्हणजे फारच धाडसाचे समजले जाई.

अशा वेळी संगीत कलेच्या काही निःस्सीम उपासकांनी या मुसलमान गवयांची अहर्निश सेवा करून, पडतील ती कामे वा कष्ट उपसून, त्यांच्या लहरी संभाळून, त्यांच्यापासून विद्या संपादन करण्याचा चंग बांधला. कै. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, कै. भास्कर-बुवा बखले, कै. रामकृष्णबुवा वझे पं. विष्णु दिगंबर आदि महाभागांनी अक्षरशः तपश्चर्या करून विद्या हस्तगत केली. त्याच सुमारास, मराठी रंगभूमीवर नवीन नवीन संगीतप्रधान नाटके लोकमान्य होऊ लागली व त्यातील संगीत बहुजनसमाजावर आपला पगडा बसवू लागले. जो पांढरपेशा समाज संगीताला अस्पृश्यासम मानीत असे तो हलके हलके पुन्हा त्याच्याकडे ओढला जाऊ लागला व संभावित घराण्यातील तरुण फार मोठ्या प्रमाणांत नाही तरी हळू हळू माडीवरील चल गडे, 'नच सुंदरि करू कोपा', उगिच कां कांता,' आदि पदे गुणगुणु लागला, भाऊराव कोल्हटकर, केशवराव भोसले, नारायणराव (बालगंधर्व) बापुराव पेंढारकर, मास्टर दीनानाथ, आदि गायक नटांनी मधुर चालीनी नटलेली पदे सादर करण्यास सुरूवात केली. किर्लोस्कर कंपनीत रहिमत खाँ, गंधर्व कंपनीत कै. भास्करबुवा, ललितकलेत रामकृष्णबुवा याप्रमाणे महाराष्ट्रीय गवई येवून राहिले व मुसलमान गवयांपासून हस्तगत केलेल्या शास्त्रीय विद्येवर एक नवीन प्रकारचा साज चढून रंगभूमीवर ती श्रोत्यांना मोहवू लागली. अण्णा किर्लोस्कर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी यांच्या नाटयकृतींतून हे संगीताचे लोण बहुजनसमाजापर्यंत जाऊन पोचू लागले. प्रथम प्रथम चोरून नाटकांना जाणारी मंडळी आता उघड उघड एकटेच नाही तर सहकुटुंब व परिवारासह नाटकांना जाऊन त्यातील संगीतानंद लुटू लागली. विष्णू दिगंबरांनी तर एखाद्या मिशनऱ्याप्रमाणे प्रचार करून अभिजात संगीताचे महत्त्व व थोरवी पटवून देऊन त्याला शिष्टमान्यता मिळवून दिली. या

सर्वांचा परिणाम म्हणजे बहुजनसमाज पुन्हा संगीताभिमुख झाला हे नाट्यसंगीत रस व अभिनय यांना पोषक असल्याने व त्याची बांधणी. ठेवण नाटकातील प्रसंगांना उचित असल्याने जरी ती पदे शास्त्रीय दृष्ट्या उच्च दर्जाची असत, तरी त्या संगीताने कायम अशी पकड घेतली नाही. परंतु पुढे त्याच गाण्याच्या ध्वनिमुद्रिका निघून ती सर्वत्र उपलब्ध झाली, तेव्हा या रेकॉर्डस्‌ना बेसुमार मागणी आली. प्रत्यक्ष नाटक पुन्हा पुन्हा पहाण्यापेक्षा रेकॉर्डस वारंवार लावून आपल्या आवडत्या नटाचं गायन घरबसल्या ऐकायला मिळू लागले. परंतु, त्या गायनाची मोहिनी शास्त्रदृष्ट्याच होती. नाटकातील पद्यरचना प्रसंगनिष्ठ असल्याने ती क्लिष्ट व दुर्बोध असली तरीही केवळ नाद-मधुर चाल व गायकीचं कसब यामुळे ती लोकांना आवडू लागली. सुसंस्कृत समाजातील शे. ९० लोकांना त्यातील अर्थ समजत होता की नाही याची शंकाच ! उदाहरणादाखल 'ललना मना' हे एकच प्याल्यांतील अत्यंत लोकप्रिय पद घ्या, सुरूवातीच्या ललनामना या शब्दपंक्तीतील नादमाधुर्याखेरीज त्या गाण्यातील कोणताच अर्थ श्रोत्यांच्या ध्यानी आला असेलसे वाटत नाही. मुद्दाम लक्ष देऊनही तो लक्षात येणे कठीण. कारण 'नचअघलव शंकाअणुहि सहते कदा। सृजनि त्यांच्या विधि तरल गे-विमल प्रकृतिसी पुण्य परम' ही शब्दरचना आत न जाता सरळ डोक्यावरून जाते; सुसंस्कृत समाजाची ही स्थिति, मग बहुजन समाजाची काय अवस्था असेल नाटकातील कथानक, नेपथ्य, अभिनय याने आधीच दिपलेला तो श्रोतृगण जरी त्या शास्त्रीय संगीताने भारावून जाई, तरी अर्थबोधाच्या अभावी अगदी कोरडा ठणठणीत थिएटरबाहेर पडे. या वर्गाला आपली तहान भागविण्यासाठी लावण्या व तमाशांचे फड, याकडेच धाव घ्यावी लागे. नाट्यसंगीतात वैचित्र्य भरपूर, पण अर्थबोधाची वानवा. तर लावणी तमाशामध्ये संगीताचे वैचित्र्य कमी (बहुतेक लावण्या अगदी ठराविक चेहऱ्यामोहऱ्याच्या असतात), पण अर्थाची खूप गंमत व ती इतकी सुगम आणि सुबोध की श्रोत्यांना गुदगुदल्या करणारी.

समाजातील सुसंस्कृत नागरी समाज व सर्वसामान्य ग्रामीण समाज यांची परिस्थिती ही अशा तऱ्हेची असतांना भावगीताचा उगम झाला. नाटकातील व तमाशातील पद्यरचनेखेरीज इतर पद्यरचना करणारे कवि बहुधा आध्यात्मिक वा नीती कल्पनांवर काव्ये करीत. पण आंग्ल वाङ्गमयाच्या परिशीलनाने त्यांचा वावरणारा दृष्टिकोन बदलला. पारमार्थिक वा आध्यात्मिक वातावरणात कवी आपल्या स्वत.भोवती बघू लागला. आपले जीवन, आपल्या भोवतालच्या लोकांचे जीवन, त्यांची सुखदुःखे, ही सर्व त्याच्या काव्याचा विषय बनली. काव्य म्हणजे हृदयाचे बोल, भावनांचा सहजस्फूर्त उद्‌गार' ही काव्याची नवी व्याख्या बनली व अशा रीतीने भावगीताचा उगम झाला. भावगीत म्हणजे ज्यात कवी आपल्या अंतरीच्या भावना अत्यंत उत्कटतेने प्रकट करतो ते त्याच्या मनात उसळणाऱ्या भावनाच्या कल्लोळाबरोबर ज्या सुंदर कल्पना निर्माण होतात त्यांना काव्यस्वरूप देवून त्या गेय रचनेत ज्यावेळी मांडल्या जातात त्यावेळी भावगीताची निर्मिती होते. तात्पर्य, भावगीत हा कवीच्या विशिष्ट क्षणीच्या चित्तवृत्तीचा गेय अविष्कार आहे. सर्व सृष्टीचे मनोव्यापार व व्यक्तिमात्रांचे मनोव्यापार भावगीतांचे क्षेत्र बनल्याने विषयांची कमतरता नव्हती जे जे सुंदर ते ते बघून केशवसुत वेडे होत, तर बालकवींना अरूण, संध्या राग मोहून टाकीत. तांब्यांना विधवेचे दुःख बेचैन करी, तर माधव ज्युलियनाच मत संगमौत्सुक डोहांत उडी मारी गिरीश 'भ्रल्लरी'ची ललकारी सोडीत, तर यशवंत 'आई'स हाक मारीत, संजीवनी मृदु मंजुळ स्वरांत बाळाला करी झोपवीत तर गोविंदाग्रज गुलाबी कोडे टाकीत. बोरकरांची आगबोट दर्यात चाले तर सोपानदेव तक्रार करीत की, 'आडाचं पानी लई खोल' वऱ्हाडच्या गुणवंत देशपांड्यांना संभ्रम पडे की, कोणता मानू चंद्रमा-मू वरिचा की, नभींचा तर ना. घ. देशपांड्यांची शीळ महाराष्ट्राच्या कडेकपाऱ्यांत घूमू लागली. मायदेव लहानग्यांना वाऱ्याच्या मावशीबरोबर खेळवीत, अनिलांची फुलवात मंद प्रकाशात तेवू लागे, तर घाटे 'नवलाख दिवे तुझ्या घरी, कां जातिस दुसऱ्यांच्या दारो' असा रोख सवाल करीत या आधुनिक कवींनी नुसते भावनापूर्ण लेखनच केले नाही तर भावनापूर्ण काव्यगायन करण्याचा प्रयत्न केला. गायकीचे ज्ञान नाही, मूळचा काही भलाबुरा आवाज असेल तो, परतु गेय विषयाशी तन्मयता, यामुळे त्यांचा हा प्रयत्न पुष्कळ अंशी सफल झाला. किमान नाटकातील पदांखरीज इतर पद्यरचना गाऊन दाखविता येते इतके तरी त्यांनी सिद्ध केले. सुसंस्कृत मध्यमवर्गीयांवर

तर या प्रकाराने इतकी मोहिनी घातली की, प्रभात फिल्म कंपनीने निवडक कवींच्या काव्य-गायनाचा बोलपट घेतला. संजीवनी मराठे व सोपानदेव चौधरी या दोघांखेरीज इतरांना स्वरताल ज्ञान विशेष नव्हतेच. तरीही गिरीश, यशवंत, अत्रे आदि कवींनी आपल्या आपल्या भावकृति इतक्या भावपूर्णतेने म्हटल्या कीं, रसिकांनीं त्याचे चांगले कौतुक केले.

या अशा पार्श्वभूमीवर भावगीताच्या क्षेत्रात मी पदार्पण केले. माझी 'शीळ' ही रेकॉर्ड १९३२ मध्ये निघाली मात्र, अवघ्या चार महिन्याच्या अवधीत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तिचे पडसाद ऐकू यऊ लागले. शीळमधील ग्रामीण वातावरणाने सर्व दख्खन मराठमोळा भारावून गेला. खेडयातल्या लोकांचं जीवन नागरी जीवनाहून अगदी निराळे. त्यांची दिनचर्या, वेगळी, त्यांचे प्रेमाचे विषय, त्यांच्या अशाआकांक्षा व ते व्यक्त करण्याचे मार्ग अगदी निराळे असतात. शेतकन्याची कारभारीण, त्याचे ढवळेपवळे, त्याचा पानमळा, मोट, आड, भरघोस दाण्यांनी भरलेली पिके आणि मोत्यांची कणसे, ती मचाण, ती गोफण, ती कांदाभाकर व लसणीची चटणी, व ती माघारणीनं आणलेली न्याहारी, ही सर्व अगदी वेगळी, निराळी, साधीभोळी, राहणी देवावरील श्रद्धा, शेजारधर्म, आथित्य, कौटुंबिक व सामाजिक प्रश्न सर्व काही शहरी जीवनाहून निराळे. या सर्व विषयासंबंधी त्या साध्याभोळचा जीवनाच्या भावना त्यांच्याच साध्या रांगडया भाषेत व्यक्त झाल्या तर त्याला जे एक सहजसुंदर स्वरूप प्राप्त होते तेच जानपदगीत होय.

'शीळ' मध्यें जे ग्रामीण वातावरण कवीनं निर्माण केले आहे ते इतकं हृदयंगम आहे कीं, ग्रामीणांबरोबर नागरी मनही त्या वातावरणातील धुंदीनं भारून गेलं. गल्लोगल्ली, घरीदारी नाक्यानाक्यावर शीळ साद घालू लागली. सर्व महाराष्ट्र जणू काही एका नव चेतन्यानं खळवळून निघाला. इतक्यांत माझी दुसरी ध्वनिमुद्रिका 'डोळे हे जुलमी गडे' निघाली व तिने लहानथोरांना अक्षरशः वेडं केले.

'शीळ' मधील वातावरण, शृंगार सर्व कांही ग्रामीण, शहरी जीवनाला जरा अपरिचित पण अत्यंत साधं सरळ मूर्तिमंत वास्तव चित्र कवीनं उभं केलं त्यामुळे ते भावगीत गाजलं. 'डोळे हे जुलमी गडे' तांब्यांच्या लेखणीतून उतरलेलं त्यातील अत्यंत सूचक, हळू हळू गुदगुदल्या करणारा, पण मर्यादित शृंगार व घरोघरी ग्रामीण वा नागरी जीवनांत हरघडी अनुभवास येणारा गोड गोड प्रसंग, यामुळं रसिकांनी या भावगीतावर अक्षरशः कुरवंडी केली. कै. तांबे यांचीही ध्वनिमुद्रिका प्रसिद्ध होण्यापूर्वी कोल्हापूर येथे एका संमेलनाचे अध्यक्ष होते. मी या रेकॉर्डच्या कच्च्या प्रति घेऊन तेथे गेलो व त्या तेथे म्हणून व वाजवून दाखविल्या. तांब्यांनी जेव्हा आपल्या या काव्यकन्येचे सौंदर्य, स्वरदर्पणांत पाहिलं तेव्हा त्यांना इतका अपरिमित आनंद झाला कीं, त्यांनी आनंदाने मला मिठी मारली. माझा पहिलाच प्रयत्न अपेक्षेबाहेर यशस्वी झाल्यानं, त्यावेळच्या इतर कवींच्या ललित भावकृतींकडे माझं लक्ष गेलं व नंतरच्या १५–२० वर्षाच्या काळात जवळजवळ ६०–७० उत्तमोत्तम भावगीत मी रसिक जनतेला सादर केलो व त्यांनी त्यांच अमाप कौतुक केलं.

साधी, सुगम, सुबोध, लालित्यपूर्ण शब्दरचना, कल्पनेचे सौंदर्य, अर्थवाहक चाल, स्पष्ट शब्दोच्चार, व गायकाची गेय विषयाशी तन्मय होऊन ती भावपूर्णतेनं सादर करण्याची शैली, या गोष्टीवर भावगीत-गायनाचे यश अवलंबून असते. माझ्यानंतर यशस्वी भावगीत गायक म्हणून पुढे आलेले श्री. गजानन वाटवे हे एकटे होत. गायकीच्या दृष्टीने असणाऱ्या गुणांचा पूर्ण अभाव असूनहि, सुंदर काव्याची निवड, अर्थवाही चाल व मुख्य म्हणजे अत्यंत तन्मयतेने केलेला भावपरिपोष याच्या जोरावर या गायकीने यश मिळविल व ते अनेक वर्षे टिकवून ठेवलं, स्त्री-गायकांमध्ये सौ. भोळे या एकमेव गायिकेचा उल्लेख करावा लागेल. अत्यंत मधुर व तितकाच लवचिक आवाज, गायकीचं सर्वांगीण ज्ञान व श्री. केशवराव भोळयांसारखा चतुर, गुणी, व बुद्धिवान मार्गदर्शक लाभल्यानं त्यांची भावगीतही अशी सरस वठली.

भावगीत प्रकारानं थोडयाच काळात एवढी लोकप्रियता मिळविली की कालांतराने नाटयसंगीतालाही आपले स्वरूप बदलावे लागले. नवीन नाटकल्यातून सर्रास भावगीताचा उपयोग करण्यात येऊ लागला. नाटयमन्वर या संस्थेने सादर केलेल्या प्रयोगातून सौ. ज्योत्स्ना भोळे यांची भाव गीतंया दृष्टीनं फारच गाजली यानंतर अनेक, उत्तम आवाजाचे व गायकीचे ज्ञान असलेल्या गायक-गायिकांनी भावगीते हाताळली. परंतु तन्मयतेच्या अभावी यशस्वी गायकांच्या फक्त कसबी

उचलून सरसहा नक्कल करण्याच्या त्यांच्या प्रयत्नात त्यांना विशेषसे यश लाभले नाही यात नवल नाही.

याच सुमारास बोलपट कलाही प्रगतीपथावर होती. नित्य नवे बोलपट, नवनव्या तंत्राने प्रकाशित होऊ लागले. त्यांत संगीत-दिग्दर्शक म्हणून श्री. केशवराव भोळे, मास्तर कृष्णराव, सुरेश बाबू, दत्ता डावजेकर, व श्री. सुधीर फडके आदि कलावंत आपापल्या कला-चातुर्याने यश व कीर्ती मिळवू लागले. शांता आपटे, हिराबाई बडोदेकर, रत्नप्रभा, मीनाक्षी, शांता हुबळीकर वासंती आदि गायक नटी रजतपटावर चमकू लागल्या. श्री. शांताराम आठवले श्री. राजाभाऊ बढे, श्री. स. अ. शुक्ल, श्री. पु. ल. देशपांडे व श्री. ग. दि. माडगूळकर वगैरे कवी आपल्या प्रतिमेची चमक दाखवू लागले. या सर्वात श्री. ग. दि. माडगूळकर यांचे कवि म्हणून व श्री. सुधीर फडके यांचे दिग्दर्शक म्हणून यश व कर्तृत्व निःसंशय श्रेष्ठ आहे. दोघांच्याही प्रतिमेचा विलास इतका श्रुतिमनोहर आहे की माडगूळ-करांच्या लेखनचातुर्याने व फडक्यांच्या संगीत योजना कौशल्याने मति गुंग होते. गेल्या अनेक वर्षात निघा-लेल्या बहुसंख्य बोलपटाच्या यशामागे ही दुक्कल आहे हे नाकारून चालायचे नाही.

सामाजिक बोलपटातून प्रसंगनिष्ठ नवीन भावगीत निर्माण होऊ लागली व त्यांच्या लोकप्रियतेबरोबर विशिष्ट विषयांच्या लाटा येऊ लागल्या.

सुरवाती सुरवातीला भावगीतं राधाकृष्णा बरोबर गोकुळांत निनादत, पण नंतर गोकुळ सोडून त्यांनी अयोध्येत संसार थाटला (कौसल्येचा राम, रघुनंदन आले, श्रीरामा घनश्यामा, विनवित शबरी रघुराया, हीच राघवा हीच पैंजणे, हवाच मृग तो मला, वगैरे) व काही दिवस तरी भावगीतांच्या प्रांतात रामराज्य चालले. पण नंतर या रामराज्यावर पंढरीनाथाचे परचक्र आले पंढरीनाथा झडकरी आता, कशाला जाऊ मी पंढरपुरी, विठ्ठल तो आला आला मला भेटण्याला, वगैरे वगैरे).

ज्योत्स्नाबाईंनी काणेकरांचे 'आला खुशीत समींदर' नितांतसुंदर भावगीत लोकप्रिय केल्याबरोबर वाटव्यांचा वारा फोफावला व त्यानंतर बराच काल या समींदर-गीतांचा दर्या असा कांही उसळला की, जगबूड तर आली नाही ना अशी भीति वाटू लागली. देवदानवांनी मंदार पर्वताची रवी आणि वासुकीची दोरी करून समुद्रमंथन केलं तर अनेक भावगीतांनी एक प्रेमीयुगुल व एक छोटीशी होडी या भांडवलावर सारा दर्या ढवळून काढला (नाखवा वल्हव, झप झप नाखवा, आलं माझ्या रायाचं गलबत, माझी आगबोट चाले दर्यात ग नाविका रे नाव तुझी हाकार, आली चंदेरी रात वगैरे) देवदानवांनी मंथन करून काढलेल्या चौदाव्या रत्नाची खरोखरच फार आवश्यकता भासू लागली. प्रणयाची भावना केवळ समुद्रकिनाऱ्यावर फिरणाऱ्या तरुण-तरुणीतच उद्‌भवू शकते, घाटमाथ्यावर या भावनेला थारा नाही की काय असे वाटू लागलं. पण बराच काळ थैमान घातल्यानंतर ही लाट हळूहळू ओसरली व समिंदर शांत झाला. गडकऱ्यांनी संभाजी-तुळशीचा तो मस्त प्रणयप्रसंग रंगविण्याकरता निवडलेल्या स्थळाचा या भावगीतांनी अक्षरशः भाऊचा धक्का केला.

त्यानंतर आणखी एक लाट आली व ती म्हणजे माहेरचं खूळ. सौ. ज्योत्स्नाबाईंनी श्री राजा बढे यांनी लिहिलेले 'माझीया माहेरा जा' हे सुंदर भावगीत लोकप्रिय केल्याबरोबर या माहेरच्या खुळानं पक्कं मूळ धरलं व अल्पावधीत त्याचा वृक्ष होऊन त्याच्या सावलीत अनेक भावगीतं जाऊन बसली. (माहेरचा समोर गाव, जाणार आज मी माहेराला, कृष्णा मिळाली कोयनेला, दिन जाईना रात सरेना माहेराला मन करवेना, माहेराची आली गाडी वगैरे). नंतर काय झालं कुणास ठावूक हे माहेरी गेलेलं भावगीत पुन्हा एकदम सासरी आलं व श्रोत्यांच्या मागचा सासुरवास सुटून ती भावगीतं आपआपल्या घरी आल्याप्रमाणं नांदू लागली. सासर-माहेराबरोबर ओघानंच, लग्नविधी, मंडप, पाठवणी, डोहाळे, वगैरे प्रसंगही कवींना सापडलेच (मैत्रिणींनो सांगू नका नाव घ्यायला, उंबरठ्यावर माप ठेविले, सोन्याची अंगठी लिहायला, भाग्यवती, मी भाग्यवती ओटी भरा ग ओटी भरा माझी ओटी भरा, विहीणबाई संभाळा हो, जा मुली शकुंतले सासरी, तुझ्या सवे मी आज चालले प्रिया सात पाऊले इ. यातूनही काही अत्युत्कृष्ट भावगीते निर्माण झाली. 'गंगा यमुना डोळ्यांत उभ्या कां' हे गीत ऐकत असता कोणत्या रसिक श्रोत्याच्या भावना हेलावून जात नाहीत ? काही कवीनी कवीच..ते..तर काही काळ आपलं वास्तव्य चंद्रलोकावर नेलं. (चल चंद्रा पसर चांदणे, चंद्रावरती दोन गुलाब, चंद्रा दाखव

मजला वाट, रामाला ग चंद्र हवा, चंद्राच्या होडीत जाऊ ये जोडीनं, जारे चंद्रा तुडवित मेघा, वगैरे.)

लढाईच्या धामधुमीत 'गेला दर्यापार घरधनी,' 'निरांजन पडले तबकांत,' 'या चिलांनो या पिलांनो,' यासारख्या सुंदर भावकाव्यांना जन्म दिला.

बोलपटातील आकर्षक संगीतामुळे बरीच गेय पद्य-रचना होऊ लागली आहे. परंतु माडगूळकर, राजा बढे, शांता शेळके, पी. सावळाराम मंगेश पाडगावकर, वसंत बापट वगैरे शेलकी मंडळी सोडली तर इतरांची काव्यरचना अगदीच उथळ असल्याचे आढळून येईल. बोलपटांत भावगीतांचा दृश्य अविष्कार मिळत असल्याने त्याचा प्रेक्षकांवर तात्र्डतोब परिणाम होतो. व त्यामुळे अगदी मामुली स्वरुपाची पद्यरचना केवळ चांगला अभिनय, उत्तम छायाचित्रण, आकर्षक संगीताची सजावट, वगैरे गुणामुळे छाप पाडून जातात. थिएटर बाहेर जेव्हा तीच पदे गायक व गायिका गातात तेव्हा गायकाच्या कसबापेक्षा बोलपटांतील त्या पदाशी निगडित असलेल्या प्रसंगाच्या जाणीवेमुळेच श्रोते ती ऐकू शकतात. बोलपटांखेरीज रेडिओ व ग्रामोफोन ही दुसरी दोन भावगीतांना प्रसिद्धी देणारी साधने आहेत. पैकी रेडिओने बाष्कळ सिनेसंगीतावर घातलेला बहिष्कार उचितच आहे. श्रोत्यामध्यें सदाभिरूचि निर्माण करणे हे त्याचं कर्तव्यच आहे. भावगीताबाबत त्यांनी सुरू केलेला उपक्रमही स्तुत्यच आहे. पण उच्च अभिरूचीच्या मागे लागून श्रोत्यांच्या डोक्यावरून जाणारी काव्यरचना ध्वनिक्षेपित करण्यापेक्षा लोकांना सहज रूचेल, समजेल, पचेल अशी काव्ये रेडिओने घेतली पाहिजेत. रेडिओला कोणती गोष्ट कमी आहे. पैसा आहे, उत्तमोत्तम कवि, लेखक, संगीत-दिग्दर्शक, गायक, गायिका सर्व उपलब्ध आहे. पण या सर्वांचा योग्य तो उपयोग श्रोत्यांचे कान व डोके लक्षांत घेऊन केला तर उपयोग.

दुसरं साधन ग्रामोफोन. समाजाच्या अभिरूचीला वळण लावणं त्यांना शक्य नाही. कारण केवळ व्यापारी दृष्टीने, मागणी तसा पुरवठा या न्यायाने जे विकेल ते पुरवावं लागतं.

सुमारे १०–१५ वर्षापूर्वी काव्यरचना बहुशः वृत्त-बंधने पाळून होत असे व त्यामुळें ती काव्ये तालबद्ध करणे फार सोपे जाई. हल्ली ही बंधने पार झुगारून देऊन कवी नवकाव्य मुक्तछंदात करू लागल्यापासून, गेयकाव्य जवळ जवळ नाहीसंच झालं आहे. काव्य-गायनाऐवजी आता काव्यवाचनाचे कार्यक्रम रेडिओवर व इतरत्र ऐकू येतात. या नवकाव्यातील रचना काव्य-गुणाच्या दृष्टीने फार सरस असली तरी गेयतेच्या अभावी गायक-गायिकांना निरुपयोगी आहे. बोलपट संगीताला आकर्षक प्रसंगाच्या सहाचर्यामुळे व आकर्षक सजावटीमुळे सवंग लोकप्रियता मिळते. मस्त चाल व अतिशय प्रमुख असा ढोलक-ढोलकीचा ठेका यामुळे ती काव्यरचना बाष्कळ व थिल्लर असूनही सर्वतोमुखी व्हावयास वेळ लागत नाही. नवीन सुरस गेयमुलम काव्यरचनेच्या अभावी बोलपटांतून लोकप्रिय झालेली पदे निवडावी व त्या चालीवर रस्त्यात, जमेल तेथे भावगीत रचण्याचा कारभार उरकावा, हा सपाटा चालला आहे. अशा रीतीने सुंदर उडत्या चालीची चाकं लावून आपला भावगीत-रथ मिळेल ती सवारी त्यात बसवून बेधडक टाकण्याचा सपाटा सुरू आहे.

मी नेहमीच आशावादी वृत्तीचा असल्यामुळे ही परिस्थिती कायम राहील असा धोका जरी दिसत नसला तरी आजच्या सारखे संस्मरणीय व सुयोजित दर्जेदार काव्यदर्शनाचे कार्यक्रम पाहिल्यावर माझ्या आशावाद बळावतो.

विदर्भ साहित्य संघाच्या या कार्यक्रमाच्या निमित्ताने वैदर्भीय काव्याचे नितांत-रमणीय दर्शन तर झालेच पण काही अत्यंत उज्वल भविष्य असलेल्या कलाकारांचीही ओळख झाली.

विदर्भ साहित्य संघाची विक्रीस तयार असलेली प्रकाशने

	पुस्तके		रु. पैसे
१.	कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेखसंग्रह : भाग २		३–००
२.	The Vedasthan or The Ancient Home of the Indo-Aryans	ले. कै. डॉ. तु. ज. केदार	३–००
३.	प्रयोगक्षम मराठी नाटके	डॉ. मु. श्री. कानडे	१५–००
४.	केशवसुत वाङ्मयसूची	सौ. उज्ज्वल अयाचित	१–००
५.	मराठी वर्णोच्चार विकास	डॉ. द. ह. अग्निहोत्री	१६–००
६.	लोकसाहित्य संपदा	ना. रा. शेंडे	६–००
	कै. गडकरी वाङ्मयावरील प्रबंध		
७.	नाटककार गडकरी	डॉ. द. रा. गोमकाळे	०–३१
८.	गोविंदाग्रज यांचा कवी या नात्याने विचार	कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे	०–५०
९.	गडकऱ्यांच्या नाटकातील स्वगत	प्रा. श्री. मा. कुळकर्णी	०–५०
१०.	सतारीचे नव्हे ! एकतारीचे बोल	द. वि. तेंडूलकर	०–५०
११.	गडकऱ्यांची खरी भूमिका	प्रा. भ. श्री. पंडित	०–५०
१२.	गडकऱ्यांची नाट्यशैली	प्रा. रू. पा. पांजणकर	०–५०
१३.	गडकऱ्यांची नाट्यप्रकृति व नाट्यसृष्टी	वसंत वरखेडकर	०–६०
१४.	गडकरीकालीन नाट्यतंत्र व गडकरी	वसंत वरखेडकर	०–६०

सर्व प्रमुख पुस्तकविक्रेत्यांकडे मिळतात. न मिळाल्यास मागणी करा–

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर–१.

संघवार्ता
(फेब्रुवारी १९६९)

मा. नी गलगलीकर
नरचिटणीस, वि. सा. संघ

संगीत केंद्र

विदर्भ साहित्य संघाच्या सांस्कृतिक समिती अंतर्गत संगीत केन्द्रातर्फे मंगळवार दि. २४ डिसेंबर १९६८ रोजी रात्री ९ वाजता सौ. कौसल्या मंजेश्वर, (मुंबई) यांचे गडकरी सभागृहात गायन झाले. पेटीची साथ श्री. मधुसूदन भावे यांनी केली आणि तबल्याची साथ श्री. भरणे यांनी केली.

वि. सा. संघाचा वर्धापन

दिनांक १४ जानेवारी १९६९ ला विदर्भ साहित्य संघाचा वर्धापन दिन अतिशय थाटाने साजरा करण्यात आला. मुंबईचे एक ज्येष्ठ साहित्यिक प्रा. वि. ह. कुळकर्णी हे या वर्धापन दिनाचे प्रमुख अतिथी व वक्ते होते. रात्री मुंबईचे श्री. रंगनाथ कुळकर्णी यांचा 'एका गाढवाची कहाणी' हा एक पात्री कार्यक्रम संघाच्या धनवटे रंगमंदिरात झाला.

दि. १५ जानेवारी १९६९ रोजी एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील वक्त्यांनी भाग घेतला. अध्यक्षस्थानी प्रा. श्री. वि. ह. कुळकर्णी होते.

प्रा. डॉ. सुनील सुभेदार– समीक्षा
प्रा. म. ना. लोहो– निबंध
प्रा. ना. कृ. शनवारे– कथाकादंबरी
श्री. पु. व्यं. दारव्हेकर– नाटक
प्रा. श्री. वि. कृ. वऱ्हाडपांडे– काव्य

रात्री ८॥ वाजता वैदर्भीय काव्यदर्शन हा अभिनव कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमात खालील कवींच्या कविता गाऊन दाखविण्यात आल्या.

कै. आनंदराव टेकाडे, कवि बी., कै. ज. के. उपाध्ये, श्री. गु. ह. देशपांडे, या. मु. पाठक, वा. ना देशपांडे, म. श्री. पंडित, आ. रा. (अनिल) देशपांडे, शरदचंद्र मुक्तिबोध, मधुकर केचे, राजा बढे, ना. घ. देशपांडे, व सुरेश भट.

या कार्यक्रमाचे संगीत नियोजन श्री. यशवंत देव, शरद सुनवणे, मधुकर गुळवणी, वसंत रांडे, मधुसूदन भावे, विजय जोशी, प्रभाकर गडकरी, वसंत सहस्त्रबुद्धे, वसंत अंधारे, मधुकर ताम्हणकर यांनी केले.

गायक होते सौ. उषा पारखी, सौ. चाफळे, सौ. केतकर, सौ. वडोदकर, सौ. देव, कु. मीना सातोकार, कु. प्रमोदिनी गडकरी, कु. शोभा कोठेकर व सर्वश्री शरद सुतवणे, मधु ताम्हनकर, वसंत मांडे, गोपाळ कौशिक, चन्द्रहास जोशी, त्रिंबक काळे, वसंत सहस्त्रबुद्धे, प्रभाकर गडकरी, राजा कानगो, विजय जोशी.

वाद्यवृंद- शंकरराव पोपटकर, भैय्याजी वडसमुद्रकर, दत्ता देशमुख, राजा कानगो, प्रभाकर पिल्ले, प्रभाकर घोटकर, प्रभाकर गडकरी, वायवार, चंद्रहास जोशी, बाळ पुरोहित, प्रभाकर धारे, सतीश प्रधान, पुरुषोत्तम सामक, अरुण कोलते, पारखी.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुंबईचे ख्यातनाम भावगीत गायक व एच. एम्. व्ही. हृचा ग्रामफोन रेकार्ड कंपनीचे संचालक श्री. जी. एन्. जोशो आले होतें. त्यांनीही तीन गीते गाऊन दाखविली.

कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला

या वर्षीची बेहेरे व्याख्यानमाला महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य व भाषा शास्त्राचे गाढे व्यासंगी श्री देवीसिंग चौहान यांनी गुंफली.

" दक्खिनी हिंदी व तिच्यावर मराठीचा परिणाम "

व " दक्खिनी हिंदी व तिच्यावर मराठीचा परिणाम "

या विषयावर यांची दिनांक १९ व २० जानेवारी रोजी अत्यंत विचार परिप्लुत व्याख्याने झाली. अध्यक्षस्थानी नागपूर विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. भाऊसाहेब कोलते आणि डॉ. मा. गो. देशमुख हे होते.

कै. रा. ग. गडकरी यांचा ५० वा स्मृतिदिन

दिनांक २३-१-६९ रोजी कै. राम गणेश गडकरी यांचा ५० वा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. वि. मा. दी. पटवर्धन यांचे " एकच प्यालयातील सुधा-सिंधु-एक नवे चिंतन " या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. व्याख्यानाच्या अगोदर प्रा. पटवर्धन हे संघाचे सरचिटणीस श्री. गलगलीकर व श्री. वा. चिटणीस के. अत्रे यांचे समवेत सावनेरला जाऊन कै. गडकरी यांच्या समाधीचे दर्शन घेऊन आले.

या स्मृतिदिनानिमित्त अभ्यास मंडळाचे संचालक श्री. चंद्रकान्त कुळकर्णी यांनी समग्र गडकरी वाङ्मय प्रदर्शन आकर्षक रीतीने मांडले होते.

डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे यांचे व्याख्यान

दिनांक. २४ रोजी नॅशनल बुक ट्रस्ट या संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्री. बी. व्ही. केसकर यांनी सायंकाळी साहित्य संघाला भेट दिली. याच दिवशी सायंकाळी ६॥ वाजता भारत सरकारच्या संरक्षण खात्यातील प्रमुख मानसशास्त्रज्ञ डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे यांचे " स्वातंत्र्योत्तर काळातील साहित्यातील विचार प्रवाह " या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झाले.

अनुक्रमणिका

प्रकाशक व मुद्रक : मा. नी. गलगलीकर, सरचिटणीस, वि. सा. संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर-१
मुद्रणस्थळ : व्हीनस प्रिंटींग हौस, वैद्यवाडी, धंतोली, नागपूर-१

अनुक्रमणिका



साहित्यसम्राट आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या स्मृतीस
"युगवाणीचे" चे अभिवादन

अनुक्रमणिका

संपादकीय

आपली मायभूमी आणि आपली मायभाषा यांवर अमर्याद प्रेम करणारा एक प्रचंड कर्तृत्वाचा साहित्यिक म्हणून उभा महाराष्ट्र आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांना ओळखतो. केवळ, साहित्यात रुची घेणाऱ्या सुशिक्षितांच्या वर्गापर्यंतच आचार्य अत्र्यांची लोकप्रियता मर्यादित नव्हती, तर अर्धशिक्षित आणि अशिक्षित अशा मराठी जनतेनेही त्यांचे अमाप कौतुक केले. केवळ साहित्य-क्षेत्रातच आपली लेखणी गाजविणाऱ्या 'साहित्यिका'ला अशी एवढी लोकप्रियता क्वचितच मिळते.

आचार्य अत्र्यांनी साहित्याच्या क्षेत्रात पदार्पण केले ते एक कादंबरी लिहून. 'मोहित्यांची मंजुळा' हे त्या कादंबरीचे नाव. पुढे, अलीकडच्या काळात त्यांनी 'चांगुणा' नावाची आणखी एक कादंबरी प्रसिद्ध केली. पण, कादंबरीकार म्हणून काही ते ओळखले जात नाहीत. ललित वाङ्मयाच्या 'कादंबरी' या प्रकारात त्यांनी कधी फारसे मनच घातले नाही. या गोष्टीचे मर्म आचार्यांच्या स्वभाववैशिष्टचात असावे. जीवनातील आणि मनुष्य-स्वभावातील विसंगती, खुळचटपणा, हास्यास्पदता अचूकपणे टिपून काढणे हा श्री. अत्र्यांचा एक स्वभाव-विशेष होता आणि म्हणूनच त्यांनी विडंबन-काव्याने आपल्या साहित्यिक जीवनाला खरी खरी सुरुवात केली असे म्हणावयास हरकत नाही. त्यांच्या 'झेंडूची फुले' या विडंबनपर कवितासंग्रहाने मराठी कवितेच्या क्षेत्रात एक नवा पायंडा घालून दिला, हे निर्विवाद सत्य आहे.

हीच गोष्ट पुढे श्री. अत्र्यांच्या नाटकांनीही सिद्ध केली. काव्यापेक्षा रंगभूमीचे क्षेत्र अधिक प्रभावकारी व सोईस्कर म्हणून त्यांनी 'साष्टांग नमस्कार' नाटक लिहून आपल्या नाटककाराच्या जीवनाला प्रारंभ केला आणि तो अनेक वर्षे अव्याहतपणे आणि चढत्या यशस्वीपणाने चालू ठेवला.

मध्यंतरीच्या कालखंडात श्री. अत्र्यांनी शिक्षणक्षेत्रातही बहुमोलाची कामगिरी केली. नवीन शिक्षण-संस्था काढणे, आपल्या कर्तृत्वाने ती भरभराटीस आणणे, विद्यार्थ्यांसाठी क्रमिक पुस्तके कशी असावीत याचे आदर्श घालून देणे, शिक्षणक्षेत्रात जास्तीत जास्त प्राविण्य मिळविण्यासाठी इंग्लंडची वारी करून तेथून 'टी. डी.' ची पदवी प्राप्त करून येणे, इत्यादी गोष्टी पाहिल्या म्हणजे, श्री. अत्र्यांची इच्छा स्वत:ला शिक्षणकार्यालाच वाहून घ्यावे अशी असावी की काय, असे वाटू लागते.

श्री. अत्र्यांनी चित्रपटसृष्टीतही निर्माता, दिग्दर्शक आणि पटकथा लेखक म्हणून जी कामगिरी केली ती तशीच महनीय आहे. या क्षेत्रात एवढे यश आणि गौरव प्राप्त करून घेणारा हाच पहिला मराठी माणूस, असे म्हटले तर ते यथार्थच ठरेल.

पुढे श्री. अत्र्यांनी वृत्तपत्र-व्यवसायात प्रवेश करावयाचे ठरविले. त्यांनी चालविलेली 'नवयुग', 'तुकाराम', 'समीक्षक' आदी नियतकालिके अतिशय गाजली आणि लोकप्रियही झाली. पण 'वृत्तपत्रकार' म्हणून त्यांनी चालविलेले 'मराठा' हे दैनिक ह्या दृष्टीने अजोडच म्हणावे लागेल.

"भले तरी देऊ कासेची लंगोटी। नाठाळाच्या पाठी हाणू सोटा" हे आपले ब्रीदवाक्य अत्र्यांच्या 'मराठ्या'ने तंतोतंत शेवटपर्यंत पाळले. अन्यायाचा सर्व सामर्थ्यानिशी प्रतिकार करणे, त्यासाठी प्रसंग पडला तर स्वत:वर संकटे ओढवून घेण्यासाठी मागे-पुढे न पाहाणे, हा अस्सल मराठी बाणा अत्र्यांनी अत्यंत निर्भयपणे व साहसी वृत्तीने शेवटपर्यंत चालविला. ज्यांचा कोणी वाली नाही, कैवारी नाही, जे स्वत: अन्यायाखाली दडपले जात आहेत पण ज्यांच्या अंगी ह्या अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याची शक्ती नाही, अशा लोकांचा एक समर्थ कैवारी म्हणून 'मराठ्या'च्या ह्या संपादकाकडे कितीतरी लोक पाहात असत. सार्वजनिक जीवनातील ही प्रचंड शक्ती आज काळाने आपल्यापासून हिरावून नेली आहे !

अशा तऱ्हेने जीवनातल्या अनेकविध क्षेत्रांत प्रचंड कामगिरी करणारे आचार्य अत्रे आज आपल्यात नाहीत ! एक उमदा माणूस आपल्याला सोडून गेला आहे ! एक सच्चा 'मराठा गडी' आपल्याला सोडून गेला आहे ! एक थोर प्रतिभाशाली साहित्यिक आपल्याला सोडून गेला आहे ! 'युगवाणी'ला ह्या गोष्टीचे अतिशय दु:ख आहे.

अनुक्रमणिका